व्यवहार चंद्रिका.

वासुदेव कृष्ण माईणकर
सांगली

किंमत बारा आणे.

श्री

अदत्वा परसंतापं अगत्वा खलमंदिरं ।
अक्लेशयित्वा चात्मानं यदल्पमपि तद्बहु ॥

व्यवहार चंद्रिका.

लेखकः
वासुदेव कृष्ण माईणकर
सांगली.

आवृत्ति पहिली.

पुणें येथें
आर्यभूषण छापखान्यांत **अनंत विनायक पटवर्धन**
यांनीं छापिलें व **वासुदेव कृष्ण माईणकर**
यांनीं पुणें येथें प्रसिद्ध केलें.

शके १८४७

किंमत बारा आणे.

पुस्तक– परिचय

कोणतेंहि पुस्तक, मग तें सुभाषितासारख्या सर्वमान्य विषयाचें असो, सुधारणेसारख्या पक्षमान्य विषयाचें असो, कीं शास्त्रीय शोधासारख्या व्यक्तिमान्य विषयाचें असो, त्याची प्रस्तावना दुसऱ्या कोणी तरी लिहावी, असा अलिकडे सांप्रदायच पडत गेला आहे, हा प्रघात पौर्वात्य नव्हे, पाश्चात्य आहे; जुना नव्हे नवा आहे. पाश्चात्य विद्येनें विभूषित झालेले लोक कोणाहि मनुष्याबरोबर दुसऱ्या कोणी तरी त्याचा परिचय करून दिल्याशिवाय एक अक्षरहि बोलूं इच्छीत नाहींत. अर्थात् अशा लोकांशीं ओळख करूं इच्छिणारा मनुष्य, प्रथम त्यांच्याशीं ओळख असलेल्या एखाद्या गृहस्थाचें परिचय पत्र घेतो व मगच त्यांजकडे जातो, इंग्रजी शिक्षणाचा प्रसार झाल्या-नंतर वाचनाची अभिरुचि लागलेल्या वाचकांची व सध्यां पुस्तक प्रकाशित करणाराची स्थिति अशीच झाली आहे. पुस्तक वाचण्यापूर्वीं त्या पुस्तकाची प्रस्तावना कशी आहे. हें वाचक प्रथम पहातात व मग तें पुस्तक पुढें वाचावयास घेतात; आणि म्हणूनच प्रत्येक पुस्तक–प्रकाशक दुसऱ्या कोणाकडून तरी प्रस्तावना लिहविल्याशिवाय आपलें पुस्तक प्रकाशित करण्यास धजत नाहीं. या लहानशा पुस्तकाचे प्रकाशक रा. बा. कृ. माईणकर यांनीं मला प्रस्तावना लिहिण्यास याच कारणामुळें सांगितलें असावें.

अशा प्रस्तावनेनें पुस्तकाचा परिचय करून देणें सोपें नव्हे. आपण ज्यांस चांगलें ओळखतों अशा माणसांकडे एखाद्याबद्दलचें परिचयपत्र देणें सोपें आहे, मात्र प्रस्तावना–लेखक मराठी वाचकांच्या चांगला ओळखीचा पाहिजे. पण माझी तशी स्थिति नाहीं. बरें ओळख नसणाऱ्या माणसांकडे ओळख करून द्यावयाची म्हटली, तर ओळख करून देणारी व्यक्ति इतरांस ओळखीत नसली तरी बरेचसे लोक तिला ओळखीत असले पाहिजेत. पण मी या वर्गांतहि येत नाहीं. मग असें असून मीं हें काम कां स्वीकारलें ?

याचीं दोन कारणें आहेत. अगदीं पहिलें कारण असें कीं, रा. माईणकर, यांनीं सांगितलेलें हें काम न करून मला त्यांचें मन मोडवेना. पण दुसरें एक कारण असें कीं, सुभाषित या विषयाचा परिचय करून देणें अत्यंत

सुलभ आहे. सांसारिक दुःखानें गांजून गेलेल्या मनुष्यास क्षणभर त्या दुःखाचा विसर पाडून आनंदित करणारें कांहीं असेल तर तें सुभाषित; चोहों बाजूंनीं कोंडमारा झालेल्या मूक मनास आपलें दुःख उघडपणें एखाद्या स्वरूपांत रडतां येत असेल तर तें सुभाषिताच्याच रूपांत आणि सर्वांस 'त्राहि भगवन्,' करून सोडणाऱ्या सत्ताधीशाच्या दोषांचें दिग्दर्शन त्याच्या डोळ्यांत न खुपतां ज्या मार्गानें करतां येतें तो मार्गहि सुभाषिताचाच. खरें सुभाषित असलें कीं श्रोत्यांच्या किंवा वाचकांच्या माना डोलूं लागल्याच. सर्वांवर सत्ता चालविणाऱ्या या सुभाषितास आपला हक्क गाजवितांना बादशहाचें फर्मान लागत नाहीं किंवा विद्वानांचें पाठराखणेंहि लागत नाहीं, फार काय यास प्रत्यक्ष आपल्या जनकाचेंहि नांव आपल्या नांवापुढें लावण्याची अवश्यकता भासत नाहीं, म्हणूनच अनेक प्रसंगीं तर यास निर्माण करणाऱ्याचें नांव लोकांस ठाऊकहि नसतें. पण असें असलें तरी सर्वांचें मन आकर्षित करण्याचें यांत सामर्थ्य आहे आणि या सामर्थ्याची पराकाष्ठा येथपर्यंत गेली आहे कीं सुभाषितानें ज्याचें चित्त रममाण होत नाहीं 'स वै मुक्तोऽथवा पशुः' असेंच म्हणावें लागतें.

अशा सुभाषितांच्या भाषांतरानें संस्कृत न जाणणाऱ्या मराठी वाचकांस चंद्रिकेप्रमाणें आल्हाद देणाऱ्या या पुस्तकास परिचयार्थक प्रस्तावना लिहिण्याची कांहीं गरज नाहीं, जगत्प्रसिद्ध गोष्टीचा परिचय करून देण्यास ज्याप्रमाणें त्या गोष्टीचें नांव घेतलें कीं पुरे त्याचप्रमाणें हीं सुभाषितें आहेत, एवढें म्हटलें कीं या पुस्तकाच्या प्रस्तावनेचें काम संपलें. कस्तूरी म्हणून माती गिऱ्हाकांच्या हातीं द्यावयाची असेल त्या दुकानदारानें देवाधर्माची आणनाक वहात बसावें पण खऱ्या मृगनाभींतल्या कस्तुरीस अशा शपथांची अवश्यकता नसते. तिच्या सुगंधानेंच लोकांचीं घ्राणेंद्रियें आकृष्ट होतात व तिला घेण्यासाठीं लोकांच्या उड्यांवर उड्या पडतात. त्याचप्रमाणें रा. माईणकर यांच्या पुस्तकांतील सुभाषितांनीं मराठी वाचक आनंदित होतील व या चंद्रिकेच्या शीतळ व शांत प्रकाशाचा भरपूर उपयोग करतील, अशी आशा प्रदर्शित करून हा अल्प अपरिचित परिचय पुरा करितों.

प्रो. कर्वे आश्रम.
हिंगणे, ता. १।२।२६

हरि रामचंद्र दिवेकर, एम. ए.
संस्कृत प्रोफेसर
महिला पाठशाळा, एरंडवणे.

आत्मनिवेदन.

माझ्या आयुष्यांतील अत्यंत महत्त्वाचा काल सांगली संस्थानच्या नोकरींत गेला. या कालाचें वर्णन व या कालांतील माझे अनुभव या संबंधीं स्वतंत्र एक पुस्तक लिहिण्याचा माझा विचार आहे.

या २३ वर्षांचे कालांतील चार वर्षें **श्रीमंत सर चिंतामणराव आपासाहेब चीफ ऑफ सांगली व श्रीमंत सौ० मातोश्री राणी साहेब संस्थान सांगली** यांचे सान्निध्यांत व सेवेंत श्रीमंतांचा खासगी कामगार या नात्यानें गेलीं. तो आनंदप्रचुर काल मात्र चिरस्मरणीय होय. उभयतां पतिपत्नींचें निर्मल अंतःकरण, मधुर भाषण, निष्कपट आचरण, नोकरांशीं प्रेमळ वर्तन, साधी व सदा आनंदी वृत्ति, गोड स्वभाव वगैरे अनंत गुणांचा समुच्चय माझ्या नोकरीचे प्रसंगीं मला अनुभविण्यास मिळाला व तो काल आनंदमय स्थितींत गेला त्यामुळें मनास विशिष्ट प्रकारचें समाधान वाटत आहे.

प्रो. अण्णासाहेब कर्वे यांचे आश्रमाशीं सन १९१७ च्या जुलई महिन्यांत विशिष्ट परिस्थितींत माझा प्रथम संबंध जडला. व तेव्हांपासून आश्रमाबद्दल मनांत आदर उत्पन्न होऊन जमल्यास आपण येथें राहून कांहीं कार्य करावें असें मीं मनानें ठरविलें होतें व तो योग रजा मिळाल्यामुळें घडून येणें सुकर झालें.

रजा मिळतांच आश्रमांत आलों. येथील प्रो. दिवेकर, प्रिन्सिपाल पटवर्धन, प्रो. वामनराव जोशी ही मंडळी सुशील व सुविद्य असल्यामुळें यांचे सहवासांत आनंदमय दिनचर्या सुरू झाली.

मला प्रिय असलेलेंच काम मजकडे सोंपविल्यामुळें त्यांत थोडाबहुत फुरसत मिळून त्या वेळांत भारत, रामायण, सुभाषित रत्नभांडागार इत्यादि पुस्तकें मीं वाचूं लागलों. सुभाषितांतील श्लोक वाचून मनास समाधान वाटलें कीं तो लिहून ठेवावा व त्याचें सरळ भाषांतर करावें, असा क्रम सुरू झाला. त्या लिहून काढलेल्या भाषांतरित श्लोकांचें पुस्तक छापवावें असें प्रो. वामनराव जोशी व प्रो. मायदेव यांनीं सुचविल्यावरून पुस्तक छापण्याचें निश्चित केलें.

हें पुस्तक विद्वत्ताप्रचुर, किंवा एखादी दिव्य दृष्टि देणारें अथवा अकल्पित कांहीं शोध लावूं पहाणारें नसलें तथापि तें मी माझ्या मनाच्या समाधानासाठीं लिहिलें आहे व त्यापासून माझे मनास सात्विक आनंद होत आहे. माझ्या आनंदाचे वांटेकरी आप्त, इष्ट, स्नेही व इतर वाचक मंडळींनीं व्हावें या सद्धेतूनें प्रेरित होऊन पुस्तक प्रसिद्ध करीत आहें.

पुस्तक बरें वाईट ठरविणें तज्ज्ञ माणसांकडे सोंपविलें आहे. पुस्तक प्रसिद्ध होणेचे कामीं श्लोकांचें भाषांतर व प्रुफें तपासणें वगैरे बाबतींत रा. रा. पांडुरंग विठ्ठल देव संस्कृत अध्यापक व रा. रा. व्यंकटेश कृष्ण देशपांडे बी ए. अध्यापक हिंगणे महिला विद्यालय, यांची सर्वस्वी मदत झाल्यामुळें त्या उभयतांचे आभार मानणें अवश्य आहे.

तसेंच आर्यभूषण प्रेसचे उत्साही व्यवस्थापक रा. रा. वामनराव पटवर्धन यांनीं प्रेमळ बंधुत्वाचे नात्यानें ठरल्या मुदतीपूर्वींच पुस्तक छापवून दिलें याबद्दल त्यांचेही आभार मानणें इष्ट आहे.

इति शुभं

प्रो. कर्वे आश्रम
हिंगणें, ता० १-२-२६

वासुदेव कृष्ण माईणकर

तज्ज्ञ माणसांचे अभिप्राय.

अभिप्राय नं. १

फर्ग्युसन कॉलेजमधील संस्कृत विषयाचे प्रोफेसर, नरहर गोविंद सुरु, एम ए. लिहितातः-

रा. वासुदेव कृष्ण माईणकर यांनीं लिहिलेलें व्यवहार चंद्रिका पुस्तक वाचून पाहिलें. श्लोकांचा संग्रह उत्तम झाला आहे. संस्कृत भाषेच्या अगाध वाङ्मय-सागरांत अहर्निश मज्जन करण्याच्या स्पृहणीय व्यासंगामुळें रा. माईणकर यांस जो मूल्यवान् मौक्तिक रत्नांचा लाभ झाला तो त्यांनीं गुंफून हाराच्या स्वरूपांत जगतास अर्पण केला आहे. सोबत मातृभाषेंत केलेलें असें भाषांतरही जोडल्यामुळें, संस्कृत भाषेशीं ज्यांचा परिचय नाहीं अशा सामान्य जनसमूहास देखील संकलित केलेल्या या सुभाषितांचा आस्वाद घेतां येणें सुलभ झालें आहे. उतारवयांत विविध व्यवसायांमधून वेळांत वेळ काढून अशा तऱ्हेच्या केलेल्या वाङ्मयसेवेबद्दल रा. माईणकरांचें आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करतों. ता. २५ । १ । २६

नरहर गोविंद सुरु, एम् ए.
प्रोफेसर ऑफ् संस्कृत फर्ग्यूसन कॉलेज, पुणें.

अभिप्राय नं. २

प्रो. डॉ. रघुनाथ दामोदर करमरकर, एम ए., पी. एच. डी., प्रोफेसर ऑफ् संस्कृत न्यू पूना कॉलेज, लिहितातः-

रा. रा. वासुदेवराव कृष्ण माईणकर (हिंगणे आश्रम) यांनीं लिहिलेलें व्यवहार चंद्रिका हें सार्थ नांव दिलेलें संस्कृत पुस्तक आह्मीं समग्र वाचून पाहिलें. संस्कृत वाङ्मयांत अशा तऱ्हेचीं सुभाषितें व सत्यपूर्ण त्रिकालाबाधित वचनें हजारों आहेत. त्यांचें सतत परिशीलन शिणलेल्या मनाला रिझविण्याचें काम उत्कृष्ट रीतीनें करीलच पण त्याचबरोबरच व्यवहारांत मनुष्यानें कशा तऱ्हेनें

वागावें यासंबंधांतही वाचकांस योग्य मार्ग दाखवील यांत शंका नाहीं. अशा दृष्टीनें पाहिलें असतां वरील पुस्तक लिहून रा. माईणकर यांनीं मराठी वाचकांस चांगलेंच उपकृत केलें आहे यांत शंका नाहीं. रा. माईणकर हे गेलीं दोन वर्षें हिंगणें येथील प्रो. कर्वे आश्रमांत निरपेक्ष रीतीनें काम करीत असतात ही गोष्ट कित्येकांस ठाऊक नसेल. फावल्या वेळांत अशा तऱ्हेचें पुस्तक लिहिल्याबद्दल रा. माईणकर यांचें अभिनंदन करणें अवश्यक आहे असें आम्हांस वाटतें.

सुभाषितांची निवड चांगली झाली आहे व सर्व सुभाषितें वर्णानुक्रमानें दिलीं असल्याकारणानें वाचकांची बरीच सोय झाली आहे. कांहीं सुभाषितांबद्दल उदाहरणार्थ " अनृतं साहसं माया " इत्यादि म्हणजे ज्यांत स्त्रियांविषयीं थोडे फार अनादरयुक्त उद्गार आहेत. (श्लोक ११) अशा बद्दल.—

हल्लींच्या स्त्रीदाक्षिण्यपूर्ण कालांत कांहीं लोकांकडून आक्षेप येण्याचा संभव आहे. परंतु असलीं वचनें फार पुरातन कालापासून प्रसिद्ध असल्यामुळें त्यांत लेखकाला नांवें ठेवण्यासारखें फारसें कांहीं आहे असें आम्हांस वाटत नाहीं. परंतु अशा सुभाषितांची निवड लेखकांनीं तरी कां करावी ? हा आक्षेप शिल्लक राहतोच.

त्याला उत्तर असें देतां येईल कीं, एक तर लेखक त्या वचनांच्या गुणावगुणाबद्दल जबाबदार नाहीं. दुसरें अशा वचनांनीं हल्लींच्या स्वतंत्र विचाराच्या वातावरणांत दिशाभूल होण्याचा फारसा संभव नाहीं. शिवाय अशा वचनांत थोडीबहुत तरी ऐतिहासिक सत्यता असल्याकारणानें तीं पूर्णपणें वगळणेंही बरोबर होणार नाहीं. असो.

सुभाषितांचें मराठी भाषांतर चांगलें साधलें आहे व पुस्तक एकंदरींत संग्राह्य असेंच झालें आहे. शेवटीं पुन्हा एकदां श्रीयुत माईणकर यांचें अभिनंदन करणें इष्ट वाटतें. तारीख २५।१।१९२६

रघुनाथ दामोदर करमरकर,
एम. ए., पी. एच. डी., प्रोफेसर आफ् संस्कृत
न्यू पूना कॉलेज, पुणें.

अभिप्राय नं. ३

प्रो. डॉ. परशुराम लक्ष्मण वैद्य, एम्. ए., पी. एच. डी., प्रोफेसर ऑफ् संस्कृत वुइलिंगडन कॉलेज सांगली, लिहितातः–

रा. रा. वासुदेवराव कृष्ण माईणकर (कर्वे आश्रम हिंगणें) यांनीं लिहिलेलें " व्यवहार चंद्रिका " नांवाचें पुस्तक मीं आमूलाग्र वाचून पाहिलें. यांतील सुभाषितांचा संग्रह फार मनोहर आहे. संस्कृत भाषेंतील व्यवहारोपयोगी उपदेशाचा मराठी वाचकांस यापासून चांगला फायदा व्हावा असा माईणकर यांचा उद्देश आहे व तो यांत चांगला साधला आहे.

श्लोकांचे खालीं दिलेलें मराठी भाषांतर सुबोध असल्यानें थोडें संस्कृत येणारांना सुद्धां याचा सहज उपयोग करून घेतां येईल असें मला वाटतें.

एकंदरीत " व्यवहार चंद्रिका " हें पुस्तक संग्राह्य असेंच झालें आहे असा माझा अभिप्राय आहे.

वुइलिंगडन कॉलेज
सांगली, ८–२–२६

परशराम लक्ष्मण वैद्य.
एम्. ए., पी. एच. डी., प्रोफेसर ऑफ् संस्कृत
वुइलिंगडन कॉलेज, सांगली.

अभिप्राय नं. ४

सांगली येथील वुइलिंगडन कॉलेजचे संस्कृत विषयाचे प्रोफेसर कृष्णाजी नीळकंठ द्रवीड, एम्. ए. लिहितातः–

माझे स्नेही रा. रा. वासुदेवराव माईणकर यांनीं लिहिलेलें " व्यवहार चंद्रिका " नांवाचें पुस्तक मीं समग्र वाचून पाहिलें. या पुस्तकांत त्यांनीं सुभाषितांचा जो संग्रह सादर केला आहे, तो एकंदरीनें कोणालाही ग्राह्य वाटल्यावांचून रहाणार नाहीं, असें माझें मत आहे.

संस्कृतांतलि सुभाषित वाङ्मय प्रायः चटकदार व मार्मिक असतें. त्या वाङ्मयांतून कोणताही भाग निवडून संकलित केला तर तो आदरणीय होणा-

रच. त्या दृष्टीनें पाहतां प्रस्तुत संग्रह सुमारें ३५२ श्लोकांचा आहे म्हणजे बराच मोठा आहे म्हणून स्वीकारार्ह आहे.

या संग्रहांत कांहीं बोधपूर्ण अन्योक्ति आहेत; कांहीं व्यवहारपटुत्वासंबंधाचीं वचनें आहेत व क्वचित् ग्राम्य किंवा दाक्षिण्यशून्य वचनें आहेत. परंतु हीं सर्व वचनें फार प्राचीन कालापासून पूर्वजांची ठेव म्हणून आपले हातीं आलीं आहेत म्हणून अर्थात् तीं संगोपनीय आहेत. काल देश वर्तमानाप्रमाणें त्या वचनांतलि सत्यासत्याचा अंश पारखून घेणें हें बुद्धिमानाचें कर्तव्य आहे.

संस्कृत न समजणारांकरितां या पुस्तकांत प्रत्येक श्लोकाचा भावार्थ सोप्या मराठी भाषेंत श्लोकाखालीं दिलेला आहे. तो सुबोध आहे.

एवंच पुस्तक प्रत्येक साक्षर माणसानें जवळ बाळगण्यासारखें आहे, असा माझा अभिप्राय आहे.

वुइलिंगडन कॉलेज
सांगली, १३–२–२६

कृष्णाजी नीळकंठ द्रवीड, एम. ए.
प्रोफेसर आफ् संस्कृत
वुइलिंगडन कॉलेज, सांगली.

———

शुद्धिपत्र.

पान.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
२	२३	लक्ष्मी मं	लक्ष्मीर्म
६	१९	स संतोषः	ससंतोषः
७	२०	जा	जो.
८	१०	महानथ	महानर्थे
१३	२३	बसन	बसून
१८	१	देवाचा	देवाची
१६	१३	म्हणन	म्हणून
,,	१४	पतास	पतीस
२१	१६	वन्हिश्च	वन्हिंच
२५	२०	सदाचारसं न्न	सदाचारसंपन्न
,,	२२	यावना	याचना
,,	२५	बुद्धिरीर्स्ते	बुद्धिरस्ति
२७	९	दक्षणा	दक्षिणा
,,	१४	विनिाश्चियाय	विनिश्चयाय
,,	१५	तस्य	यस्य
,,	१८	वाहा	वाहणें
,,	२१	नभूतो	नभूतौ
२८	१५	किंवचनीयत्र	किंवचनीयमत्र
३०	१४	जाता	जातो
३०	२४	पोतक	पातकें
३१	२८	शृतवंतोपि	श्रुतवंतोपि
३३	२८	मत्री	मैत्री
३४	१८	धन्यानें	धान्यानें
३५	१९	गतं	शतं
३६	१	दारिद्री	दरिद्री.
३८	२	शीरोद	क्षीरोद
३९	११	पंचलक्षणम्	पंचलक्षणः
४०	१७	माठ्या	मोठ्या

पान.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
४३	१२	पयभोजनं	क्षीरभोजनं
,,	१७	विवाह	विवाद्
४६	१९	चद्रं	चन्द्रः
४८	४	कर्मेचा	कर्मण्यन्यद्
५०	२	मान्याय	मन्याय
,,	१२	पसा	पैसा
५२	२०	माणस	माणूस
,,	२८	साश्रयो	सश्रियो
५४	२३	सादरो	सोदरो
५५	६	शिगतघना	गतघना
,,	१७	जगे	जागे
६०	१९	भोजनाच	भोजनाचे
६०	२१	वरं वरयते	रूपंवरयते
६१	५	दधिभाजनं	दधिभोजनं
६४	२३	विचित्रता	विदग्धता
६७	२	जा	जो
६९	२४	विनाकारण रागावणें	विनाकारण न रागावणें
७३	६	नतु	ननु
७५	५	कन्या	कन्याः
७६	१५	क	एक
७७	२०	यत	चेत्
७९	६	रतिराज्ञा	रतिश्चाज्ञा
८१	८	य	या.

व्यवहार चंद्रिका.

सुभाषित.

अलंकारप्रियोविष्णुर्जलधाराप्रियः शिवः ।
नमस्कारप्रियो भानुर्ब्राह्मणो भोजनप्रियः ॥ १ ॥

अलंकारांच्या योगानें भगवान् महाविष्णु, रुद्राच्या अभिषेकानें श्री॰ उमामहेश्वर शंकर, प्रतिदिवशीं नमस्कार केल्यानें सहस्त्ररश्मि श्रीसूर्यनारायण, आणि सुग्रास भोजनानें ब्राह्मण-संतुष्ट होत असतात.

अबला यत्र प्रबला बालो राजा निरक्षरो मंत्री ।
नहि नहि तत्र धनाशा जीवित आशापि दुर्लभा भवति ॥ २॥

बायकांचें प्राधान्य, अल्पवयी राजा व मूर्ख दिवाण अशी राज्याची परिस्थिति असली म्हणजे त्या राज्यांत द्रव्य कदाचित् सुरक्षित राहील किंवा राहणारही नाहीं इतकेंच नव्हे तर, जीवितआशा करणेंसुद्धां वेडेपणाचें होय. सारांश अशा राज्यांत जीवित व द्रव्य हीं केव्हांही धोक्यांतच असतात.

असारे खलु संसारे सारं श्वशुरमंदिरं ।
क्षीराब्धौ च हरिः शेते शिवः शेते हिमालये ॥ ३ ॥

संपूर्ण संसारामध्यें सासुरवाडीस महत्त्व आहे यांत शंका नाहीं. कारण श्री-महाविष्णूची सासुरवाडी क्षीरसमुद्र, त्यामध्यें महाविष्णूनीं वास केला आहे व हिमालय पर्वतावर श्रीशंकरांनीं वास केला आहे यावरून सासुरवाडीस राहणें कांहीं विशेष महत्त्वाचें असावें असें वाटतें.

अन्यायोपार्जितं द्रव्यं दश वर्षाणि तिष्ठति ।
प्राप्त एकादशे वर्षे समूलं च विनश्यति ॥ ४ ॥

अन्यायानें संपादन केलेलें द्रव्य १० वर्षे टिकतें व अकरावें वर्ष लागलें ह्मणजे प्रथमचें थोडें असेल त्यासह नाहींसें होतें.

अस्थिवद् दधिवच्चैव पिष्टवत्कुष्ठवत्तथा ।
राजंस्तव यशो भाति शरच्चंद्रमरीचिवत् ॥ ५॥

कवि राजयशाचें वर्णन करितो. राजा तुझें यश खालील वस्तूंप्रमाणें पांढरें शुभ्र आहे. त्या वस्तू अशाः- हार्डे, दहीं, पीठ, पांढरें कुष्ठ, व शरदृतूंतील चांदणें याप्रमाणें तुझें यश शुभ्र आहे. प्रथम उच्चारलेल्या वस्तूंपेक्षां दुसरी चांगली असें जाणून सर्व पांढऱ्या वस्तूंचा उल्लेख केला आहे.

अभ्रवृंदं विशाखान्तं प्रसूत्यंतं हि यौवनं ।
राज्यांतं नरकं तद्वद्याचनांतं हि गौरवं ॥ ६ ॥

विशाखा नक्षत्राच्या शेवटपर्यंत पावसाचा काळ, प्रथमप्रसूतीपर्यंत यौवनाचा काळ, त्याचप्रमाणें राज्याअंतीं नरकप्राप्तीचा काळ आणि याचना करीपर्यंत गौरव होण्याचा काळ असा सर्वसाधारण नियम आहे.

अमंत्रमक्षरं नास्ति नास्ति मूलमनौषधं ।
अयोग्यः पुरुषो नास्ति योजकस्तत्र दुर्लभः ॥ ७ ॥

प्रत्येक अक्षरामध्यें मंत्रसामर्थ्य आहे. झाडाच्या प्रत्येक मूळांत औषधीचा गुण आहे. तसेंच प्रत्येक पुरुषाचा उपयोग होण्यासारखा आहे. परंतु त्यांची योजना करून सर्व वस्तूंचा उपयोग करून घेणारीं माणसेंच दुर्मिळ आहेत.

अनाहूताः स्वयं यांति रसास्वादविलोलुपाः ।
निवारिता न गच्छंति मक्षिका इव भिक्षुकाः ॥ ८ ॥

गोड पदार्थाजवळ रसास्वाद घेण्याकरितां न बोलावितां मक्षिका येतात व निवारण केल्या तरी जात नाहींत. तसेंच द्रव्यवान पुरुषाजवळ याचक लोक अनाहूत जातात व निवारण केलें तरीही तेथून जात नाहींत. सारांश, दरिद्री मनुष्याला द्रव्याची इच्छा असणें स्वाभाविक असतें.

अयममृतनिधानं नायकोऽप्योषधीनां ।
अमृतमयशरीरः कांतियुक्तोऽपि चंद्रः ॥
भवति विगतलक्ष्मी मंडलं प्राप्य भानोः ।
परसदननिविष्टः को लघुत्वं न याति ॥ ९ ॥

भगवान् शीतरश्मि चंद्र सर्व औषधींचा राजा असून त्याचें शरीर अमृतमय आहे आणि तो अत्यंत देदीप्यमान आहे. तथापि श्रीसूर्यनारायणाचे मंडळांत ज्यावेळीं तो प्रवेश करितो त्यावेळीं निस्तेज दिसत असतो. दुसऱ्याच्या घरांत प्रवेश केल्यानें कमीपणा येणें स्वाभाविकच आहे.

अर्थनाशं मनस्तापं गृहे दुश्चरितानिच ।
मानं चैवापमानं च मतिमान् न प्रकाशयेत् ॥ १० ॥

कुमार्गांत खर्च झालेला पैसा, मनाला होत असलेल्या खडतर वेदना, घरांत होत असलेलीं वाईट कृत्यें, स्वतःचा झालेला मान किंवा अपमान, या सर्व गोष्टी शहाणा माणूस केव्हांही बाहेर सांगत नाहीं.

अनृतं साहसं माया मूर्खत्वं वंचनं तथा ।
अशौचं निर्दयत्वं च स्त्रीणां दोषाः स्वभावजाः ॥ ११ ॥

असत्य भाषण, धाडस, मोह, मूर्खपणा, फसवणूक, अमंगळपणा आणि निष्ठुरता हे दोष स्त्रियांमध्यें उपजतच असतात.

अतिप्रचंडा बहुपाककारिणी ।
विवादशीला स्वयमेव तस्करी ॥
आक्रोशबीजा परवेश्मगामिनी ।
त्याज्या तु भार्या दशपुत्रसूरपि ॥ १२ ॥

प्रमाणापेक्षां मोठी, पुष्कळ अन्न शिजवून नासधूस करणारी, क्षणोक्षणीं विनाकारण वादविवाद करणारी, नवऱ्याला नकळत घरांतील जिन्नस चोरून ठेवणारी, कारणांचून ओरडणारी, व दुसऱ्याचे घरीं जाणारी अशी पत्नी पतीनें मग तिला १० पुत्र असले तरी, वर्ज्य समजावी.

अश्वप्लुतं वासवगर्जितंच ।
स्त्रीणांच चित्तं पुरुषस्य भाग्यं ॥
अवर्षणं चाप्यतिवर्षणंच ।
देवो न जानाति कुतो मनुष्यः ॥ १३ ॥

घोड्याची चाल, गडगडणाऱ्या आकाशांतून पाऊस पडेल अगर न पडेल हें समजणें, स्त्रियांच्या अंतःकरणांतील रहस्य, पुरुषाचें नशीब, पाऊस फार पडेल अगर मुळींच पडणार नाहीं हें निश्चितपणें सांगणें, या गोष्टी प्रत्यक्ष परमेश्वरास समजत नाहींत, मग मनुष्यास कशा समजतील ?

अद्यापि नोज्झति हरः किल कालकूटं ।
कूर्मो बिभर्ति धरणीं खलु पृष्ठभागे ॥

अंभोनिधिर्वहति दुस्तरवाडवाग्निं ।
अंगीकृतं सुकृतिनः परिपालयंति ॥ १४ ॥

भगवान श्रीशंकरांनीं धारण केलेलें कालकूट अद्याप टाकलें नाहीं. कूर्मानें पृथ्वीला पृष्ठभागीं घेतली आहे तीही अद्याप तशीच आहे. समुद्रानें प्रखर वडवाग्नीला आपल्या पोटांत घेतला आहे तोही अद्याप तसाच आहे. श्रीशंकर, कूर्म आणि समुद्र यांना अनुक्रमें कालकूट, पृथ्वी आणि वडवाग्नीपासून दुःख होत असलें तथापि एकदां स्वीकारलेलें कार्य उत्तम लोक मध्येंच सोडीत नसतात.

अवसरपठिता वाणी गुणगणरहितापि शोभते पुंसां ।
रतिसमये रमणीनां भूषाहानिस्तु भूषणं भवति ॥ १५ ॥

समयोचित भाषणामध्यें शब्दालंकार, काव्यालंकार नसले तथापि त्यांत शोभा विशेष असते. सुरतप्रसंगीं स्त्रीच्या आंगावर दागिने नसतील तरी त्यांत विशेष प्रकारचें भूषणच असतें.

अप्रतिबुद्धे श्रोतरि वक्तुर्वाक्यं प्रयाति वैफल्यम् ।
नयनविहीने भर्तरि लावण्यमिवेह खंजनाक्षीणां ॥ १६ ॥

श्रोतृसमुदाय मूढ असल्यास उत्तम वक्त्याच्या भाषणाचा त्यांना कांहीं उपयोग होत नाहीं. उदाहरणार्थ डोळे नसलेल्या पतीला त्याच्या पत्नीचे सर्वांग-सुंदर रूपाचा कांहीं उपयोग होत नाहीं. कारण दृष्टि नसल्यामुळें नयनसुखाचा लाभ त्याला कसा होणार ?

असंतुष्टा द्विजा नष्टाः संतुष्टाश्च महीभृतः ।
सलज्जा गणिका नष्टा निर्लज्जाच कुलांगना ॥ १७ ॥

ब्राह्मणानें केव्हांही संतुष्ट असावें, तसेंच राजानें नेहमीं असंतुष्ट असावें. म्हणजे देश मिळविण्याची सदैव आशा धरावी. वेश्येमध्यें लज्जा असतां कामा नये, तसेंच कुलवधूनें निर्लज्ज असतां कामा नये.

अमृतं शिशिरे वन्हिः अमृतं बालभाषणं ।
अमृतं स्वप्रिया भार्या अमृतं स्वामिगौरवं ॥ १८ ॥

थंडीच्या दिवसांत अग्नीपासून सुख होतें. लहान मुलांच्या बोबड्या बोलानें मनास समाधान होतें. स्वतःच्या प्रिय पत्नीमुळें जीव संतुष्ट रहातो व माल-

कानें कामाची परीक्षा करून बक्षीस दिलें म्हणजे स्वर्गसुखाचा अनुभव प्राप्त होतो. एकंदरींत वरील चारही गोष्टी अमृताप्रमाणें मधुर वाटतात.

अश्वं नैव गजं नैव व्याघ्रं नैव च नैवच ।
अजापुत्रं बलिं दद्याद् देवो दुर्बलघातकः ॥ १९ ॥

यज्ञामध्यें घोडा किंवा हत्तीला बली देत नाहींत इतकेंच नव्हे, तर वाघाचें नांवही कोणी काढीत नाहींत– मात्र बकऱ्याचा बली अवश्य देतात. यावरून देवसुद्धां गरीबावर दया करीत नाहीं असें सिद्ध होतें.

अध्वा जरा मनुष्याणामनध्वा वाजिनां जरा ।
असंभोगो जरा स्त्रीणां वस्त्राणामातपो जरा ॥ २०॥

मनुष्य नेहमीं प्रवासांत असणें, घोड्याला प्रतिदिवशीं न फिरवितां ठाणावर बांधून ठेवणें, बायकांना संभोगसंस्कार नसणें आणि वस्त्राला नेहमीं उन्हांत टाकणें या सर्व गोष्टींमुळें त्या त्या वस्तूंना जीर्णता येत असते.

अतिपरिचयादवज्ञा संततगमनादनादरो भवति ।
मलये भिल्लपुरंध्री चंदनतरुकाष्ठमिंधनं कुरुते ॥ २१ ॥

अतिशय परिचय झाला म्हणजे मान राहत नाहीं. मलय पर्वतावरील भिल्लाची पत्नी ज्या चंदनाच्या काष्ठांचा उपयोग नित्याचे स्वयंपाकास करीत असते, तोच चंदन इतर लोकांस अत्यंत दुर्मिळ असतो.

अतः परीक्ष्य कर्तव्यं विशेषात्संगतं रहः।
अज्ञातहृदयेष्वेवं वैरीभवति सौहृदं ॥ २२ ॥

केव्हांही एकांतमैत्री योग्य परीक्षा केल्यावांचून करूं नये. तशी केल्यास त्यांत अजाण व गरीब माणसांवर वाईट प्रसंग येण्याचा संभव असतो. कारण, केव्हांही बलवान्च खरा ठरत असतो.

अंकाधिरोपितमृगश्चंद्रमा मृगलांछनः ॥
केसरी निष्ठुरक्षिप्तमृगयूथो मृगाधिपः ॥ २३ ॥

चंद्रानें कौतुकानें हरिण मांडीवर घेतलें यामुळें त्यास मृगलांछन म्हणूं लागले. आणि सिंहानें मृगाला जवळ आल्यास खाण्याचा क्रम ठेविला यामुळें त्यास मृगांचा राजा म्हणूं लागले. एकंदरींत, गरीबीनें वागण्यांतच नुकसान आहे.

अप्सु प्लवंते पाषाणा मानुषा घ्नन्ति राक्षसान् ।
कपयः कर्म कुर्वंति कालस्य कुटिला गतिः ॥ २४ ॥

पाण्यामध्यें पाषाणं तरतात, मनुष्यें राक्षसांचा वध करितात, आणि माकडें मनुष्याप्रमाणें कामें करितात. हा सर्व कालमहिमा आहे.

अहमेव गुरुः सुदारुणानां ।
इति हालाहलमास्म तातदृप्यः ॥ २५ ॥
ननु संति भवादृशानि भूयो ।
भुवनेऽस्मिन् वचनानि दुर्जनानां ॥ २६ ॥

हे हालाहलविषा, सर्व दारुण जहर पदार्थांत मीच श्रेष्ठ आहे अशी घमेंड तूं मारूं नकोस; कारण या जगामध्यें दुर्जनांचीं वचनें केव्हांही तुझेपेक्षांसुद्धां कठोर असलेलीं ऐकावयास सांपडतात.

अभ्युत्थानादभिगमनं वंदनं प्रियभाषणं ।
आसनं चान्नदानंच मुक्तेः सोपानपंचकम् ॥ २७ ॥

गृहस्थाश्रमी मनुष्याचे घरीं अतिथी आला असतां त्याला सामोरें जाऊन त्याचा आदरसत्कार करणें, त्यास भक्तिभावानें नमस्कार करणें, त्याचेशीं मधुर संभाषण करणें, त्याला योग्य आसनावर बसविणें, आणि सात्विक अन्नदान करणें या पांच गोष्टी मनुष्यास स्वर्गास जाण्यास साधनभूत आहेत असें समजावें.

अविश्रामं वहेत् भारं शीतोष्णंच न विंदति ।
स संतोषस्तथानित्यं त्रीणि शिक्षेत गर्दभात् ॥ २८ ॥

रात्रंदिवस काबाड कष्ट करणें, थंडीवाऱ्याचा विचार न करणें, आणि नेहमीं आनंदीवृत्तीनें काम करीत राहणें हे तीन गुण गर्दभापासून शिकण्यास योग्य होत.

अपमानं पुरस्कृत्य मानं कृत्वां तु पृष्ठके ।
स्वकार्यमुद्धरेत् प्राज्ञः कार्यध्वंसोहि मूर्खता ॥ २९ ॥

आपलें कार्य साधण्याचे प्रसंगीं मानापमानाचा विचार करूं नये. आपला मानिपणा बाजूस ठेऊन आपलें कार्य करून घेणें हें चतुर माणसाचें लक्षण आहे. मानाचा बडेजाव सांगून कार्यविघात करणें मूर्खपणाचें लक्षण होय.

अर्थो नराणां पतिरंगनानां ।
वर्षा नदीनां ऋतुराट् तरूणां ॥

स्वधर्मचारी नृपतिः प्रजानां ।
गतंगतं यौवनमानयंति ॥ ३० ॥

द्रव्यामुळें पुरुषांना, पतीमुळें बायकांना, वर्षाऋतूमुळें नद्यांना, आणि वसंतऋतूमुळें सर्व वृक्षांना तसेंच स्वधर्माचरणाविषयीं तत्पर असलेल्या राजामुळें राज्यांमधील प्रजेला नवीन उमेद येत असते.

असंभवं हेममृगस्य जन्म ।
तथापि रामो लुलुभे मृगाय ॥
प्रायः समापन्नविपत्तिकाले ।
धियोपि पुंसां मलिनीभवंति ॥ ३१ ॥

सर्व चराचर जग निर्माण करणाऱ्या श्रीरामचंद्रास सोन्याच्या मृगाचा जन्म संभवनीय नाहीं हें माहीत असूनही त्याला मारण्यांची इच्छा झाली यावरून आपत्काल समीप आला असतां शहाणे लोकांची सुद्धां बुद्धि भ्रष्ट होते असें सिद्ध होतें.

अर्थेन किं कृपणहस्तगतेन तेन ।
रूपेण किं गुणपराक्रमवर्जितेन ॥
मित्रेण किं व्यसनकालपराङ्मुखेन ।
ज्ञानेन किं बहुशठाधिकमत्सरेण ॥ ३२ ॥

कृपणाच्या हातीं असल्यामुळें ज्याचा दानाकडे उपयोग होत नाहीं असें द्रव्य, ज्यामध्यें गुण किंवा पराक्रम दिसून येत नाहीं असें रूप, संकटाच्या कालीं उपयोगी पडत नाहीं इतकेंच नव्हे तर जा तोंड फिरवितो तो मित्र, मूर्खाहून ज्याचेमध्यें मत्सर अधिक भरला आहे अशा ज्ञानी माणसाचें ज्ञान, हीं सर्व असून सुद्धां निरुपयोगी होत.

आज्ञा कीर्तिः पालनं ब्राह्मणानां ।
दानं भोगो मित्रसंरक्षणं च ॥
येषामेते षड्गुणा न प्रवृत्ताः ।
कोऽर्थस्तेषां पार्थिवोपाश्रयेण ॥ ३३ ॥

ब्राह्मणांची आज्ञा व त्यांची कीर्ति, आणि त्यांचें पालन, शिवाय दानधर्म व सुखोपभोग आणि मित्राचें संरक्षण, या गोष्टी राजाश्रयास राहून ज्यांचे हातून झाल्या नाहींत त्यांचा राजाश्रय व्यर्थ होय.

आसन्नमेव नृपतिर्भजते मनुष्यं।
विद्याविहीनमकुलीनमसंगतं वा॥
प्रायेण भूमिपतयः प्रमदालताश्च।
यः पार्श्वतो भवति तं परिवेष्टयंति॥ ३४॥

जवळ असणाऱ्या मनुष्यावर प्रेम करणें ही एकच गोष्ट राजे लोकांना माहीत असते. मग तो मनुष्य अविद्वान्, हीनकुलोत्पन्न, किंवा आपल्यापेक्षां कमी योग्यतेचा असला तथापि हरकत नाहीं. आणि बहुतकरून राजे, तरुण स्त्रिया आणि वेली, जवळ असणाऱ्यासच चिकटून रहातात असा सर्वसाधारण नियम दिसतो.

आपत्काले महानथ दुर्भिक्षे शत्रुसंकटे।
राजद्वारे स्मशाने च यस्तिष्ठति स बांधवः॥ ३५॥

दारिद्र्यप्रसंगीं, प्लेग वगैरे संकटांत, दुष्काळासारख्या वाईट दिवसांत, परचक्र येऊन नाश होत असल्याप्रसंगीं, राजदरबारांतील विशेष कार्यप्रसंगीं, आणि स्मशानयात्रेसारख्या वेळीं जे उपयोगी पडतात त्यांच्याशीं बंधु असें समजून वागणूक ठेवावी.

आप्तद्वेषाद् भवेन्मृत्युः परद्वेषाद् धनक्षयः।
राजद्वेषाद् भवेन्नाशः ब्रह्मद्वेषात् कुलक्षयः॥ ३६॥

भाऊबंदांत द्वेष केल्यास मृत्यु येतो. दुसऱ्याशीं वैर करण्यांत द्रव्यहानि होते. राजाशीं बेबनाव झाल्यास नाश होतो, आणि ब्राह्मणांचा द्वेष केल्यास कुलक्षय होत असतो. तरी सहसा कोणाशींही वैर संपादन करूं नये.

आपद्गतं हससि किं द्रविणांधमूढ।
लक्ष्मीः स्थिरा न भवतीति किमत्र चित्रं॥
एतान् प्रपश्यासि घटान् जलयंत्रचक्रे।
रिक्ता भवंति भरिता भरिताश्च रिक्ताः॥ ३७॥

श्रीमंतीचा धूर डोळ्यावर आलेल्या हे मूर्खा, तूं दरिद्री लोकांना हंसूं नकोस कारण लक्ष्मी केव्हांही स्थिर असत नाहीं. ती नेहमीं चंचल असते. रहाट गाडग्याचे मोघे क्षणांत भरतात व क्षणार्धांत रिकामे होतात त्याप्रमाणेंच धनिक लोकांची स्थिति असते. रावांचे रंक क्षणावधींत होत असतात.

आक्रोपितोऽपि कुलजो न वदत्यवाच्यं ।
निष्पीडितो मधुरमेव वमेत् किलेक्षुः ॥
नीचो जनो गुणशतैरपि सेव्यमानः ।
हास्येषु यद्वदति तत् कलहेषु वाच्यं ॥ ३८ ॥

ऊंस कितीही पिळून काढला तथापि त्याचा रस गोडच असतो. कुलशीलवान् मनुष्य क्रुद्ध झाला तथापि अभद्र किंवा अश्लील भाषण तो कधींही करीत नाहीं. परंतु शेंकडों गुणांनीं युक्त असा नीच माणूस सहजीं थट्टेचे प्रसंगीं जें भाषण करितो तेंसुद्धां वादाचे वेळेप्रमाणें कटु असतें.

आयुः कर्मच वित्तंच विद्या निधनमेव च ।
पंचैतान्यपि सृज्यंते गर्भस्थस्यैव देहिनः ॥ ३९ ॥

कोणताही प्राणी गर्भांत असतो त्याच वेळीं त्याचें आयुष्य किती, त्याचे हातून सुकृत अगर दुष्कृत कर्में कोणतीं होणार, त्याला द्रव्य किती मिळेल, विद्या किती येईल, आणि मरण कधीं येईल या पांच गोष्टी लिहिलेल्या असतात. मात्र त्या मनुष्याला समजत नाहींत म्हणून त्याची सारखी धडपड चाललेली असते.

आज्ञाभंगो नरेंद्राणां विप्राणां मानखंडना ।
पृथक् शय्याच नारीणामशस्त्रवध उच्यते ॥ ४० ॥

राजानें सांगितलेला हुकूम मोडणें, विद्वान् ब्राह्मणाचा अपमान करणें, आणि साध्वी स्त्रीला पतीनें दुसऱ्या शयनावर निजविणें या गोष्टी शस्त्रावांचून वध केल्याप्रमाणें क्लेशकारक होत असतात.

आयुर्वित्तं गृहच्छिद्रं रहस्यं मंत्रमौषधं ।
तपोदानावमानौच मतिमान् न प्रकाशयेत् ॥ ४१ ॥

आपलें आयुष्य, आपल्याजवळील द्रव्य, आपल्या घरांतील न सांगण्यासारख्या गोष्टी, कधींही समाजांत न सांगण्यासारखीं गुप्त कृत्यें, विशेष प्रकारचा मंत्र, प्रसिद्ध केलें असतां गुण कमी होतो असें औषध, आपण केलेली तपश्चर्या, तसेंच दानधर्म, व आपला अपमान या नऊ गोष्टी शहाणा मनुष्य दुसऱ्यास कधींही सांगत नाहीं.

आघ्रातं परिचुंबितं परिमुहुर्लीढं पुनश्चार्वितं ।
त्यक्तं वा भुवि नीरसेन मनसा तत्र व्यथां मा कृथाः ॥
हेसद्रत्नतवैतदेव कुशलं यद्वानरेणादरात् ।
अंतःसारविलोकनव्यसनिना चूर्णीकृतं नाश्मना ॥ ४२ ॥

हे सद्रत्ना, तुला वानरानें हातांत घेऊन पाहिलें, तुझें चुंबन घेतलें, पुनः पुनः तुजकडे पाहून त्यानें तुला जमिनीवर टाकून दिलें. याप्रमाणें तुझे त्यानें हाल केले. परंतु आंत काय आहे या बुद्धीनें तुझे दगडानें तुकडे केले नाहींत ही तुझ्यावर त्याची मोठी कृपा आहे असें समज. कारण वानराला रत्नाची किंमत काय समजणार ? ज्यानें वरील सर्व प्रकार केले, त्यानें तुझें तुकडेही कदाचित् केले असते. परंतु ही मेहेरबानी समज कीं, त्यानें तुकडे केले नाहींत म्हणून कदाचित् तुझा दुसऱ्यास तरी उपयोग होईल.

इंद्रात् प्रभुत्वं ज्वलनात् प्रतापं क्रोधो यमाद् वैश्रवणाच्च वित्तं ।
पराक्रमं रामजनार्दनाभ्यां आदाय राज्ञः क्रियते शरीरं ॥४३॥

देवेंद्रापासून अधिकार, अग्नीपासून शौर्य, यमधर्मापासून कोप, कुबेरापासून संपत्ति आणि पराक्रम, भगवान् श्रीरामचंद्र व श्रीकृष्ण परमात्मा यांचेपासून अशा रीतीनें प्रत्येक देवतेचा थोडाथोडा अंश घेऊन राजाची देहाकृति निर्माण केलेली असते.

इक्षुदंडाः तिलाः शूद्राः कांता हेम च मेदिनी ।
चंदनं दधि तांबूलं मर्दनं गुणवर्धनं ॥ ४४ ॥

ऊंस, तीळ, शूद्र, पत्नी, सुवर्ण, पृथ्वी, चंदन, दही आणि विडा यांचें जितकें जास्त मर्दन होईल त्याप्रमाणें त्यापासून गुण विशेष दृष्टीस पडतात.

इंदुं निंदति तस्करो गृहपतिं जारः सुशीलं खलः ।
साध्वीमप्यसती कुलीनमकुलो जह्यात् जरंत युवा ॥
विद्यावंतमनक्षरो धनपतिर्नीचश्च रूपोज्वलं ।
वैरूप्येण हतः प्रबुद्धमबुधो कष्टं निकृष्टो जनः ॥ ४५ ॥

गुणानें कमी असलेल्या माणसानें गुणी माणसाची निंदा करण्याचा प्रघात आहे. याचें कारण त्या गुणाबद्दल त्यास मत्सर वाटत असतो. खालील उदा-

हरणें त्यापैकींच आहेत. चंद्राची चोर लोक निंदा करितात, नवऱ्याची निंदा जार करितो. नीच मनुष्य सद्गुणी माणसाला निंदित असतो. पतिव्रता स्त्रीची निंदा वेश्या करिते. नीच कुलोत्पन्न माणूस कुलीनाची निंदा करितो. तरुण मनुष्य वृद्धांस नांवें ठेवितो. अविद्वान् विद्वानाचा द्वेष करितो. निर्धन धनिकाचा हेवा करितो. कुरूप माणूस रूपवानाकडे मत्सरानें पहातो. या सर्व गोष्टींवरून गुणहीन माणसाची स्थिति मोठी कष्टप्रद असते.

उपाध्यायान्दशाचार्यः आचार्याणां शतं पिता ।
सहस्रं तु पितॄन्माता गौरवेणातिरिच्यते ॥ ४६ ॥

दहा उपाध्यायांपेक्षां आचार्य, शंभर आचार्यांपेक्षां पिता, आणि हजार पित्यांपेक्षां माता गौरवानें अधिक आहे.

उपसर्गेऽन्यचक्रेच दुर्भिक्षे शत्रुसंकटे ।
असाधुजनसंसर्गे यः पलायेत जीवति ॥ ४७ ॥

परचक्र जवळ आलें असतां, दुष्काळाचे प्रसंगीं, शत्रु आला असतां; मूर्ख आणि दुराराध्य लोकांशीं संबंध येणेचेवेळीं यावरील सर्व प्रसंगीं दोन पावलें दूर राहण्यांत सुख होतें. यांच्याशीं संबंध ठेवल्यानें क्लेश व पीडा होते असा अनुभव आहे.

उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मीः ।
दैवं प्रधानमिति का पुरुषा वदंति ॥
दैवं विहाय कुरु पौरुषमात्मशक्त्या ।
यत्ने कृते यदि न सिध्यति कोऽत्र दोषः ॥ ४८ ॥

मनुष्यानें उद्योग केल्यास लक्ष्मी त्याचे घरीं चालून येते. मूर्ख लोक दैवाला प्रधान समजून उद्योग करीत नाहींत. दैवाला बाजूस ठेवून आपल्या शक्तीप्रमाणें उद्योग करीत असावें. यत्न केल्यावर फलप्राप्ति कदाचित् न होईल तर त्याचा दोष यत्न करणाऱ्यावर रहात नाहीं.

उपकारोऽपि नीचानामपकारोहि जायते ।
पयःपानं भुजंगानां केवलं विषवर्धनं ॥ ४९ ॥

नीच माणसावर उपकार केले तथापि त्याचा मोबदला अपकाराच्या रूपानेंच मिळत असतो. सर्पाला दूध पाजविलें तथापि त्याचेपासून विषाचीच वृद्धि होत असते.

उपाध्यायश्च वैद्यश्च ऋतुकाले वरांगना ।
सूतिका दूतिका चैव कार्यांते तृणवत् समाः ॥ ५० ॥

मंगल कार्य झाल्यानंतर उपाध्याय, आजार संपल्यावर वैद्य, संभोगसुखानंतर पत्नी, प्रसूति झाल्यावर सुईण, निरोपाची कामगिरी पुरी झाल्यावर (नायिका-समागम झाल्यानंतर) संदेश पोंचविणारी दूतिका, या सर्वांना कांहीं महत्त्व राहात नाहीं.

उदयति यदि भानुः पश्चिमे दिग्विभागे ।
प्रचलति यदि मेरुः शीततां याति वन्हिः ॥
विकसति यदि पद्मं पर्वताग्रे शिलायां ।
न भवति विपरीतं भाषितं सज्जनानां ॥ ५१ ॥

श्रीसूर्यनारायण पश्चिम दिशेस उदय पावेल, मेरू पर्वताला कंप सुटेल, वन्हि शीत होईल, पर्वताच्या शीलेवर कमळें उत्पन्न होतील. या सर्व अशक्य कोटींतील गोष्टीसुद्धां घडून येतील, परंतु सज्जन पुरुषांचे भाषणांत कधींही फरक होणार नाहीं.

उत्तमा आत्मनः ख्याताः पितुः ख्याताश्च मध्यमाः ।
अधमा मातुलात् ख्याताः श्वशुराच्चाधमाधमाः ॥ ५२ ॥

स्वपराक्रमानें उदयास आलेले पुरुष उत्तम समजावे. घराण्याच्या नांवावर मोठे झालेले मध्यम प्रतींत गणावे, मातुलवंशाकडून उदयास आले असल्यास ते कनिष्ठ कोटींत गणावे व सासऱ्याच्या नांवावर उदय पावले असल्यास निकृष्ट स्थितींतील समजावे.

उदये सविता रक्तः रक्तश्चास्तमने तथा ।
संपत्तौच विपत्तौच महतामेकरूपता ॥ ५३ ॥

उदयाचे वेळीं सूर्य रक्तवर्ण असतो व अस्ताचे वेळींही तसाच रक्तवर्ण राहतो, यावरून संपत्ति अगर आपत्तीचे वेळीं मोठे लोक आपल्यामध्यें फरक पडूं देत नाहींत असें सिद्ध होतें.

ऊर्णां नैष दधाति नापि विषयो वाहस्य दोहस्य वा ।
तृप्तिर्नास्य महोदरस्य बहुशो ग्रासैः पलालैरपि ॥

हा कष्टं कथमस्य पृष्ठशिखरे गोणी समारोप्यते ।
को गृह्णाति कपर्दिकैरमुमिति ग्राम्यैर्गजो हास्यते ॥ ५४ ॥

हत्तीपासून लोकर उत्पन्न होत नाहीं, याच्यावर बोजा घालतां येत नसून याजपासून दूध निघण्याची आशा नाहीं आणि खावयास गवत, व इतर झाडपाला कितीही घातलात तथापि याची तृप्ति नाहीं.याला बाजारांत विक्रीस नेला तर वरील अवगुणांमुळें कोणी याला फुकटसुद्धां घेण्यास तयार होत नाहींत. एकदरींत हत्तीसारख्या व्यवहारांत निरुपयोगी जनावराचा उपयोग गरीब प्रपंची माणसास होत नसून ही मोठी उपाधीच होऊन बसते.

उत्खातं निधिशंकया क्षितितलं ध्माता गिरेर्धातवो ।
निस्तीर्णः सरितांपतिर्नृपतयो यत्नेन संतोषिताः ॥
मंत्राराधनतत्परेण मनसा नीताः स्मशाने निशाः ।
प्राप्तः काणवराटकोऽपि न मया तृष्णेऽधुना मुंच मां ॥ ५५ ॥

द्रव्य मिळेल या आशेनें शक्य तितकी पृथ्वी उकरून पाहिली, पर्वतांतील निरनिराळ्या धातूंचें संशोधन केलें, समुद्रांतून परदेशीं जाण्याचें धाडस केलें, मानापमान बाजूस ठेवून राजाची सेवा केली, मंत्रतंत्र करण्यासाठीं रात्रीच्या-रात्री स्मशानांत घालविल्या, पण नशीब असें बलवत्तर कीं, या सर्व उद्योगांत एक फुटकी कवडीसुद्धां मिळाली नाहीं. म्हणून हे तृष्णे, आतां तरी मला सोड.

एको बटुर्दर्भकुशाग्रपाणिः ।
वने वने सिंचति बालचूतान् ॥
आम्राश्च सिक्ताः पितरश्च तृप्ताः ।
एका क्रिया द्व्यर्थकरी प्रसिद्धा ॥ ५६ ॥

आंब्याच्या झाडाखालीं बसन ब्रह्मयज्ञ केल्यास आंब्याला पाणी पोंचून पितरही संतुष्ट होतात. व यामुळें एका क्रियेंत दोन अर्थ सहज साधतां येतात असा या श्लोकाचा भावार्थ आहे.

एको देवः केशवो वा शिवो वा ।
एका नारी सुंदरी वा दरी वा ॥
एकं मित्रं भूपतिर्वा यतिर्वा ।
एको वासः पत्तने वा वने वा ॥ ५७ ॥

श्रीमहाविष्णु किंवा श्री भगवान शंकर यांपैकीं एक देवाचा पूजा करावी. सुंदर तरुण स्त्रीशीं विवाह करून संसार करावा किंवा अरण्यांत गुहेंत बसून तश्चपर्या करावी. एखाद्या राजाला मित्र समजून त्याचा आश्रय करावा किंवा एखाद्या यतीची सेवा करावी व त्याला मित्र समजावा. सुंदरशा नगरामध्यें रहावें, तें शक्य नसल्यास अरण्यांत जाऊन राहावें व तेथें सुख मानावें.

कृते तु आश्रमे दानं त्रेतामाहूय दीयते ।
द्वापारे याच्यमानं तुं सेवया च कलौ युगे ॥ ५८ ॥

कृतयुगामध्यें राजेलोक ऋषींच्या आश्रमांत दानधर्म नेऊन पोंचवीत असत. त्रेतायुगामध्यें ऋषींना राजदरबारीं बोलावून दान देऊं लागले. पुढें द्वापारयुगांत ऋषींनीं मागितल्यावर दान यावें असा क्रम सुरू झाला. आणि शेवटीं आतां कलियुगांत तर सेवा केल्यावांचून दान मिळेनासें झालें आहे. प्रत्येक युगामध्यें या क्रमानें फरक पडत गेला असल्यानें आतां दानाविषयीं आदर नाहींसा झाला आहे.

कस्यचित् किमपि नोहरणीयं ।
मर्मवाक्यमपि नोच्चरणीयं ॥
श्रीपतेः पदयुगं स्मरणीयं ।
लीलया भवजलं तरणीयं ॥ ५९ ॥

परस्वहरणाची बुद्धि नसणें, दुसऱ्याच्या मर्मावर वाक्‌प्रहार न करणें, भगवान् परमेश्वराचें सतत चिंतन करणें, या तीन प्रकारांनीं आयुष्य घालवून सहज संसारसागर तरून जाणें हीं सत्पुरुषाचीं लक्षणें होत.

कविः करोति काव्यानि रसं जानंति पंडिताः ।
कन्यासुरतचातुर्यं जामाता वेत्ति नो पिता ॥ ६० ॥

कवि काव्य तयार करितो,परंतु त्यांतील खरा रस त्याला समजत नाहीं, तो पंडिताला समजतो. कन्यारतिचातुर्य पित्याला समजणें शक्य नाहीं तें जामाताला समजतें. कवितेचा कवि हा पिता असून पंडित हा तिचा उपभोग घेणारा यजमान होय.

कृते प्रति कृतिं कुर्यात् हिंसने प्रति हिंसनं ।
तत्र दोषं न पश्यामि शठे शाठ्यं समाचरेत् ॥ ६१ ॥

नीच मनुष्याशीं वाईट रीतीनें वागण्यांत दोष नाहीं, त्यानें अपाय केल्यास आपण अपाय करावा, त्यानें मारल्यास आपण उलट मारणें यांत दोष नाहीं, नीचास नीच अशी वागणूक असावी.

करस्थमुदकं त्यक्त्वा घनस्थमभिवांच्छति ।
सिद्धमन्नं परित्यज्य भिक्षामटति दुर्मतिः ॥ ६२ ॥

हातांत असलेलें पाणी सोडून देऊन आकाशांतून पडणाऱ्या पावसाच्या पाण्याची इच्छा करणें म्हणजे शिजलेलें ताटांत वाढलेलें अन्न सोडून भिक्षान्न मिळविण्याचा प्रयत्न करणें इतकेंच मूर्खपणाचें आहे.

कृते च रेणुका कृत्या त्रेतायां जानकी तथा ।
द्वापारे द्रौपदी कृत्या कलौ कृत्या गृहेगृहे ॥ ६३ ॥

कृत्या म्हणजे कलह माजविणारी स्त्री. कृतयुगामध्यें रेणुकेमुळें कलह माजला. त्रेतायुगांत श्रीसीतादेवीमुळें रामरावण युद्ध झालें. द्वापारयुगांत द्रौपदी सतीमुळें कौरवपांडवांमध्यें घनघोर संग्राम झाला. आणि आतां कलियुगामध्यें प्रत्येक घरांत बायकांमुळें भाऊबंदी तंटे उत्पन्न झाले आहेत.

कर्ता कारयिता चैव प्रेक्षको ह्यनुमोदकः ।
सुकृतं दुष्कृतं चैव चत्वारः समभागिनः ॥ ६४ ॥

कोणत्याही पापपुण्याच्या कर्माचे वेळीं प्रत्यक्ष कर्म करणारा, तें कर्म करविणारा, जवळ असून कर्म पहाणारा, आणि कर्म करण्याविषयीं अनुमोदन देणारा हे चारही इसम पापपुण्याचे समभागी होतात.

कर्तव्योऽप्याश्रयः श्रेयान् फलं भाग्यानुसारतः ।
नीलकंठस्य कंठेऽपि वासुकिर्वायुभक्षकः ॥ ६५ ॥

केव्हांही आश्रय मोठ्याचा करावा. फलप्राप्ति आपल्या नशीबाप्रमाणें मिळत असते. पिनाकपाणि शंकराच्या गळ्यांत असून सर्पाला वायूशिवाय भक्षणास कांहीं मिळत नाहीं. हा प्राक्तनाचा विषय आहे.

काकः पद्मवने धृतिं न लभते हंसश्च कूपोदके ।
क्रोष्टा सिंहगुहांतरे सुविपुले नीचस्तु भद्रासने ॥
कुस्त्री सत्पुरुषं न जातु भजते सा सेव्यते दुर्जनैः ।
या यस्य प्रकृतिर्विधातृविहिता सा तस्य किं वार्यते ॥ ६६ ॥

कमळाच्या बागेंत राहणें कावळ्यास आवडत नाहीं, हंस विहिरीच्या पाण्यांत राहूं इच्छित नाहीं; कुत्र्याला सिंहाच्या आसनावर सुख वाटत नाहीं, पवित्र आसनावर बसणें नीच माणूस दुःखप्रद समजतो, वारांगना साधुपुरुषांचा आश्रय करीत नाहीं, नीच माणसाशीं सहवास तिला आवडतो. या वरील सर्व गोष्टींवरून ब्रह्मदेवानें ठरविलेल्या स्वभावांत फरक होणें शक्य नाहीं, असें सिद्ध होतें.

कांतं वक्ति कपोति काकुलतया नाथान्तकालोधुना ।
व्याधोऽधो धृतचापसज्जितकरः श्येनः परिभ्रामति ॥
इत्थं सत्यहिना स दष्ट इषुणा श्येनोपि तेनाहतः ।
तूर्णं तौ तु यमालयं प्रतिगतौ दैवी विचित्रा गतिः ॥ ६७ ॥

धनुष्याला बाण लाऊन पक्षी मारण्याच्या तयारींत झाडाखालीं शबर बसला होता, वर आकाशांत श्येन फिरत होता. अशा बिकट परिस्थितींत जगण्याची आशा नाहीं म्हणन दीन मुद्रेनें कपोतिका आपल्या पतास सांगत आहे तोंच शबरास सर्पानें दंश केला. आणि शबरानें सोडलेल्या बाणापासून श्येन मृत होऊन भूमीवर पडला. ईश्वरी इच्छेनें दोन्ही शत्रु मृत होऊन कपोताचें संकट निवारण झालें. यालाच दैवयोग असें म्हणतात.

काके शौचं द्यूतकारे च सत्यं ।
क्लीबे धैर्यं मद्यपे तत्त्वचिंता ॥
सर्पे शांतिः स्त्रीषु कामोपशांतिः ।
राजा मित्रं केन दृष्टं श्रुतं वा ॥ ६८ ॥

कावळ्यामध्यें शुद्धता, द्यूतकारांत खरेपणा, नपुंसकांत धैर्य, दारूबाजास परमार्थाची काळजी, सर्पामध्यें शांतता, स्त्रियांमध्यें सुरताविषयीं तृप्ति, आणि राजा जिवलग मित्र, या वरील सर्व गोष्टी अशक्यप्राय होत.

कार्येषु मंत्री करणेषु दासी ।
भोज्येषु माता क्षमया धरित्री ॥
धर्मस्य पत्नी शयनेषु वेश्या ।
षट्कर्मभिः स्त्री कुलमुद्धरेत्तु ॥ ६९ ॥

मोठ्या कार्यात मंत्र्याप्रमाणें सल्लामसलत देणारी, गृहकृत्यांत मोलकरणी-प्रमाणें काम करणारी, भोजनाचे वेळीं आईप्रमाणें अगत्यानें अन्न घालणारी, पतीच्या रागाच्या वेळीं किंवा मुलाबाळांवर कोप करण्याचे प्रसंगीं पृथ्वी-प्रमाणें क्षमा करणारी,धर्मकृत्यांत सहधर्मानें आचरण करणारी, रतिसमयप्रसंगीं वारांगनेप्रमाणें स्वपतीचें मनरंजन करणारी याप्रमाणें सहा गोष्टींनीं स्त्री आपल्या कुलाचा उद्धार करीत असतो.

का प्रीतिः सह मार्जारैः का प्रीतिरवनीपतौ ।
गणिकाभिश्च का प्रीतिः का प्रीतिर्भिक्षुकैः सह ॥ ७० ॥

मांजर, राजा, वारांगना, भिक्षुक यांच्याशीं मैत्री असली तथापि ती खरी नव्हे. कोणत्याही प्रसंगीं ते आपल्या मतलबास दक्ष असतात. त्यांच्या इच्छे-बाहेर वागल्यास मैत्रीचा नाश तेव्हांच होत असतो.

कालिदासकविता नवं वयः ।
एणमांसमबलाच कोमला ॥
स्वर्गशेषमुपभुज्यते नरैः ।
माहिषं दधि सशर्करं पयः ॥ ७१ ॥

कालिदासाची कविता, अभिनव तारुण्य, हरिणांचें मांस, सुंदर स्त्री, म्हशीचें दहीं, आणि साखर घातलेलें दूध या गोष्टी स्वर्गांत दुर्मिळ असल्यानें मनुष्यां-ना या जगीं उपभोगण्यास मिळतात. स्वर्गसुख भोगून अवशेष राहिल्यावर या वस्तूचा उपभोग भूलोकीं घ्यावयास सांपडतो.

किं चित्रं यदि राजनीतिकुशलो राजा भवेत् धार्मिकः ।
किं चित्रं यदि वेदशास्त्रनिपुणो विप्रो भवेत् पंडितः ॥
तच्चित्रं यदि रूपयौवनवती साध्वी भवेत् कामिनी ।
तच्चित्रं यदि निर्धनोपि पुरुषः पापं न कुर्यात् क्वचित्॥७२॥

राजकारणांत दक्ष व प्रजापालनतत्पर राजा धार्मिक असल्यास नवल नाहीं, तसेंच वेदवेदांगपारग विद्वान् ब्राह्मण शास्त्रज्ञ असेल तरीही नवल नाहीं, मात्र रूप आणि यौवनयुक्त स्त्री पतिव्रता असेल तर आश्चर्य आहे. तसेंच अत्यंत दरिद्री पुरुष जर पातक करीत नसेल तर मात्र आश्चर्य आहे.

क्लिष्टं वृथा यत्तपसा न तीर्थे।
दत्तं वृथा यत्क्षुधिते न पात्रे ॥
भुक्तं वृथा नो रुचिरं न पथ्यं।
मृत्युर्वृथा यन्न रणे न तीर्थे ॥ ७३ ॥

तपश्चर्या किंवा तीर्थ यांच्यासाठीं नसल्यास ते क्लेश व्यर्थ होत. तसेंच भुकेलेल्या किंवा सत्पात्र माणसास जें दिलें नाहीं तें दान व्यर्थ, जें रुचिर आणि पथ्यकर नाहीं असें खाणें व्यर्थ, आणि रणसंग्रामांत किंवा तीर्थावर मृत्यु आला नाहीं तर तो मृत्युही व्यर्थ म्हणजे कष्ट, दान, खाणें, आणि मृत्यु योग्य कारणासाठीं च व्हावयास पाहिजेत.

किमिष्टमन्नं खरसूकराणां।
किं रत्नहारो मृगपक्षिणांच ॥
अंधस्य दीपो बधिरस्य गीतं।
मूर्खस्य किं शास्त्रकथाप्रसंगः ॥ ७४ ॥

गाढव आणि डुक्कर यांना अन्नाची रुचि समजणें शक्य नाहीं. तसेंच पशुपक्षांना रत्नांचा हार घालून उपयोग नाहीं. आंधळ्या माणसापुढें दिवा आणि बहिऱ्या माणसापुढें गाणें, व मूर्ख माणसांपुढें तत्त्वचिंतनाच्या गोष्टी या सर्व निरर्थक होत.

किं वाससा तत्र विचारणीयं।
वासः प्रधानं खलु योग्यतायाः ॥
पीतांबरं वीक्ष्य ददौ स्वकन्यां।
चर्मांबरं वीक्ष्य विषं समुद्रः ॥ ७५ ॥

पीतांबर परिधान करणाऱ्या भगवान् श्री महाविष्णूस क्षीरसमुद्रानें आपली कन्या श्रीमहालक्ष्मी अर्पण केली. आणि व्याघ्रांबर परिधान करणाऱ्या श्रीशंकरास हालाहल विष अर्पण केलें. यावरून कपड्याला महत्त्व नाहीं असें म्हणतां यत नाहीं. योग्यता कमी असली तथापि एखाद्या वेळीं कपड्यावरून सुद्धां मनुष्यास लोक मान देत असतात.

कुग्रामवासः कुलहीनसेवा।
कुभोजनं क्रोधमुखीच भार्या ॥

पुत्रश्च मूर्खो विधवाच कन्या।
विनाग्निना षट् प्रदहंति कायं ॥ ७६ ॥

महानदी किंवा राजा नाहीं अशा खेडेगांवीं राहाणें, नीच कुलोत्पन्न माणसाची सेवा करणें, शिळें व आंबलेलें अन्न खाणें, सदा रागावलेली बायको घरांत असणें, विद्याहीन मूर्ख मुलगा, व विधवा मुलगी घरांत असणें या सहा गोष्टी मनुष्याचे अंतःतकरणास अत्यंत तापदायक होत.

कुले कलंकः कवले कदन्नता।
सुतः कुबुद्धिर्भवने दरिद्रता ॥
रुजः शरीरे कलहप्रिया प्रिया।
गृहागमे दुर्गतयः षडेताः ॥ ७७ ॥

कुलावर कांहींतरी जनापवाद, नित्यभोजन शिळें किंवा आंबलेलें, मुलगा अप्रबुद्ध, घरांत अठरा विश्वे दारिद्र्य, शरीरांत नानाप्रकारचे रोग, पत्नी वाद-विवाद करून त्रास उत्पन्न करणारी, ह्या सहा गोष्टी मनुष्याच्या अधःपतनाला साधनें समजावीं. यामुळें मनुष्याला सुखाची आशा करण्याचें कारण नाहीं.

केलिं कुरुष्व परिभुंक्ष्व सरोरुहाणि।
गाहस्व शैलतटनिर्झरिणी पयांसि ॥
भावानुरक्तकरिणी करलालितांग।
मांतग मुंच मृगराज रणाभिलाषं ॥ ७८ ॥

हत्तीला उद्देशून एक गृहस्थ म्हणतो, हे गजा, तूं खुशाल क्रीडा कर, कमलांचा नाश करून तीं भक्षण कर, पर्वताच्या दरींतून निघालेल्या नदीच्या पाण्यांत मनसोक्त मज्जन कर, तुझ्यावर अनुरक्त असलेल्या करिणीपासून मनास वाटेल त्याप्रमाणें आपलें कौतुक करून घे, परंतु बाबा! रणामध्यें सिंहाशीं युद्ध करण्याची अपेक्षा मनांत सुद्धां आणूं नको, वरील सर्व गोष्टी बाजूस राहून सिंह एका प्रहारांत तुझा सत्यानाश करील.

क्रोशंतः शिशवः सवारि सदनं पंकावृतं चांगणं।
शय्या दंशवती च रुक्षमशनं धूमेन पूर्णं गृहं ॥
भार्या निष्ठुरभाषिणी प्रभुरपि क्रोधेन पूर्णः सदा।
स्नानं शीतलवारिणाहि सततं धिक् धिक् गृहस्थाश्रमं ॥७९॥

घरामध्यें सर्वदा मुलांचा रडून गोंधळ, पावसामुळें घरांत गळून अंगणांत चिखल झालेला, आंथरुणांत ढेकूण व पिसवा, शिळें कदन्नाचें खाणें, विस्तव पेटविला कीं घरांत धूर भरलेला, बायको कडकडा बोलणारी, मालक नेहमीं रागावलेला, नित्य थंडपाण्याचें स्नान अशा रीतीचा गृहस्थाश्रम मनुष्यास संतापदायक होतो. सबब वरील प्रकारच्या गृहस्थाश्रमास धिक्कार असो.

खल्वाटो दिवसेश्वरस्य किरणैः संतापितो मस्तके ।
वांच्छन् देशमनातपं विधिवशात् तालस्य मूलं गतः ॥
तत्राप्यस्य महाफलेन पतता भग्नं सशब्दं शिरः ।
प्रायो गच्छति यत्र भाग्यरहितः तत्रैव यांत्यापदः ॥ ८० ॥

डोक्याला केस नसलेला एक इसम उन्हाच्या संतापामुळें तप्त होऊन सावलीचा आश्रय करण्यासाठीं ताडाच्या झाडाखालीं गेला. तेथें याच्या दुर्दैवानें ताडाचें फळ झाडावरून सुटून याचे डोक्यावर पडून डोकें फुटलें. या सर्व गोष्टींवरून अभागी माणूस कोठेंही गेला, तथापि विपत्ति त्याला सोडीत नाहीं असें सिद्ध होतें.

खलः सर्षपमात्राणि परछिद्राणि पश्यति ।
आत्मनो बिल्वमात्राणि पश्यन्नपि न पश्यति ॥ ८१ ॥

दुष्ट माणूस दुसऱ्याचे मोहरीएवढे जरी बारीक दोष असले तरी पहातो; परंतु आपले स्वताःचे बेलफळाएवढे असून दिसण्यासारखे असले तथापि तिकडे पहात नाहीं. दुसऱ्याचे दोष उघड करून आपल्याकडे दुर्लक्ष्य करणें ही खलाची वृत्ति होय.

गजत्रातेति वृद्धाभिः श्रीकांत इति यौवतैः ।
यथास्थितश्च बालाभिः दृष्टः शौरिः सकौतुकं ॥ ८२ ॥

गोकुळामध्यें श्रीकृष्णानीं प्रवेश केला त्यावेळीं वृद्ध स्त्रियांनीं हा गज संरक्षण करणारा आहे या दृष्टीनें त्याकडे पाहिलें. लक्ष्मीशीं नित्य रममाण होणारा हा तिचा पति ह्या शृंगारदृष्टीनें तरुणींनीं त्याकडे पाहिलें व लहान कुमारिकांनीं आहे त्या स्वरूपतांच त्याचें कौतुक केलें. श्रीकृष्णमूर्ति एकच परंतु निरानिराळ्या दृष्टींनीं गोकुलांतील स्त्रियांनीं त्याजकडे पाहिलें.

गुरुरात्मवतां शास्ता राजा शास्ता दुरात्मनां ।
अथ प्रच्छन्नपापानां शास्ता वैवस्वतो यमः ॥ ८३ ॥

बुद्धिवान् लोकांना गुरु शासन करतो. दुष्ट लोकांना राजा शासन करितो आणि चोरून पापें करणारे जे नीच लोक त्यांना यमाच्या दरबारीं शिक्षा होत असते.

गते शोको न कर्तव्यो भविष्यं नैव चिंतयेत्।
वर्तमानेन कालेन वर्तयन्ति विचक्षणाः ॥ ८४ ॥

होऊन गेलेल्या गोष्टीबद्दल चिंता करणें, किंवा पुढें कसें होईल याबद्दल व्यर्थ विचार करीत राहणें यांकडे पंडित लोक लक्ष देत नाहींत, तर प्रस्तुत काय केलें पाहिजे याचा विचार करून त्या धोरणानें आचरण करणें हेंच शहाण्याचें खरें लक्षण होय.

गोविंदो मातुलो यस्य पिता यस्य धनंजयः।
अभिमन्यू रणे शेते नियतिः केन वार्यते ॥ ८५ ॥

श्रीकृष्ण परमात्मा मातुल, सव्यसाची धनंजय पिता, अशी स्थिति असतां अभिमन्यु रणामध्यें पतन पावला यावरून भवितव्य कोणास सुटत नाहीं हें सिद्ध होतें.

घृतकुंभसमा नारी तप्तांगारसमः पुमान्।
तस्मात् घृतंच वन्हिश्च नैकत्रं स्थापयेद् बुधः ॥ ८६ ॥

तुपाच्या घागरीप्रमाणें तात्काल वितळणारा स्त्रीस्वभाव, व साहजिक कामसंतप्त होणारा पुरुषस्वभाव अशी परिस्थिति असल्यामुळें प्रत्यक्ष पतिपत्नीखेरीज कोणाही इतर स्त्रीशीं एकांतांत राहूं नये.

धृष्टं धृष्टं पुनरपि पुनश्चंदनं चारु गंधं।
छिन्नश्छिन्नः पुनरपि पुनः स्वादुमानिक्षुदंडः ॥
दग्धं दग्धं पुनरपि पुनः कांचनं कांतवर्णं।
प्राणांतेऽपि प्रकृतिविकृतिर्जायते नोत्तमानाम् ॥ ८७ ॥

चंदन जितकें जास्त उगाळावें तितका त्यामध्यें सुवास जास्त, तसें उंसाचे जितके बारीक तुकडे कराल तितकी त्यांत रसाची गोडी जास्त. आणि सुवर्ण तापवावें तितकें पीतवर्ण जास्त, याप्रमाणें गोष्टी नजरेस पडतात व यावरून असें सिद्ध होतें कीं, कितीही विकृति झाली तथापि उत्तम वस्तू आपल्या मूळच्या प्रकृतीस सोडीत नाहींत.

घटं भिंध्यात् पटं छिंद्यात् कुर्याद् रासभरोहणम् ।
येन केन प्रकारेण प्रसिद्धः पुरुषो भवेत् ॥ ८८ ॥

लोकांच्या घागरी फोडाव्या, कपडे फाडावे किंवा गाढवावर बसावें. कोणतीही लोकविलक्षण गोष्ट करून प्रसिद्धीस यावें अशी मूर्खाची नेहमीं प्रवृत्ति असते.

चापाकृति धनुर्मासे मकरे कुंडलाकृति ।
कुंभे शीतमशीतं वा मीने शीतनिवारणं ॥ ८९ ॥

धनसंक्रमणांतील थंडीनें मनुष्य चापाकृति होतो. मकरसंक्रांतींत कुंडलाप्रमाणें वर्तुलाकृति होत असतो, कुंभसंक्रांतींत थंडी कमी ज्यास्त असून मीनसंक्रांत लागली ह्मणजे थंडी मुळींच पडत नाहीं, असा हवेमध्यें फरक पडत असतो.

चांडालः पक्षिणां काकः पशूनां चैव कुक्कुरः ।
कोपो मुनीनां चांडालः चांडालः सर्वनिंदकः ॥ ९० ॥

सर्व पक्षांमध्यें कावळा, पशूंमध्यें कुत्रा, तपस्वी मुनींमध्यें कोप आणि सर्वांची निंदा करणारा मनुष्य हे सर्व चांडाल होत.

चिता चिंता समायुक्ता बिंदुमात्रविशेषतः ।
सजीवं दहते चिंता निर्जीवं दहते चिता ॥ ९१ ॥

चिता आणि चिंता हे दोन्ही शब्द सारखेच आहेत. फक्त अनुस्वाराचा फरक आहे. सजीव मनुष्याला चिंता जाळीत असते व मनुष्य निर्जीव झाला म्हणजे त्यास चिता जाळीत असते, एवढाच दोन्हींमध्यें फरक आहे.

च्युता दंताः सिताः केशा वाङ्निरोधः पदे पदे ।
पातसज्जमिमं देहं तृष्णा साध्वी न मुंचति ॥ ९२ ॥

दांत पडले, केश पांढरे झाले, जीभ बोलतांना अडखळूं लागली, या सर्व लक्षणांवरून आतां देह पडण्यास अवकाश राहिला नाहीं. परंतु अद्याप आशा मात्र सोडीत नाहीं. प्राणोत्क्रमण झाल्यावांचून आशा सुटणें शक्य नाहीं.

जनिता चोपनेताच यश्च विद्यां प्रयच्छति ।
अन्नदाता भयत्राता पंचैते पितरः स्मृताः ॥ ९३ ॥

जन्म देणारा, उपनयन करणारा, विद्याध्ययन सांगणारा, अन्नोदक देऊन संरक्षण करणारा, आणि महाभयापासून सोडविणारा हे पांच आपल्या पित्याप्रमाणें समजून त्यांचेशीं तसें वर्तन करावें.

जन्मतः स्वजनदुःखकारिका ।
संप्रदानसमयेऽर्थहारिका ॥
यौवने महदनर्थकारिका ।
दारिका हृदयदारिका पितुः ॥ ९४ ॥

प्रसूतिसमयीं मुलगी झाली असें समजतांच घरांतील मंडळींना थोडें वाईट वाटतें. तसेंच विवाहप्रसंगीं पुष्कळसा पैसा खर्च करावा लागतो, आणि मुलगी यौवनावस्थेंत आल्यावर तिचे शीलसंवर्धनाबद्दल काळजी वाटत असते. एकंदरींत मुलगी जन्माला आल्यापासून ती आपल्या बापाचें अंतःकरण कातरणारी कातरीच वाटत असते.

जामाता जठरं जाया जातवेदा जलाशयः ।
पूरिता नैव पूर्यंते जकाराः पंच दुर्भराः ॥ ९५ ॥

जांवई, उदर, भार्या, अग्नि आणि समुद्र या पांचांची तृप्ति कांहीं केल्या होत नसते. यांना कितीही दिलें तथापि तीं असंतुष्टच असतात.

जातेति कन्या महती हि चिंता ।
कस्मै प्रदेयेति महान्वितर्कः ॥
दत्ता सुखं यास्यति वानवेति ।
कन्या पितृत्वं खलु नाम कष्टं ॥ ९६ ॥

कन्या जन्माला येतांच तिच्या पित्याला क्लेश उत्पन्न होतात. उपवर झाल्यावर कोठें द्यावी ही चिंता उत्पन्न होते. योग्य ठिकाणीं विवाह करून दिला तथापि पतीची मर्जी सांभाळून सासूसासऱ्यांच्या आज्ञेंत सुखानें राहील अगर कसें याप्रमाणें निरनिराळ्या विवंचना मागें लागत असल्यामुळें मुलीचा बाप होणें कष्टतर आहे.

जातः सूर्यकुले पिता दशरथः क्षोणीभुजामग्रणीः ।
सीता सत्यपरायणा प्रणयिनी यस्यानुजो लक्ष्मणः ॥
दोर्दंडेन समो न यस्य भुवने प्रत्यक्ष विष्णुः स्वयं ।
रामो येन विडंबितोऽपि विधिना चान्ये जने का कथा॥९७

तेजस्वी रविकुलामध्यें जन्म, दशरथासारखा जन्मदाता, साध्वी पतिव्रता सीतादेवी पत्नी, लक्ष्मणासारखा पाठीराखा बंधू, बाहुबलानें आणि युद्धकलेंत अद्वितीय, अशा श्रीरामचंद्रासमुद्धां नशिबानें वनवासाची पाळी आणली, मग तेथें इतर जनांची काय कथा, नशीब बलवत्तर आहे हें खास !

जीवनग्रहणे नम्रा गृहीत्वा पुनरुन्नताः ।
किं कनिष्ठाः किमु ज्येष्ठाः घटीयंत्रस्य दुर्जनाः ॥ ९८ ॥

रहाटगाडग्याचे मोघे पाणी घेणेचे वेळीं खालीं तोंड करून विहिरींत जातात आणि पाणी घेतांच वर तोंड करितात, तरी यांना सज्जन म्हणावें किंवा दुर्जन म्हणावें हें समजत नाहीं.

नीच लोक आपलें कार्य साधणेचे प्रसंगीं नम्र असतात व कार्यभाग पुरा होतांच उन्मत्त होत असतात अशी जनरीति आहे.

तक्षकस्य विषं दंते माक्षिकायाश्च मस्तके ।
वृश्चिकस्य विषं पुच्छे सर्वांगे दुर्जनस्य तत् ॥ ९९ ॥

सर्पाचें विष दांतामध्यें असतें. माशी मस्तकांत विष धारण करीत असते. विंचवाचें विष त्याच्या शेपटीच्या नांग्यामध्यें आहे.परंतु दुर्जन मनुष्याचे शरीरांत प्रत्येक ठिकाणीं विष असतें. विषारीपणांत वरील तिन्हींपेक्षां दुर्जनाला महत्त्व ज्यास्त सांगितलें आहे.

तृप्येन्न राजा धनसंचयेन ।
न सागरो भूमिजलागमेन ॥
न पंडितः साधु सुभाषितेन ।
तृप्येन्न चक्षुः प्रियदर्शनेन ॥ १०० ॥

प्रजेकडून कितीहि द्रव्य मिळालें तरी राजास समाधान वाटत नाहीं. वाटेल तितकें उदक समुद्रांत येऊन मिळालें तरी त्यास भरती येत नाहीं. गोड आणि चांगलीं कितीही सुभाषितें वाचलीं किंवा ऐकलीं तरी पंडिताची तृप्ति होत नाहीं. मनसोक्त सुंदर वस्तु पाहिल्या तरी डोळ्यांचें समाधान होत नाहीं. चांगल्या वस्तूची आवड असणें स्वाभाविकच आहे.

त्यजेदेकं कुलस्यार्थे ग्रामस्यार्थे कुलं त्यजेत् ।
ग्रामं जनपदस्यार्थे आत्मार्थे पृथिवीं त्यजेत् ॥ १०१ ॥

एकापासून कुलाचा नाश होत असेल त्याप्रसंगीं त्या कुलांतील एक माणसास दूर करावें, कुलामुळें ग्राम बिघडत असेल तर तें कुल गांवापासून दूर करावें. गांवापासून देशास पीडा होत असेल तर त्या गांवाचा त्याग करावा व आपल्यास जगापासून पीडा होत असेल, तर आपण देशांतर अगर प्राणत्याग करावा.

त्वं राजा वयमप्युपासितगुरुप्रज्ञाभिमानोन्नताः ।
ख्यातस्त्वं विभवैः यशांसि कवयो दिक्षु प्रतन्वंति नः ॥
इत्थं मानद नातिदूरमुभयोरप्यावयोरंतरं ।
यद्यस्मात्तु पराङ्मुखोसि वयमप्येकांततो निस्पृहाः ॥ १०२॥

राजा ! तुला राज्याचा गर्व झाला असेल तर मला सुद्धां गुरूपासून मिळालेल्या विद्येबद्दल अभिमान वाटत आहे. तूं पैसे देऊन दिगंत कीर्ति मिळवीत असलास तथापि माझ्या विद्येबद्दल कवी देशोदेशीं कीर्ति गात आहेत, यावरून तुझ्या माझ्यामध्यें फारसें अंतर आहे असें मला तर वाटत नाहीं, बरें इतकें असून तुला माझी जरूर नसेल तर, मलाही तुझी मुळींच जरूर नाहीं. मीही एकांतांत सुखानें राहण्यास तयार आहें.

तावत्सर्वगुणालयः पटुमतिः साधुः सतां वल्लभः ।
शूरः सच्चरितः कलंकरहितः मानीकृतज्ञः कविः ॥
यावन्निष्ठुरवज्रपातसदृशो देहीति नो भाषते ।
तस्मात् वाक्यमिदं मम शृणु सखे मा ब्रूहि दीनं वचः ॥१०३॥

मित्रा, जोंपर्यंत तूं कोणाकडे दीन मुद्रेनें याचना करणार नाहींस तोंपर्यंत तुला, सर्व गुणांचा सागर, बुद्धिमान्, योद्धा, सदाचारसंपन्न, मानी, कृतज्ञ आणि कवि, अशा नानाप्रकारच्या उत्तम विशेषणांनीं लोक गौरव करतील, पण जर तूं याचना करशील तर वरील सर्व तुझे गुण मातीमोल होतील. सबब माझें हितवाक्य ऐक आणि दीन मुद्रेनें कोणापाशीं याचना करूं नको.

तावदेव विदुषां विवेकिनी ।
बुद्धिरीस्तै भवबंधछेदिनी ॥
यावदिंदुवदना न कामिनी ।
वीक्षिता रहसि हंसगामिनी ॥ १०४ ॥

कितीही विद्वान् आणि विचारी पुरुष असला तरी जोंपर्यंत हंसगामिनी स्त्री एकांतीं पाहिली नाहीं तोंपर्यंतच त्याचे विचार स्थिर असतात, परंतु एकांतीं सुंदर तरुण स्त्रीचें दर्शन झालें कीं,चित्तवृति चंचल होऊन विचार नाहींसे होतात.

तीर्थे विवाहयात्रायां संग्रामे देशविप्लवे ।
नगरग्रामदाहेच स्प्रष्टास्प्रष्टिर्न दुष्यति ॥ १०५ ॥

मोठ्या तीर्थाचे ठिकाणीं, लग्नसमारंभांत, यात्रेचे प्रसंगीं, महायुद्धामध्यें, देशांत दुर्भिक्ष आलें असतां, गांवास भयंकर आग लागल्यावर स्पर्श दोष मानूं नये. स्पृश्यास्पृश्य विचार आपल्या घरापुरता करावा, घरांतून बाहेर पडल्यावर विशेष विचार करूं नये असा साधारण अर्थ दिसतो.

तीर्थानामवलोकनं परिचयः सर्वत्र वित्तार्जनं ।
नानाश्चर्यनिरीक्षणं चतुरता बुद्धेः प्रशस्ता गिरः ॥
ये ते संति गुणाः प्रवासविषये दोषोऽस्ति चैको महान् ।
यन्मुग्धा मधुरा धराधरसुधा पानंविना स्थीयते ॥ १०६ ॥

प्रवासामध्यें पवित्र तीर्थाचें दर्शन, निरनिराळ्या लोकांशीं परिचय, पुरे इतका पैसा, नयनमनोहर वस्तूंचें दर्शन, बुद्धीचें कौशल्य आणि बोधप्रद व चातुर्ययुक्त भाषण या सर्व गोष्टींचा फायदा होतो हें खरें आहे; तरी प्रवासांत पत्नी बरोबर नसल्यामुळें प्रपंचातील खरें सारसर्वस्व तेवढें मात्र प्रवासांत मिळत नाहीं. बाकी वरील सर्व गोष्टींचा लाभ होत असतो.

तुष्टो हि राजा यदि सेवकेभ्यः ।
भाग्यात् परं नैव ददाति किंचित् ॥
अहर्निशं वर्षति वारिवाहः ।
तथापि पत्रत्रितयः पलाशः ॥ १०७ ॥

सेवकाच्या सेवेपासून राजा कितीही संतुष्ट झाला तथापि देणगी सेवकाच्या नशीबाप्रमाणेंच मिळते. रात्रंदिवस पाऊस पडला तरी पळसाला पानें तीनच राहतात, त्याहून कधींही ज्यास्त होत नाहींत.

तैलात् रक्षेत् जलात् रक्षेत् रक्षेत् शिथिलबंधनात् ।
मूर्खहस्ते न दातव्यमेवं वदति पुस्तकं ॥ १०८ ॥

तेल, पाणी आणि शिथिल बंधन यांचेपासून माझें रक्षण करा व शिवाय मूर्ख माणसांच्या हातीं मला देऊं नका अशी पुस्तक प्रार्थना करीत असतें.

दृष्ट्वा यतिं यतिः सद्यो वैद्यो वैद्यं नटं नटः ।
याचको याचकं दृष्ट्वा श्वानवत् गुरगुरायते ॥ १०९ ॥

समानधर्मीयांचें त्याच धंद्यांतील माणसाशीं प्रेम रहात नाहीं. यति यतीशीं, वैद्य वैद्याशीं, नट नटाशीं, आणि याचक याचकांशीं एकमेकांचें दर्शन होतां कुत्र्याप्रमाणें गुरगुरत असतात. हा सर्वसाधारण स्वभावधर्म आहे.

दर्भहीना तु या संध्या तीलहीनं तु तर्पणं ।
संकल्पेन विना कर्म भोजनं दक्षणांविना ॥ ११० ॥

दर्भावांचून संध्या करणें, तिलाशिवाय ब्रह्मतर्पण किंवा पितृतर्पण करणें, संकल्पावांचून कोणत्याही कार्याला आरंभ करणें, आणि दक्षणेवांचून भोजन घालणें या सर्व गोष्टी निष्फळ होत.

दानाय लक्ष्मीः सुकृताय विद्या
चिंता परब्रह्म विनिश्चियाय ॥
परोपकाराय वचांसि तस्य
धन्यस्त्रिलोकी तिलकः स एकः ॥ १११ ॥

दानधर्माकडे लक्ष्मीचा उपयोग करणें. पुण्यसंचय करणेसाठीं विद्याध्ययन करणें, परब्रह्मविचार करणेसाठीं नेहमीं चिंता वाहावें आणि केवळ परोपकारासाठीं आपल्या वाणीचा उपयोग करणें. हे सर्व गुण ज्या पुरुषामध्यें असतील तो त्रैलोक्यधन्य समजावा.

द्वाविमौ पुरुषौ लोके नभूतो न भविष्यतः ।
प्रार्थितं यश्च कुरुते यश्च नार्थयते परं ॥ ११२ ॥

जो पुरुष कधींही याचना करीत नहीं तो एक व जो दुसऱ्याकडून मागणी येतांच ती पुरवितो तो एक. असे दोन प्रकारचे पुरुष जगामध्यें क्वचितच दृष्टीस पडतात.

द्राक्षादीनि फलानीक्षून् पयोमूलं घृतं दधि ।
तांबूलमौषधं पत्रं हविर्भुक्त्वापि नाचमेत् ॥ ११३ ॥

द्राक्षादिकरून फळें, ऊंस, दूध, बटाटे, रताळीं वगैरे मुळें, तूप, दहीं, विडा, औषध, आणि यज्ञाचा शेषभाग हें सेवन केल्यावर तोंड नाहीं धुतलें तरी चालण्यासारखें आहे.

दिनमेकशशीपूर्णः क्षीणस्तु बहुवासरान् ।
सुखात् दुःखं सुराणामप्यधिकं का कथा नृणां ॥ ११४ ॥

संसारांत सुखापेक्षां दुःखाचे दिवस केंव्हांही जास्त असतात. चंद्र एक दिवस पूर्ण स्वरूपवान् राहून २९ दिवस त्याला क्षीणावस्थेंत काढावे लागतात. ही देवांची स्थिति, तेथें मनुष्यांचा काय पाड ?

दिवा पश्यति नोलूकः काको नक्तं न पश्यति ।
अपूर्वः कोपि कामांधो दिवा नक्तं न पश्यति ॥ ११५ ॥

घुबडाला दिवसा दिसत नाहीं व कावळ्याला रात्रीं दिसत नाहीं; परंतु कामानें अंध झालेल्या माणसास दिवसां आणि रात्रीं दोन्ही वेळां दिसत नाहीं, कारण तो मदोन्मत्त झाला असल्यानें त्याला विचार असत नाहीं.

दुर्वृत्तसंगतिरनर्थपरंपरायाः
हेतुः सतां भवति किंवचनीय यत्र ॥
लंकेश्वरो हरति दाशरथेः कलत्रं
प्राप्नोति बंधनमसौ किल सिंधुराजः ॥ ११६ ॥

साधु पुरुषांनीं नीच लोकांची संगति केली कीं अनर्थपरंपरा ओढवते. लंकेश्वर रावणानें सीता देवीचा अपहार केला, परंतु बिचाऱ्या समुद्रास बंधनाचें प्रायश्चित्त भोगणें प्राप्त झालें. सबब साधु पुरुषांनीं दुर्जनसंगतीपासून अलिप्त असावें.

दुष्टा भार्या शठं मित्रं भृत्यश्चोत्तरदायकः ।
ससर्पे च गृहे वासो मृत्युरेव न संशयः ॥ ११७ ॥

दुराचरणी पत्नी, विश्वासघात करणारा मित्र, उत्तरास प्रत्युत्तर देणारा नोकर आणि सर्पांची कायम वस्ती असलेल्या घरांत राहणें हीं सर्व मृत्युच समजलीं जातात.

दुर्गं त्रिकूटः परिखा समुद्रः ।
रक्षांसि योधा धनदश्च भृत्यः ॥

सं जीवनीयस्य मुखाग्रविद्या ।
स रावणः कालवशात् विपन्नः ॥ ११८ ॥

समुद्राचा खंदक, त्रिकूट दुर्ग, राक्षसगण सैन्य, कुबेरासारखा द्रव्यवान् नोकर, संजीवनी विद्या मुखोद्गत, इतकी सामुग्री असतांना सुद्धां काल फिरतांच रावणास मृत्यूनें गांठलें, काल अनुकूल असेपर्यंत सर्व सुसूत्र चालत असतें. तोच प्रतिकूल झाला म्हणजे एकदम बिघडतें.

दुर्मंत्री राज्यनाशाय ग्रामनाशाय कुंजरः ।
शालको गृहनाशाय सर्वनाशाय मातुलः ॥ ११९ ॥

प्रधान वाईट असेल तर राज्याचा नाश होतो. मस्तीचा हत्ती गांवाचा विध्वंस करितो. मेहुण्यामुळें घराचा नाश होतो. मामाचे पायीं संपूर्णाचा नाश होतो.

धर्मशास्त्रार्थकुशलाः कुलीनाः सत्यवादिनः ।
समाः शत्रौ च मित्रेच नृपतेः स्युः सभासदः ॥ १२० ॥

राजकारणाचे कामीं सभासद नेमतेवेळीं राजानें खालील गुणांकडे अवश्य पहावें. सभासदांस धर्मशास्त्राचा अर्थ समजला पाहिजे. सभासद कुलीन व सत्य भाषण करणारे असावे आणि त्यानीं शत्रु व मित्र असा भेद न्यायाचे कामीं करूं नये. वरील गुणांनीं युक्त असेल तरच सभासद नेमावें.

धनिकः श्रोत्रियो राजा नदी वैद्यश्च पंचमः ।
पंच यत्र न विद्यंते न तत्र दिवसं वसेत् ॥ १२१ ॥

द्रव्याचा दानधर्माकडे उपयोग करणारा श्रीमान् गृहस्थ, शास्त्रशुद्ध आचार करणारा अग्निहोत्री, प्रजापालनतत्पर राजा, निरंतर वाहणारी नदी, सदाचार-संपन्न वैद्य हे पांच ज्या गांवीं नाहींत त्या गांवीं एक दिवस सुद्धां वसति करूं नये.

धनंजये हाटकसंपरीक्षा ।
महारणे शस्त्रभृतां परीक्षा ॥
विपत्तिकाले गृहिणी परीक्षा ।
विद्यावतां भागवते परीक्षा ॥ १२२ ॥

अग्नींत तापविल्यावांचून सुवर्णाची परीक्षा होत नाहीं. मोठ्या लढाईशिवाय शस्त्र धारण करणाऱ्या शूर पुरुषाची परीक्षा होत नाहीं. मनुष्य दारिद्र्यांत असला म्हणजे त्याच्या स्त्रीची खरी परीक्षा होत असते. व विद्वान् मनुष्याची परीक्षा भागवत ग्रंथावरून केली जाते, ह परीक्षेचे सर्व साधारण मार्ग होत.

धनानि भूमौ पशवश्च गोष्ठे ।
भार्या गृहद्वारि जनः स्मशाने ॥
देहश्चितायां परलोकमार्गे ।
कर्मानुगो गच्छति जीव एकः ॥ १२३ ॥

मनुष्याचें देहावसान झाल्यानंतर कृत कर्माचा जाब देणेसाठीं फक्त एकटा जीव परलोकीं जात असतो. बाकी इहलोकीं मिळविलेलें द्रव्य भूमींत राहून पशु गोशाळेंत राहतात. गृहाच्या द्वारापर्यंतच पत्नीनें पतीचे मृतदेहास पोंचविणेचें असतें व आप्तइष्ट, स्नेही स्मशानांत देहाची रक्षा झाल्यावर घरीं परत येत असतात. एकंदरींत इहलोकीं आपण ज्या वस्तूंवर प्रेम करीत असतों त्यांपैकीं बरोबर कोणी येत नाहीं, फक्त जिव मात्र स्वर्गास जातो.

न देवे देवत्वं कपटपटवः तापसजनाः ।
जनो मिथ्यावादी विरलतरवृष्टिर्जलधरः ॥
प्रसंगो नीचानां अवनिपतयो दुष्टमनसः ।
जना भ्रष्टा नष्टा अहह कलिकालः प्रभवति ॥ १२४ ॥

कलीचा प्रादुर्भाव झाल्यामुळें खालील गोष्टी घडून आल्या आहेत. देवतांना नवससायास केले असतां त्या पावत नाहींत, जादूटोणा वगैरे करून आपण तपस्वी आहों असें ढोंगी लोक सांगूं लागले, हरघडी असत्य बोलण्याची सर्व लोकांना बुद्धि झाली, पर्जन्य वक्रशीर पडेनासा झाला, नित्यव्यवहारांत नीच माणसांशीं प्रसंग येऊं लागले, राजेलोक दुर्बुद्ध व दुराचारी झाले, आणि सर्व लोक अनन्वित पोंतक करूं लागले आणि या सर्व गोष्टींमुळें धर्म बुडून सचगोलंकार झाला आहे.

नदीनां च नखीणां च शृंगीणां शस्त्रपाणिनां ।
विश्वासो नैव कर्तव्यः स्त्रीषु राजकुलेषुच ॥ १२५ ॥

नद्या, प्रखर नखें असलेले सिंहव्याघ्र वगैरे हिंस्र पशु, तीक्ष्ण शृंगें असलेले महिष, वृषभ वगैरे, उन्मत्त होऊन शस्त्र धरणारा माणूस, परपुरुषाशीं रममाण

होणारी स्त्री, आणि वर गोड बोलून अंतःकरणांत विष असलेले राजे या सर्वांवर शाहाण्या माणसानें विश्वास ठेऊं नये.

न दानेन न मानेन नार्जवेन न सेवया ।
न शस्त्रेण न शास्त्रेण सर्वथा विषमाः स्त्रियः ॥ १२६ ॥

अंगावर दागदागिने घालून, मोठा मान देऊन, प्रसंगीं आर्जव करून, वेळीं सेवाचाकरी करून; जरूर तर मारहाण करून आणि निदानपक्षीं शास्त्रांतील सदुपदेश सांगून स्त्रिया वश होतीलच असें कोणीही समजूं नये.

नालिका गतमपि कुटिलं न भवति सरलं शुनः पुच्छं ।
तद्वत् खलजनहृदयं बोधितमपि नैव याति माधुर्यं ॥१२७॥

कुत्र्याचें शेंपूट नळींत घातलें तथापि सरळपणा त्यास येत नाहीं, त्याप्रमाणेंच दुष्ट जनाच्या अंतःकरणास कितीही बोध केला तथापि त्यांतील कडूपणा जाऊन त्यांत गोडी उत्पन्न होत नाहीं. उपदेशाचा प्रकाश मूर्खांचे अंतःकरणांत होत नाहीं.

नराणां नापितो धूर्तः पक्षिणां चैव वायसः ।
चतुष्पदां शृगालस्तु स्त्रीणां धूर्ता च मालिनी ॥ १२८ ॥

मनुष्यामध्यें नापित, पक्ष्यांमध्यें कावळा, जनावरांमध्यें कोल्हा, आणि बायकांमध्यें माळीण, हीं चार धूर्त समजलीं जातात. आपला मतलब हीं केव्हांही साधीत असतात.

न नर्मयुक्तं वचनं हिनस्ति ।
न स्त्रीषु राजन्न विवाहकाले ॥
प्राणात्यये सर्वधनापहारे ।
पंचानृतान्याहुरपातकानि ॥ १२९ ॥

ज्यांमध्यें नुकसानी नाहीं असें भाषण चेष्टेचे प्रसंगीं केल्यास, तसेंच स्वस्त्रीशीं सुरतप्रसंगीं, आणि एखाद्याचा विवाह जमविणेचे काळीं, किंवा कोणाचा प्राण वांचविणेचे प्रसंगीं, व सर्व द्रव्याचा नाश होत असेल त्याप्रसंगीं अशा पांच वेळीं खोटें बोललें तरीपातक लागत नाहीं.

नृपतेः प्रतिषिद्धमेव तत् कृतवान् पंक्तिरथो विलंघयत् ।
अपथे पदमर्पयंतिहि श्रुतवंतोपि रजो निमीलिताः ॥ १३० ॥

युद्धाशिवाय क्षत्रियांनीं हत्तीचा वध करूं नये अशी क्षत्रियांची श्रुती असतां हत्ती समजून श्रवण ब्राह्मणावर दशरथ राजानें बाण कसा मारला तर समजूतदार माणसें अज्ञानाच्या मोहानें दूषित होऊन वाईट गोष्टींचें आचरण करितात असा नियम आहे व यामुळेंच दशरथराजाचे हातून ही चूक घडली आहे.

न गृहं गृह मित्याहुःगृहिणी गृहमुच्यते ।
गृहं तु गृहिणीहीनं कांतारादतिरिच्यते ॥ १३१ ॥

घरामध्यें बायको असली तरच त्या घराला शोभा असते व बायको असलेल्या घरालाच लोक घर असें म्हणतात. घरामध्यें बायको नसल्यास तें घर अरण्याहून उदास वाटत असतें.

न विषं विषमित्याहुः ब्रह्मस्वं विषमुच्यते ।
विषं एकाकिनं हंति ब्रह्मस्वं पुत्रपौत्रकं ॥ १३२ ॥

दुसऱ्याचें कर्ज देणें हा विषय विषापेक्षां भयंकर दारुण आहे. कारण विष प्राशन करणाऱ्यालाच पीडा करितें. कर्ज पुत्रपौत्रादिकांनाही पीडा करीत असतें. सबब कर्ज हें दारुण विष होय.

न गणस्याग्रतो गच्छेत् सिद्धे कार्ये समं फलं ।
यदि कार्यविपत्तिः स्यात् मुखरस्तत्र हन्यते ॥ १३३ ॥

बहुजनसमाजाचा पुढारी होऊन कोणतेंही काम करूं नये. कारण कार्यसिद्धि झाल्यास फल सर्वांना सारखेंच मिळत असतें, परंतु कार्यनाश झाला तर पुढाऱ्यांवर सर्व दोषारोप करीत असतात.

नरपतिहितकर्ता द्वेष्यतां याति लोके ।
जनपदहितकर्ता त्यज्यते पार्थिवेन ॥
इति महती विरोधे विद्यमाने समाने ।
नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता ॥ १३४ ॥

राजाचें हित साधल्यास प्रजा असंतुष्ट होते. प्रजेचें हित पाहिल्यास राजा नाखुष होतो. अशा बिकट परिस्थितींत राजा व प्रजा या उभयतांना संतुष्ट ठेऊन काम करणें अशक्य आहे. आणि म्हणूनच उभयपक्षांस संमत अशीं माणसें दुर्मिळ असतात.

न ध्यातं पदमीश्वरस्य सततं संसारविच्छितये।
स्वर्गद्वारकपाटपाटनपटुर्धर्मोऽपि नोपार्जितः॥
नारीपीनपयोधरोरुयुगुलं स्वप्नेपि नालिंगितं।
मातुः केवलमेव यौवनवनच्छेदे कुठारा वयं॥ १३५॥

भवसमुद्रांतून तरून जाणेसाठीं जन्माला आल्यापासून परमेश्वराचें नांव एकदां सुद्धां घेतलें नाहीं व सुखानें स्वर्गांत जाणेसाठीं एक पैसाही दानधर्म आमचे हातून झाला नाहीं. ऐहिक सुख पहावें तर अद्याप विवाह झाला नसल्यानें पत्नीसुखाचा अनुभव स्वप्नांतसुद्धां घेतला नाहीं. फक्त आमच्या जन्मामुळें मातोश्रींच्या यौवनाचा मात्र नाश झाला. यारेक्षां आमचा जगास कांहीं उपयोग झाला नाहीं.

नभोभूषा पूषा कमलवनभूषा मधुकरः।
वचोभूषा सत्यं वरविभवभूषा वितरणं॥
मनोभूषा मैत्री मधुसमयभूषा मनसिजः।
सदोभूषा सूक्तिः सकलगुणभूषाच विनयः॥ १३६॥

चंद्रामुळें आकाशास शोभा येते व मधुकरामुळें कमलाच्या ताटव्यास शोभा येते. तसेंच वाणीचें भूषण सत्य असून द्रव्यसंचयाचें भूषण सत्पात्रीं दान हें आहे. मैत्री असल्यानें मनास समाधान वाटतें व मदनाच्या पंचशरांनीं मधुमासाला शोभा येते. सभेमध्यें तत्त्वचिंतनासारखा वादविवाद चालल्यानें शोभा येत असते आणि संपूर्ण गुण असले तथापि त्यांना विनयावांचून शोभा येत नाहीं.

नान्नोदकसमं दानं न तिथिर्द्वादशीसमा।
न गायत्र्याः परो मंत्रः न मातुः परदैवतं॥ १३७॥

दानामध्यें अन्न आणि उदक, तिथींमध्यें द्वादशी, एकंदर मंत्रांमध्यें गायत्री मंत्र आणि सर्व देवतांमध्यें मातृदैवत श्रेष्ठ होय.

नारी नश्यति रूपेण तपः क्रोधेन नश्यति।
स्नेहो दूरप्रवासेन शूद्रान्नेन द्विजोत्तमः॥ १३८॥

देदीप्यमान रूपाच्या योगानें स्त्री, क्रोधामुळें तपश्चर्या, दूर प्रवासास गेल्यानें मैत्री, आणि शूद्रान्न सेवन केल्यानें ब्राह्मणत्व हीं सर्व नाश पावत असतात.

नापितस्य गृहे क्षौरं पाषाणे गंधलेपनं ।
आत्मरूपं जले दृष्टं शक्रस्यापि श्रियं हरेत् ॥ १३९ ॥

न्हाव्याच्या घरीं हजामत करविणें, सहाणेवरच बोटानें गंध लावणें, आणि स्वतःचें रूप पाण्यांत पाहणें यांपैकीं कोणतीही एक गोष्ट केली तरी इंद्राचीसुद्धां लक्ष्मी नाहींशी होते, मग मनुष्याची होईल यांत शंका नाहीं.

नाभिषेको न संस्कारः सिंहस्य क्रियते वने ।
विक्रमार्जितराज्यस्य स्वयमेव मृगेंद्रता ॥ १४० ॥

सिंहानें स्वपराक्रमानें अरण्यांत पशूंच्या राजाचें स्थान मिळविलें आहे.त्याला राजपदावर कोणीं बसवावें लागलें नाहीं किंवा कोणताही राजसंस्कार करणेचें कारण पडलें नाहीं. सिंह हा स्वयंशूर मृगराज आहे.

नागो भाति मदेन कं जलरुहैः पूर्णेंदुना शर्वरी ।
वाणी व्याकरणेन हंसमिथुनैर्नद्यः सभा पंडितैः ॥
शीलेन प्रमदा जवेन तुरगो नित्योत्सवैर्मंदिरं ।
सत्पुत्रेण कुलं फलैर्वसुमती लोकत्रयं शंभुना ॥ १४१ ॥

मस्तीच्या योगानें हत्ती, कमळांच्या योगानें उदक, पूर्ण चंद्रानें रात्री, व्याकरणानें वाणी, हंसांच्या जोडप्यांनीं नद्या, पंडितांच्यामुळें सभा, उत्तम स्वभावानें बायका, चांगल्या चालीमुळें अश्व, नेहमीं उत्सव होत असल्यामुळें मंदिर, गुणवान् मुलांमुळें कुल, धनधान्यानें पृथ्वी आणि भगवान् श्रीशंकरांमुळें त्रैलोक्य ह्या सर्वांना शोभा येते.

निर्वाणदीपे किमु तैलदानं ।
चौरे गते वा किमु सावधानं ॥
वयोगते किं वनिताविलासः ।
पयोगते किं खलु सेतुबंधः ॥ १४२ ॥

दिवा गेल्यानंतर तेल घालणें, तसेंच चोर निघून गेल्यानंतर जागें होणें आणि वृद्धपणीं आपल्या पत्नीशीं सुखोपभोग घेणें किंवा पाणी निघून गेल्यानंतर सेतू बांधणें या सर्व गोष्टी वेळ निघून गेल्यावर झाल्यामुळें व्यर्थ होत.

निमग्नस्य पयोराशौ पर्वतात् पतितस्यच ।
तक्षकेनापि दष्टस्य आयुर्मर्माणि रक्षति ॥ १४३ ॥

समुद्राच्या पाण्यांत बुडत असतां, पर्वतशिखरावरून खालीं पडत असतां, आणि तक्षकानें दंश केला असतां, आयुष्य असेल तर मनुष्याचा बचाव झाल्यावांचून रहात नाहीं.

नियुक्तहस्तार्पितराज्यभाराः ।
तिष्ठंति ये सौधविहारसाराः ॥
बिडालवृंदार्पितदुग्धपूराः ।
स्वपंति ते मूढधियः क्षितींद्राः ॥ १४४ ॥

मंत्र्यांच्या स्वाधीन राज्यभार सोंपवून जे राजे नेहमीं स्वसुखाच्या मार्गे लागतात त्यांची स्थिति मांजरांच्या स्वाधीन दुधाचें भरलेलें भांडें केल्याप्रमाणें होत असते. दुधाविषयीं जसा मांजरावर विश्वास ठेवतां कामा नये तसाच राज्याविषयीं केवळ मंत्र्यावर विश्वास ठेऊं नये.

निकटस्थं दहत्यग्निर्नतु दूरापसर्पितं ।
कुलं दहाति राजाग्निः सपशुद्रव्यबांधवान् ॥ १४५ ॥

जवळ असलेली वस्तु जाळणें असा अग्नीचा सर्वसाधारण धर्म आहे; परंतु राजकोपाग्नि भडकला म्हणजे एखाद्याचें कुळ, पशु आणि त्याचे भाऊबंद, यांचा सुद्धां नाश करीत असतो.

निःस्वो वष्टिगतं शती दशशतं लक्षं सहस्राधिपः ।
लक्षेशः क्षितिराजतां क्षितिपतिः चक्रेशतां वांच्छति ॥
चक्रेशः सुरराज्यतां सुरपतिर्ब्रह्मास्पदं वांच्छति ।
ब्रह्मा विष्णुपदं हरिः शिवपदं तृष्णावधिः को गतः ॥ १४६ ॥

एक पैहि ज्याचेजवळ रहात नाहीं त्याला आपलेजवळ शंभर रुपये असावे असें वाटतें. ज्याजवळ शंभर रुपये असतील तो हजाराची इच्छा करितो. हजाराला दहाहजाराची इच्छा असते व दहा हजार असणारा माणूस लक्ष असावे असें म्हणत असतो. लक्ष जवळ असल्यास तो राज्याची इच्छा करितो, राज्य मिळाल्यास सार्वभौम राजा व्हावेंसें वाटत असतें. सार्वभौम राजाला इंद्रपदाची आशा असते, इंद्र ब्रह्मपद मागतो; ब्रह्मा विष्णुपदाची इच्छा करतो; व हरि शिव-

पदाची इच्छा करितो. एकंदरींत अति दारिद्री माणसापासून शंकरापर्यंत आहे त्यांत समाधान मानणारा कोणीहि नाहीं. सर्व आशेच्या आधीन आहेत.

परोपदेशसमये जनाः सर्वेपि पंडिताः।
तदनुष्ठानसमये मुनयोपि न पंडिताः॥ १४७ ॥

दुसऱ्याला उपदेश करणेचे प्रसंगीं सर्व लोक मोठ्या पांडित्याच्या गोष्टी सांगतात, परंतु स्वतःवर प्रसंग आल्यास ऋषि लोकसुद्धां पांडित्य सोडून आचरण करीत असतात.

परान्नेन मुखं दग्धं हस्तौ दग्धौ प्रतिग्रहात्।
परस्त्रीभिर्मनोदग्धं कुतः शापः कलौ युगे॥ १४८ ॥

नित्य परान्न सेवन केल्यानें मुख, तसेंच रोज दानप्रतिग्रह घेण्यामुळें हात, आणि परस्त्रीविषयीं चर्चा करण्यामुळें मन अशीं दूषित झाल्यामुळें, मनुष्याचें पुण्य क्षीण होत असतें. व या सर्व कारणांमुळें कलियुगांत शाप देण्याचें सामर्थ्य कोणाजवळ राहिलें नाहीं. आणि कदाचित् शाप दिला तरी त्याचा उपयोगही होत नाहीं.

पथि च्युतं तिष्ठति दैवरक्षितं गृहे स्थितं दैवहतं विनश्यति॥
जीवत्यनाथोपि वने विसर्जितः कृतप्रयत्नोपि गृहे न जीवति
॥ १४९ ॥

नशिबीं असेल तर रस्त्यांत पडलेली सुद्धां आपली वस्तु मिळेल. नशिबीं नसेल तर घरांत संरक्षण केली तथापि आपली वस्तु जाईल. आयुष्य असल्यास अनाथ माणूस झाडाखालीं ठेविला तरी जगतो, परंतु आयुष्य नसेल तर वाटेल तितके प्रयत्न केले तरी घरांत जगत नाहीं.

परान्नं परवस्त्रं च परशय्याः परस्त्रियः॥
परवेश्मानि वासश्च शक्रस्यापि श्रियं हरेत्॥ १५० ॥

परगृहीं अन्नसेवन, दुसऱ्याचें वस्त्र अंगावर घेणें, दुसऱ्याचे अंथरुणावर निजणें, दुसऱ्याचे बायकोशीं संग करणें, परक्याचे घरीं वास करणें, या सर्व गोष्टी गौण असल्यानें त्या वर्ज्य समजाव्या. या सेवन केल्यानें प्रत्यक्ष देवेंद्राचें सुद्धां महत्व कमी होतें, मग मनुष्याची काय कथा.

परवादः परस्वेच्छा परिहासं परस्त्रियः ॥
परवेश्मनि वासश्च न कुर्वीत कदाचन ॥ १५१ ॥

स्नेहाचा भंग होईल अशा रीतीनें दुसऱ्याशीं वाद करणें, संबंध नसतां दुसऱ्याचे द्रव्याची आशा असणें, कोणत्याही परस्त्रीशीं थट्टा आणि नेहमीं परक्याच्या घरीं वसति करणें या गोष्टी वर्ज्य समजाव्या.

परसेवा सुखं हंति प्राणं हन्युः परास्त्रियः ।
परान्नं सुकृतं हंति ब्रह्मद्वेषो कुलक्षयः ॥ १५२ ॥

सुखाची अपेक्षा असल्यास परसेवा करूं नये. परस्त्री केल्यास प्रसंगीं मृत्यु प्राप्त होतो. परान्न सेवन केल्यानें कांहीं पुण्यकर्म केलें असल्यास त्याचा नाश होतो. आणि ब्राम्हणाचा द्वेष केल्यास कुलाचा क्षय होत असतो, सबब वरील गोष्टी वर्ज्य कराव्या.

पंचभिः सहगंतव्यं स्थातव्यं पंचभिः सह ।
पंचभिः सहवक्तव्यं न दुःखं पंचभिःसह ॥१५३ ॥

दूरचा प्रवास, वसती किंवा संभाषण हीं केव्हांही पांच माणसांचे संगतीनें करावीं. म्हणजे सुख किंवा दुःख उत्पन्न झाल्यास ते समभागी होतात व आपल्यास क्लेश होत नाहींत.

पक्षिणां बलमाकाशं मत्स्यानां उदकं बलं ।
दुर्बलस्य बलं राजा बालानां रोदनं बलं ॥ १५४ ॥

पक्षी आकाशांत, मत्स्य जलांत बलवान् असतात. गरीब व दीन मनुष्यास राजाचें पाठबळ असावें लागतें. तसें लहान मुलांना रोदन करणें हेंच त्यांचे शक्तिसामर्थ्य होय. मुलांना रोदन केल्यावांचून कांहीं मिळत नाहीं.

पलाशमुकुलभ्रांत्या शुकतुंडे पतत्यलिः ।
सोपि जंबूफलभ्रांत्या तमालिं धर्तुमिच्छति ॥ १५५ ॥

पळसाचें फूल समजून शुकाचे चोचींवर भ्रमर बसला. शुकाला भ्रमर हा जांभूळ आहे असें वाटून त्यानें भ्रमरास धरण्याचा प्रयत्न केला. या ठिकाणीं अन्योन्य भ्रांति झाली व शेवटीं दोघेही पश्चाताप पावले. सुखाच्या आशेनें प्रपंचांत गुरफटणाऱ्या लोकांची हीच स्थिति होत असते.

प्रयत्ने समके केचिदेव स्युः फलभोगिनः ।
क्षीरोदमथनाद्देवैरमृतं प्रापि नासुरैः १५६ ॥

प्रयत्न दोघांनीं सारखेच केले तथापि फल सारखेंच मिळेल अशी आशा धरूं नये. देव आणि दानव यांनीं समुद्रमंथन केलें तथापि अमृत देवांनाच मिळालें. असुरांना मिळालें नाहीं. तेव्हां फलप्राप्ति भाग्यानुसार मिळत असते, हा सिद्धांत होय.

परोपदेशपांडित्ये शिष्टाः सर्वे भवंतिवै ।
विस्मरंतीह शिष्टत्वं स्वकार्ये समुपस्थिते ॥ १५७ ॥

दुसऱ्याला उपदेश करणेचे प्रसंगीं सर्व लोक शिष्ट व प्रतिष्ठितपणानें करीत असतात. परंतु तोच प्रसंग आपल्यावर आल्यास तो शिष्टपणा व प्रतिष्ठितपणा विसरून जाण्याचा जनाचा रिवाज आहे.

प्रथम दिवस चंद्रः सर्वलोकैकवंद्यः ।
सच सकलकलाभिः पूर्णचंद्रो न वंद्यः ॥
अतिपरिचयदोषात् कस्य नोमानहानिः ।
नव नव गुणरागी प्रायशः सर्वलोकः ॥ १५८ ॥

शुद्ध प्रतिपदेच्या चंद्राचें दर्शन सर्व लोक मोठ्या भक्तीनें व प्रेमानें घेत असतात. परंतु तो मान पौर्णिमेच्या चंद्रास मिळत नाहीं. यावरून सर्व लोकांना नवीन वस्तूबद्दल प्रेम वाटत असल्यानें जुन्याची मानहानि होणें स्वाभाविक आहे. प्रतिपदेच्या चंद्रामध्यें नवीनत्व आहे व पौर्णिमेच्या चंद्रांत तें महत्त्व नाहीं. यामुळें त्याची मानहानि होत असते.

पत्रं नैव यदा करीरविटपे दोषो वसंतस्य किं ।
नोलूकोप्यवलोकयते यदि दिवा सूर्यस्य किं दूषणं ॥
धारा नैव पतंति चातकमुखे मेघस्य किं दूषणं ।
यद्धात्रा निजभालपट्टलिखितं तत् प्रोज्झितुं कः क्षमः॥१५९

वसंत ऋतूंत सर्व वृक्षांना पालवी फुटते परंतु बांबू नांवाच्या वृक्षास पालवी फुटत नाहीं. हा वसंताचा दोष नव्हे, तसेंच सूर्याचा प्रकाश सर्व जगाला आनंददायक असून घुबडास त्यापासून पीडा होते हा सूर्याचा दोष नव्हे.

पर्जन्यकालांत पाऊस पडत असतां मेघांची वृष्टि चातकाच्या मुखांत क्वचित् प्रसंगीं होते, हा दोष मेघांचा नव्हे, तर ब्रह्म देवानें नशिबीं जें लिहिलें असेल त्याप्रामाणें तसें घडत असतें. तें लिहिलेलें पुसून टाकतां येणें शक्य नाहीं.

प्रातः स्नानं गवां सेवा आरामः पुष्पवाटिकां ।
मात्रापित्रोश्च शुश्रूषा शास्त्रायच सुखायच ॥ १६० ॥

सूर्योदयापूर्वी स्नान, गाईची सेवा करणें व फुलाचे बागेंत वसति करणें आणि आईबापांची सेवा करणें; या सर्व गोष्टी ऐहिक व पारलौकिक दोन्ही सुखांला कारणीभूत आहेत, सबब अवश्य कराव्या.

पात्रे त्यागी गुणे रागी संविभागीच बंधुषु ।
शास्त्रे बोद्धा रणे योद्धा पुरुषः पंच लक्षणम् ॥ १६१ ॥

सत्पात्रीं दान करणें, योग्य गुणांचें ग्रहण करणें, आपल्याजवळील संपत्ति आपल्या आप्तबांधवांस देणें, शास्त्राचा अर्थ समजून घेऊन त्याप्रमाणें आचरण करणें आणि रणसंग्रामामध्यें युद्धनिपुणता दाखविणें हीं उत्तम पुरुषाचीं पांच लक्षणें आहेत.

प्रातर्द्यूतप्रसंगेन मध्यान्हे स्त्रीप्रसंगतः ।
रात्रौ चौरप्रसंगेन कालो गच्छति धीमतां ॥ १६२ ॥

सकाळीं महाभारत वाचून, मध्य रात्रीं रामायण व रात्रौ भागवत असे ग्रंथ वाचून शाहणे लोक कालक्षेप करीत असतात.

द्यूतप्रसंग महाभारतांत वर्णिला असून सीतादेवीची कथा रामायणांत आहे व भागवतांत श्रीकृष्णाच्या चोरीसंबंधानें वगैरे वर्णन आहे. असा वरील श्लोकाचा भावार्थ आहे.

प्राप्य चलानधिकारान् शत्रुषु मित्रेषु आप्तवर्गेषु ।
नापकृतं नोपकृतं न सत्कृतं किंकृतं तेन ॥ १६३ ॥

राजदरबारीं मिळालेले अधिकार चंचल असतात. सबब ते अधिकार हातांत असेपर्यंत शत्रूवर अपकार, मित्रावर उपकार, आणि आप्तवर्गाचा सत्कार जर करून घेतला नाहीं तर त्याचे अधिकारप्राप्तीचा त्यानें उपयोग करून घेतला नाहीं असें म्हणणें भाग पडतें.

पादेन क्रम्यते पन्था मानहीनंच भोजनं ।
अविवेकी प्रभोः सेवा पातकं किमतः परं ॥ १६४ ॥

वहानावांचून नेहमीं प्रवास करणें, प्रतिष्ठेवांचून दुसऱ्याचे घरीं नित्य जेवणास जाणें, आणि उन्मत्त व अविचारी राजाची चाकरी करणें हीं तीन महापातकें होत.

पातकानां समस्तानां द्वे पटे तात पातके ।
एकं दुःसचिवो राजा द्वितीयं च तदाश्रयः ॥ १६५ ॥

जगामध्यें अनंत पातकें असलीं तथापि त्यांत दोन पातकें मोठीं आहेत. एक राजाजवळ वाईट आचरण करणारा मंत्री असणें, आणि दुसरें अशा राजाचा आश्रय करणें हीं दोन महापातकें होत.

पांडित्यस्य विभूषणं मधुरता शौर्यस्य वाक्संयमः ।
ज्ञानस्योपशमः श्रुतस्य विनयो वित्तस्य पात्रे व्ययः ॥
अक्रोधस्तमसः क्षमा प्रभवतोर्धर्मस्य निर्व्याजता ।
सर्वस्यास्य पुनस्तथैव जगतः शीलं परं भूषणं ॥ १६६ ॥

विद्वानांच्या स्वभावांत गोडी पाहिजे, शूर मनुष्यानें वाचाळ असूं नये, ज्ञानी मनुष्य शांत असावा, विद्यावंताला विनय असावा, धनिकानें सत्पात्रीं दान करावें, तपस्वी मनुष्य शांत असावा, मोठ्या माणसामध्यें क्षमा असावी, धर्म करण्यामध्यें कपट असूं नये. ज्या त्या ठिकाणीं हे गुण असून सर्वांमध्यें शील हा गुण अवश्य असला पाहिजे. सर्वांत शीलाला अग्रस्थान आहे.

पिताच ऋणवान् शत्रुर्माताच व्यभिचारिणी ।
भार्या रूपवती शत्रुः पुत्रः शत्रुरपंडितः ॥ १६७ ॥

अस्थानीं खर्च करून कर्ज करणारा बाप, परपुरुषाशीं जारकर्म करणारी आई, देदीप्यमान रूप असणारी बायको, आणि मूर्ख व व्यवहार न समजणारा मुलगा हीं सर्व शत्रु होत. रूपवती असून पतिव्रता असल्यास ती स्त्री शत्रु नव्हे.

पिबंति नद्यः स्वयमेव नांभः ।
स्वयं न खादति फलानि वृक्षाः ।
पयोमुचांभः कचिदस्ति पास्यं ।
परोपकाराय सतां विभूतयः ॥ १६८ ॥

नद्या स्वतः पाणी पीत नाहींत, वृक्ष आपलीं फळें स्वतः भक्षण करीत नाहींत, मेघांच्या पाण्याचा उपयोग मेघांस होत नाहीं. या वरील तीनही गोष्टींचा उपयोग दुसऱ्यांना होत असतो. दुसऱ्यासाठीं कष्ट सोसणें हें साधूंचें लक्षण आहे.

पिता रत्नाकरो यस्य लक्ष्मीर्यस्य सहोदरी ।
शंखो भिक्षाटनं कुर्यात् फलं भाग्यानुसारतः ॥ १६९ ॥

सर्व रत्नांचे आगर जो समुद्र त्याचे पासून जन्म, त्रैलोक्यलक्ष्मी सख्खी बहीण, अशी स्थिति असून शंखाला भिक्षाटन करावें लागतें. याचें कारण फक्त आपल्या भाग्याप्रमाणें फळ मिळत असतें. तेथें थोरांचा संबंध उपयोगी पडत नाहीं.

पिताचार्यः सुहृन्माता भार्या पुत्रः पुरोहितः ।
नादंड्यो नाम राज्ञोस्ति यः स्वधर्मे न तिष्ठति ॥ १७० ॥

जो आपल्या धर्माप्रमाणें आचरण करीत नाहीं त्याला राजानें शासन केलेंच पाहिजे, मग तो प्रत्यक्ष बाप असो, किंवा आचार्य, मित्र, आई, बायको, मुलगा किंवा पुरोहित कोणी असो, राजानें त्यास योग्य शासन केलेंच पाहिजे.

पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने ॥
पुत्रस्तु स्थाविरे भावे न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ॥१७१ ॥

मुलीचें संरक्षण लग्नापूर्वीं पिता करीत असतो, विवाहानंतर ती जबाबदारी पतीवर येते आणि वृद्धपणीं पुत्रानें मातेचें संरक्षण करावें. यावरून स्त्रीला कोणत्याही वयांत स्वतंत्रता नाहीं, हें सिद्ध होतें.

प्रियाचक्षुर्मध्यस्तनवदनसौंदर्यविजितैः ।
अरण्यं सारंगैर्गिरिकुहरगर्भाश्च हरिभिः ॥
दिशो दिग्मातंगैः सलिलमुषितं पंकजवनैः ।
संतां माने म्लाने मरणमथवा दूरगमनः ॥ १७२ ॥

सुंदर स्त्रीच्या नेत्र कटाक्षांनीं हरिणास जिंकिलें, सबब त्यांनीं अरण्यांत पलायन केलें. सिंहकटि असल्यामुळें सिंहांनीं पर्वताच्या शिखराचे गुहेंत वस्ती केली, स्तन हत्तीच्या गंडस्थळाप्रमाणें असल्यानें गजानीं दश दिशांस पलायन केलें. तिचें मुख कमलापेक्षां सुंदर असल्यानें कमलांनीं पाण्यामध्यें बुडी मारली. एकंदरींत सुंदर स्त्रीच्या अवयवांनीं पराभव केल्यामुळें हरिण, सिंह, गज आणि

कमळें यांनीं पलायन केलें. मानखंडना झाल्यावर साधु पुरुष देहत्याग, किंवा देशत्याग करीत असतात हा भावार्थ आहे.

पुष्पेषु चंपा नगरीषु लंका नदीषु गंगाच नृपेषु रामः ।
योषित्सु रंभा पुरुषेषु विष्णुः काव्येषु माघः कविकालिदासः१७३

फुलांमध्यें चाफा, नगरींमध्यें लंका, नदींमध्यें गंगा, राजामध्यें श्रीराम, बायकांमध्यें रंभा, पुरुषांमध्यें महाविष्णु, काव्यांमध्यें माघकाव्य आणि कवींमध्यें कालिदास हे सर्वश्रेष्ठ होत.

पौलस्त्यः कथमन्यदारहरणे दोषं न विज्ञातवान् ।
अक्षैश्चापि युधिष्ठिरेण रमता प्राप्तोन दोषोनु किं ॥
रामेणापि वने न हेमहरिणस्यासंभवो लक्षितः ।
प्रत्यासन्नविपत्तिमूढमनसां प्रायो मतिः क्षीयते ॥ १७४ ॥

श्रीशंकरभक्त रावणास दुसऱ्याची बायको चोरून नेणें हें पातक आहे ही गोष्ट समजली नसेल काय ?

द्यूत खेळूं नये, खेळल्यास पण लावूं नये व पण लावणेचा प्रसंग आल्यास बायको लावूं नये, आणि लावणेंच झाल्यास पांच माणसांच्या मालकीची बायको आपण पणास लावूं नये इतक्या गोष्टी युधिष्ठिराच्या लक्षांत आल्या नसतील काय ?

जगतास निर्माण करणाऱ्या श्रीरामचंद्राला वनांत सोन्याचा हरिण येणें शक्य नाहीं हें समजलें नसेल काय ?

या वरील तीनही गोष्टींवरून मनुष्यावर विपत्ति येणेचा प्रसंग आल्यास त्याची बुद्धि नाश होत असते व त्याचे हातून असंभाव्य गोष्टी होऊन त्यांचे परिणाम भोगण्याची पाळी येत असते असें सिद्ध होतें.

ब्रह्महत्या सुरापानं स्तेयं गुर्वंगनागमः ।
महांति पातकान्याहुः तत्संर्गीच पंचमः ॥ १७५ ॥

ब्राह्मणाचा वध करणें, सुरापान करणें, सुवर्णाची चोरी आणि गुरुपत्नीशीं समागम करणें हीं चार महापातकें समजावीं व या चार माणसांशीं संबंध ठेवणाराही वरीलप्रमाणेंच महापातकी समजावा.

ब्रह्महत्यादिपापानां कथंचित् निष्कृतिर्भवेत् ।
विश्वासघातकानां तु निष्कृतिर्नास्ति कुत्रचित् ॥ १७६॥

ब्रह्महत्येसारखीं महापातकें प्रायश्चित्तानें क्षालन करतां येतात. परंतु विश्वासघाताचे पातकास कोठेंही प्रायश्चित्त सांगितलें नाहीं. तें पातक अत्यंत मोठें समजलें जातें.

बव्हाशी स्वल्पसंतुष्टः सुनिद्रः शीघ्रचेतनः ।
प्रभुभक्तश्च शूरश्च ज्ञातव्याः षट् शुनो गुणाः ॥ १७७ ॥

पुष्कळ खाणारा, परंतु थोडक्यांन संतुष्ट, झोपेमध्यें तत्काल जागरूक होणारा, एकदम तुटून दुसऱ्यांवर जाणारा, आपल्या मालकास ओळखणारा, आणि शूर असे सहा गुण कुत्र्यामध्यें वास करीत असतात.

बालार्को यज्ञधूमश्च बालस्त्री निर्झरोदकं ।
आयुष्यं वर्धते नित्यं रात्रौच पयभोजनं ॥ १७८ ॥

सकाळचें ऊन्ह, यज्ञाचा धूर, आपल्यापेक्षां तरुण स्त्री, आणि सतत वाहणाऱ्या झऱ्याचें पाणी या गोष्टी आणि रात्रीं भोजनाचे वेळीं दूध सेवन केल्यानें मनुष्यांचें आयुष्य वृद्धिंगत होतें.

बालसखित्वमकारणहास्यं ।
स्त्रीषु विवाहमसज्जनसेवा ॥
गर्दभयानमसंस्कृतवाणी ।
षट्सु नरो लघुतामुपयाति ॥ १७९ ॥

आपल्यापेक्षा लहान मुलाशीं मैत्री करणें, कारणावांचून हंसणें, बायकांशीं वादविवाद करणें, मूर्ख लोकांची सेवा करणें; गाढवावर बसणें आणि अश्लील व बीभत्स भाषण करणें या सहा गोष्टींनीं मनुष्यास कमीपणा येत असतो.

बालत्वेच मृता माता वृद्धत्वेच मृताः सुताः ।
यौवनेच मृता भार्या पातकं किमतः परं ॥ १८० ॥

बालपणीं आईचा वियोग, वृद्धपणीं पुत्रशोक, लग्न करणेचें वय नाहीं अशा परिस्थितींत पत्नीचें मरण, या तीन गोष्टी अत्यंत पातकी मनुष्यास भोगाव्या लागतात.

बालोऽपि नावमंतव्यो मनुष्य इति भूमिपः ।
महती देवता ह्येषा नररूपेण तिष्ठति ॥ १८१ ॥

राजा अल्पवयी असला तथापि त्याचा अपमान करूं नये. कारण राजा मनुष्य असला तथापि त्याचे ठिकाणीं राजलक्ष्मी या नांवाची एक मोठी देवता वास करीत असते. सबब राजाचा केव्हांही अपमान करूं नये.

भर्ता देवो गुरुर्भर्ता धर्मतीर्थव्रतानिच ।
तस्मात् सर्वं परित्यज्य पतिमेकं भजेत् सती ॥ १८२ ॥

या जगीं बायकांना देवाचे ठिकाणीं भर्ता, गुरूचे ठिकाणीं भर्ता, आणि सर्व तीर्थें, व्रतें, वैकल्यें हींही भर्ताच अशी स्थिति असल्यानें पतिव्रता स्त्रीनें सर्व सोडून पतीचीच सेवा केली पाहिजे.

भवंति नरकाः पापात् पापं दारिद्र्यसंभवं ।
दारिद्र्यं अप्रदानेन तस्मात् दानपरो भव ॥ १८३ ॥

दानधर्म केला नाहींतर दारिद्र्य येतें. दारिद्र्यापासून पाप होतें व पापापासून नरकप्राप्ति होते. यासाठीं सर्वानर्थ टाळण्यासाठीं दानधर्म करावा.

भस्मना शुध्यते कांस्यं ताम्रं आम्लेन शुध्यति ।
रजसा शुध्यते नारी नदी वेगेन शुध्यति ॥ १८४ ॥

कांशाचें भांडें राखेनें स्वच्छ होतें. तांब्याच्या भांड्यास चिंचेनें शुद्धता येते. प्रतिमासीं रजस्वला होण्यानें स्त्री पवित्र होते व सतत वाहण्यामुळें नदीला पवित्र मानतात.

भार्यावियोगः स्वजनापवादः ।
ऋणस्य शेषं कृपणस्य सेवा ॥
दारिद्र्यकाले प्रियदर्शनंच ।
विनाग्निना पंच दहंति कायं ॥ १८५ ॥

तारुण्यांत बायको मरणें, आप्तेष्टांकडून मानहानिकारक कांहीं तरी प्रवाद उत्पन्न होणें, काढलेल्या कर्जाचा भाग अवशिष्ट राहणें, दानधर्म न करणाऱ्या कंजुष माणसाची सेवा करण्याचा प्रसंग येणें, आणि द्रव्यहीन झाल्यानंतर मित्राची भेट होणें. या पांच गोष्टी मनुष्यास मरणप्राय दुःखद वाटतात. आणि त्यामुळें मनुष्याचें रक्तशोषण होत असतें.

भाषणं माल्यवत् यत्र कणा यत्रच रत्नवत् ।
अतिथिः पुत्रवत् यत्र तत्र तिष्ठामि नारद ॥ १८६ ॥

पुष्पाप्रमाणें मृदु व सुगंधी भाषणें, रत्नाप्रमाणें धान्याच्या कणाची किंमत, व पोटच्या मुलाप्रमाणें अतिथिअभ्यागताशीं ज्या घरीं वर्तन असेल त्या घरांत मी आनंदानें राहतें, असें लक्ष्मीनें नारदास सांगितलें आहे.

भार्गवेण हता माता एकजायाश्च पांडवाः ।
परदाररतः कृष्णः न देवचरितं चरेत् ॥ १८७ ॥

श्रीपरशुरामांनीं आपल्या मातोश्रीचा वध केला; पांच पांडवांत एकच द्रौपदी बायको होती; व भगवान् श्रीकृष्ण परमात्मा व्यभिचारी होता. या गोष्टी देवादिकांच्या आहेत. यांचें अनुकरण जीवसृष्टींतील मानवांनीं करूं नये.

भिक्षोर्मांसनिषेवणं किमुचितं किं तेन मद्यं विना ।
मद्यं चापि तव प्रियं प्रियमहो वारांगनाभिः सह ॥
वारस्त्रीरतये कुतस्तव धनं द्यूतेन चौर्येणवा ।
चौर्यद्यूतपरिश्रमोपि भवतो भ्रष्टस्य का वा गतिः ॥ १८८ ॥

संन्यस्त माणसानें मांस भक्षण करणें निषिद्ध आहे. एक पतित संन्याशी खालीलप्रमाणें आपली हकीकत सांगत आहे. ती अशीः—

चोरी किंवा द्यूत खेळून द्रव्य मिळवून आपण वेश्यासमागम करितों. व वेश्येबरोबर मद्यप्राशन करून त्या मद्यप्राशनाचे शांतीसाठीं आपण मांस भक्षण करीत असतों. चौर्य, द्यूत, वेश्या, मद्यप्राशन व मांसभक्षण हीं प्रत्येक स्वामीला वर्ज्य आहेत व हीं करणारा संन्याशी असेल तर तो भ्रष्ट व पतित समजावा.

भूपस्य चित्तं कृपणस्य वित्तं मनोरथं मानुषदुर्जनस्य ।
स्त्रियः चरित्रं पुरुषस्य भाग्यं देवो न जानाति कुतो मनुष्यः॥१८९

दुराचारी राजाचें अंतःकरण, लोभी माणसाचे द्रव्य, दुष्ट मनुष्याचें मनांतील हेतु, बायकांचें चरित्र आणि पुरुषांच्या भाग्योदयाचा काळ हीं सर्व परमेश्वरास सुद्धां समजत नाहींत. मग मनुष्यास कशीं समजतील ?

मनसि वचसि काये पुण्यपीयूषपूर्णाः ।
त्रिभुवनमुपकारश्रेणिभिः प्रीणयन्तः ॥

परगुणं परमाणून् पर्वतीकृत्य नित्यं ।
निजहृदि विकसंतः संति संतः कियंतः ॥ १९० ॥

आचार, विचार आणि उच्चार ज्यांचे अमृताप्रमाणें गोड असून जे नेहमीं परोपकार करीत असतात आणि शिवाय दुसऱ्याचा यत्किंचित सद्गुण असला तथापि त्याला अत्यंत महत्त्व देऊन त्याचा गौरव करून दाखविणारे असे साधु पुरुष जगामध्यें अत्यंत विरळ होत. आपला बडेजाव व आपली स्तुति सांगणारे शेंकडों लोक जगांत वावरत आहेत.

मज्जत्वंभसि यातु मेरुशिखरं शत्रूं जयत्वा हवे ।
वाणिज्यं कृषिसेवनादि सकलं सर्वाः कलाः शिक्षतु ॥
आकाशं विपुलं प्रयातु खगवत् कृत्वा प्रयत्नं परं ।
ना भाव्यं भवतीह कर्मवशतः भाव्यस्य नाशः कुतः ॥१९१ ॥

समुद्राच्या तळाशीं जावो किंवा मेरुपर्वताच्या शिखरावर जावो; व्यापार, शेतकी किंवा इतर सर्व साहित्यसंगीतकलांचें अध्ययन करो, किंवा आकाशांत पक्ष्याप्रमाणें भराऱ्या मारो; मनुष्याच्या प्राक्तनीं जें लिहिलें आहे तें कधींही चुकणार नाहीं. व जें प्राक्तनीं लिहिलें नाहीं तें होणारही पण नाहीं. एकंदरींत भवितव्यतेपुढें मनुष्याचे प्रयत्न व्यर्थ होत.

मणिः शाणोल्लीढः समरविजयी हेतिदलितः ।
मदक्षीणो नागः शरदि सरितः स्यानपुलिनाः ॥
कला शेषश्चंद्रं सुरतमृदिता बालवनिता ।
तनिम्ना शोभंते गलितविभवाश्चार्थिषु नृपाः ॥ १९२ ॥

सहाणेवर घासलेला हिरा, शस्त्राचे घाव झालेला विजयी वीर, मस्तींतून उतरलेला हत्ती, शरद् ऋतूंमधील पाणी उतरून गेल्यामुळें सुंदर दिसणारीं नद्यांचीं वाळवंटें, कलाशेष चंद्र, नित्य पतिसमागममार्ने क्षीण झालेली कुलवधू , या वरील सर्वांस क्षीणत्वाच्या योगानें एक प्रकारची मनोहारिणी शोभा येत असते. तसेंच याचक लोकांना धर्म करून दरिद्री झालेला राजा आपल्या दारिद्र्यामुळें विशेष शोभायमान दिसत असतो.

मृगा मृगैः संगमनुव्रजंति ।
गावश्च गोभिः तुरगास्तुरंगैः ॥

मूर्खाश्च मूर्खैः सुधयः सुधीभिः ।
समानशीलव्यसनेषु सख्यं ॥ १९३ ॥

मृग आपला कळप करून राहतात. गाई गाईंत मिसळून राहतात. घोडे घोड्यांबरोबर राहतात. मूर्खांबरोबर मूर्खांची करमणूक होते व पंडित पंडिताशीं स्नेह संपादन करतात. या सर्व गोष्टींवरून सारख्या स्वभावाची समान व्यसनांची मैत्री होणेस अवधि लागत नाहीं असें सिद्ध होतें.

मृत्युर्जन्मवतां वीर देहेन सह जायते ।
अद्यवाब्दशतांते वा मृत्युर्वै प्राणिनां ध्रुवम् ॥ १९४ ॥

मनुष्यास जन्मास घालते वेळींच त्याचें मरणाची वेळ परमेश्वरानें निश्चित केलेली असते. आज असो किंवा १०० वर्षांनीं असो, प्राण्याला मृत्यु हा निश्चित आहे. जन्म झाला कीं मृत्यु ठरलेला आहे असें निश्चित समजावें.

मणिना वलयं वलयेन मणिः ।
मणिना वलयेन विभाति करः ॥
कविना च विभुः विभुना च कविः ।
कविना विभुना च विभाति सभा ॥ १९५ ॥

हिऱ्यामुळें सुवर्ण कंकणास, व सुवर्णकंकणामुळें हिऱ्यास शोभा येते व या दोन्हींमुळें मनुष्याच्या हातास शोभा येते. तसेंच कवीमुळें राजाला महत्त्व व राजामुळें कवीला महत्त्व येतें. आणि राजा व कवि या उभयतांमुळें सभेला शोभा येत असते.

मनसैव कृतं पापं न शरीरकृतं कृतं ।
येनैवालिंगिता कांता तेनैवालिंगिता सुता ॥ १९६ ॥

मनानें केलें तरच पातक होतें. शरीरानें केलेलें पातक होत नाहीं. कांतेचें आलिंगन आणि मुलीचें आलिंगन यांमध्यें मनोविकारचा परिणाम होणें यालाच पातक म्हणतात.

मंत्रे तीर्थे द्विजे दैवे दैवज्ञे भेषजे गुरौ ।
यादृशीं भावनां कुर्यात् सिद्धिर्भवति तादृशी ॥ १९७ ॥

ज्योतिषी, वैद्य, उपदेश करणारा गुरु, काशीसारखीं पवित्र तीर्थें, सत्पात्र ब्राह्मण, सिद्धमंत्र, या सर्वांवर ज्याप्रमाणें आपली भक्ति असेल त्या मानानें त्यांचे-

पासून फलप्राप्ति होत असते. भक्तीरहित माणसाला यांचेपासून फलप्राप्ति होणें शक्य नाहीं.

मनस्येकं वचस्येकं कर्मण्येकं महात्मनां ।
मनस्यन्यत् वचस्यन्यत् कर्म चान्यत् दुरात्मनां ।१९८॥

विचार, उच्चार व आचार एकच असून त्याप्रमाणें वागणूक असणें हें मोठे लोकांचें लक्षण आहे. वाईट लोकांची या प्रत्येक बाबतीत विरुद्ध स्थिति असते. मनांत एक, भाषणांत दुसरें, आणि आचारणांत तिसरें अशी वाईट लोकांची वागणूक असते.

महापातकसंप्राप्ते प्रायश्चित्तविवर्जिते ।
याचयेत् श्रोत्रियस्यान्नं तदभावे जलं पिबेत् ॥ १९९ ॥

ज्याला प्रायश्चित्त नाहीं असें महापातक हातून घडल्यास अग्निहोत्र्याचे घरीं अन्नग्रहण करावें व तें शक्य नसेल तर नुसतें जल प्राशन करून रहावें. हें शास्त्रीय प्रायश्चित्त समजूं नये.

मर्कटस्य सुरापानं ततो वृश्चिकदंशनं ।
तन्मध्यें भूतसंचारः यद्वातद्वा भविष्यति ॥ २०० ॥

मद्यप्राशन केलेल्या माकडाला विंचू चावल्यानंतर जर पिशाचबाधा होईल, तर या सर्वांचा शेवट अमूकच होईल हें निश्चित नाहीं. सर्वच अद्भुत प्रकार वर्णिला आहे.

माता पिता गुरुर्भ्राता भार्या पुत्रः पुरोहितः ।
ना दंड्यो नाम राज्ञोस्ति स्वधर्मे यो न तिष्ठति ॥ २०१॥

जो स्वधर्मानें आचरण करीत नाहीं त्यास राजानें शासन केलें पाहिजे. मग तो प्रत्यक्ष पिता, माता, गुरु, बंधु, पत्नी, पुत्र, अगर पुरोहित असो. अधर्माचरण करणारास शासन करणें बाबतींत वरील कोणासही वगळतां कामा नये.

माता यदि विषं दद्यात् पिता विक्रीयते सुतं ।
राजा हरति सर्वस्वं शरणं कं व्रजेत्तदा ॥ २०२ ॥

आई पोटच्या मुलास विष देईल, बाप मुलास मोलानें विकील, आणि राजा प्रजेचें सर्वस्व हरण करील तर या तिघांची तक्रार कोणास सांगावी ? व कोणास शरण जावें ?

मांसं मृगाणां दशनौ गजानां ।
मृगद्विषां चर्म फलं द्रुमाणां ॥
स्त्रीणां सुरूपं च नृणां हिरण्य- ।
मेते गुणा वैरकरा भवंति ॥ २०३ ॥

हरिणांचें मांस, हत्तींचे दांत, सिंहव्याघ्रादिकांचें कातडें, वृक्षाचें फल, सुंदर स्त्रीचें रूप, आणि पुरुषाजवळ असलेलें द्रव्य हे सर्व गुण असले तथापि यांचे प्राप्तीसाठीं वैर उत्पन्न होत असतें.

मात्रा स्वस्रा दुहित्रा वा नो विविक्तासनो भवेत् ।
बलवानिन्द्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति ॥ २०४ ॥

आपल्या विवाहित पत्नीशिवाय कोणाही स्त्रीशीं एकांतवास करूं नये. मग ती आई, बहीण किंवा मुलगी असो. कितीही इंद्रियनिग्रह करणारा मनुष्य असला तथापि परस्त्रीच्या एकांत सहवासानें त्यास मोह उत्पन्न होत असतो. स्त्रियांमध्यें साहजीक मोहकता असते व पुरुषाला कामविकारही स्वाभाविक असतो. अशा स्थितींत एकांतवास मुळींच उपयोगी नाहीं.

मिथ्या रुदंति विहसंति सदार्थहेतो- ।
राश्वासयंति पुरुषं मतिवंचनाय ॥
तस्मान् नरेण कुलशीलसमन्वितेन ।
वेश्याः स्मशानघटिका इव वर्जनीयाः ॥ २०५ ॥

केवळ पैशासाठीं आणि पुरुषांना फसविण्यासाठीं कारणावांचून हासणें, तसेंच रडणें, आणि विश्वास उत्पन्न करणें या कामीं वेश्या चतुर असतात. सबब सदाचारसंपन्न, कुलशीलवान् माणसानें यांच्या नादीं लागूं नये. स्मशानांतील मातीच्या घागरीप्रमाणें या सदा वर्ज्य समजाव्या.

मितं ददातिहि पिता मितं माता मितं सुतः ।
अमितस्यच दातारं भर्तारं का न पूजयेत् ॥ २०६ ॥

मुलीला बाप, आई, किंवा प्रत्यक्ष मुलगा यांनीं कितीही देणगी दिली तथापि तिला मर्यादा व माप आहे. परंतु नवऱ्यानें दिलेल्या देणगीला मर्यादा, माप, किंवा मोबदल्याची अपेक्षा नसते. आणि म्हणून पत्नीनें पतीची पूजा मनोभावानें पति हा अनन्य दैवत समजून केली पाहिजे.

मूर्खं व्यसनिनं लुब्धमप्रगल्भं भयाकुलं ।
क्रूरमान्यायकर्तारं नाधिपत्ये नियोजयेत् ॥ २०७ ॥

राजानें मंत्र्याची निवड करतेसमयीं खालील गोष्टींकडे अवश्य पहावें:—
सारासार विचार नसणें, जार जुगार खेळणें, परद्रव्याचा अपहार करणें, बुद्धीमध्यें प्रौढपणा नसणें, यत्किंचित् कारणांत भीति बाळगणें, स्वभावामध्यें क्रूरता असणें, अन्यायानें आचरण करणें, अशा प्रकारचे दुर्गुण ज्या पुरुषामध्यें आहेत अशा पुरुषास मंत्रिपदावर नेमूं नये.

मूर्खे नियोज्यमाने तु त्रयो दोषा महीपतेः ।
अयशश्चार्थनाशश्च नरके गमनं तथा ॥ २०८ ॥

मूर्ख माणसाला मंत्रिपदावर नेमल्यास राजाला तीन दोष लागत असतात. कोणत्याही कामांत यशप्राप्ति होत नाहीं, अस्थानीं विनाकारण पैसा खर्च होतो,व शेवटीं प्रजेचा पसा विनाकारण खर्च केल्यामुळें नरकप्राप्ति होते,यासाठीं राजानें मंत्र्याची योजना उत्तम प्रकारें केली पाहिजे.

मूर्खस्य पंच चिन्हानि गर्वी दुर्वचनी तथा ।
हटी चाप्रियवादीच परोक्तं नैव मन्यते ॥ २०९ ॥

योग्यता नसतां गर्वानें वागणें, अद्वातद्वा भाषण करणें, दुराग्रहानें खोटें बोलणें, आणि दुसऱ्याचा सदुपदेश न ऐकणें हीं मूर्खाचीं पांच चिन्हें आहेत.

मूले भुजंगैः शिखरे विहंगैः ।
शाखाः प्लवंगैः कुसुमानि भृंगैः ॥
आश्चर्यमेतत् खलु चंदनस्य ।
परोपकाराय सतां विभूतयः ॥ २१० ॥

चंदनाच्या झाडाच्या मूळांत सर्प असतात, तर शिखरावर पक्ष्यांनीं वेढा दिलेला असतो. शाखा माकडांनीं भरलेल्या असून फुलावर भृंग गुंजारव करीत असतात. यावरून चांगल्या वस्तूंचा उपयोग नेहमीं परोपकारासाठींच होतो हें सिद्ध होतें.

मूर्खत्वं हि सखे ममापि रुचिरं तस्मिन् यदष्टौ गुणाः ।
निश्चिंतो बहुभोजने त्वभिरुचिः रात्रौ दिवा सुप्यते ॥

कार्याकार्यविचारणांधबधिरोः मानापमानौ समौ ।
कृत्वा सर्वजनस्य मूर्धनि पदं मूर्खः सुखं जीवति ॥ २११ ॥

कोणत्याही प्रकारची काळजी न करितां वाटेल तितकें मनसोक्त भोजन करून रात्रीं आणि दिवसां खुशाल झोंप काढावी. बरें वाईट कार्याबद्दल विचार नसून मानापमान सारखे समजून सर्व जगास नांवें ठेवून सुखानें राहणें अशा प्रकारच्या मूर्ख वृत्तींत एक प्रकारचें सुख असेल असें मला वाटतें. आणि म्हणूनच मित्रा, मला मूर्ख होणें ज्यास्त आवडतें.

मौखर्यं लाघवकरं मौनमुन्नतिकारकं ।
मुखरं नूपुरं पादे कंठे हारो विराजते ॥ २१२ ॥

फार बडबड करणारे माणसाचा केव्हांही अपमान होतो. आणि मौन स्वीकारल्यास लोक बहुमानानें वागवितात असा अनुभव आहे. शब्द करणारा नूपुर बायका पायांमध्यें घालितात, आणि कांहीं आवाज न करणाऱ्या हारास गळ्यांत घालतात. यावरून वरील गोष्ट सिद्ध होते.

यः सुंदरस्तद्वनिता कुरूपा ।
या सुंदरी सा पतिरूपहीना ॥
यत्रोभयं तत्र दरिद्रता च ।
विधेर्विचित्राणि मनोरथानि ॥ २१३ ॥

सुदर मनुष्याला कुरूप बायको मिळते व सुंदर स्त्रीला कुरूप पति मिळतो; पति आणि पत्नी दोन्ही सुंदर असतील तेथें दारिद्र्य असतें; एकंदरींत सर्व सुखी कोणी असत नाहीं. अशी ब्रम्हदेवाची रचना आहे.

यत्र विद्वज्जनो नास्ति श्लाघ्यः तत्राल्पधीरपि ।
निरस्तपादपे देशे एरंडोऽपि द्रुमायते ॥ २१४ ॥

ज्या प्रदेशांत विद्वान् माणसें नसतात त्या प्रदेशांत थोडें शिकलेलीं माणसें विद्वान् गणलीं जातात. एखाद्या प्रदेशांत मुळींच वृक्ष नसतील तर त्या ठिकाणीं एरंडासारख्या लहानशा झाडालासुद्धां वृक्षांचें स्वरूप प्राप्त होतें.

यदि वहति च दंडं नग्नमुडं करंडं ।
यदि वससि गुहायां वृक्षमूले शिलायां ।

यदि पठसि पुराणं वेदसिद्धांततत्त्वं ।
यदि हृदयमशुद्धं सर्वमेतन्नकिंचित् ॥ २१५ ॥

डोकें काढून संन्यास घेऊन हातांत दंड धारण केला, पर्वताच्या गुहेंत किंवा वृक्षाच्या खालीं अगर एखाद्या मोठ्या शिळेवर बसला, वेदशास्त्रपुराणाचें पठण व पुराण सांगितलें. इतक्या गोष्टी केल्या तथापि मन जर शुद्ध नाहीं तर वरील सर्व गोष्टी व्यर्थ होत.

यथा विहंगास्तरुमाश्रयंति ।
नद्यो यथा सागरमाश्रयंति ॥
यथा तरुण्यः श्रियमाश्रयंति ।
सर्वे गुणाः कांचनमाश्रयंति ॥ २१६ ॥

सर्व पक्षी झाडांचा आश्रय करितात. नद्या सागराला जाऊन मिळतात. संपूर्ण तरुण स्त्रियांना दागिन्याची आवड जास्ती. तसेंच सर्व गुण सोन्याचे ठिकाणीं दृष्टीस पडतात.

यदि भवति विहीनः पच्युतो वा स्वदेशात् ।
नहि खलजनसेवामर्थयत्युत्तमात्मा ।
नतु तृणमुपभुंक्ते स क्षुधार्तोऽपि सिंहः ।
पिबति रुधिरमुष्णं प्रायशः कुंजराणां ॥ २१७ ॥

कुलीन मनुष्यावर कसलाही बिकट प्रसंग आला तथापि तो नीच मनुष्याची सेवा करणार नाहीं. सिंहाला हत्तीचें ताजें रक्त मिळालें नाहीं म्हणून तो केव्हांही गवत खात नाहीं. तेजस्वी माणस केव्हांही इभ्रतीनेंच दिवस कंठीत असतात. सिंह उपवास करील, परंतु गवत खाणार नाहीं.

यदि संति गुणाः पुंसां विकसन्त्येव ते स्वयं ।
नहि कस्तूरिकामोदः शपथेन विभाव्यते ॥ २१८ ॥

मनुष्यामध्यें गुण असल्यास ते आपोआप प्रकाशित होत असतात. त्याचा प्रकाश पडण्यास दुसऱ्याची अवश्यता लागत नाहीं. कस्तुरीचा वास आपोआप लोकांना समजतो. त्याला शपथ घातली तथापि तो कमी होणार नाहीं.

यस्मिन्नेवाधिकं चक्षुरारोपयति पार्थिवः ।
कुलीनो वाकुलीनो वा साश्रयो भाजनं भवेत् ॥२१९॥

कुलीन असो वा हीन कुलोत्पन्न असो. राजाची कृपा त्यावर झाली कीं, लक्ष्मी ही त्याचे घरीं वास करीतअसते. राजकृपा धनधान्याला संवर्धक असते.

यद्भावि तद्भवत्येव यन्न भावि न तद्भवेत्।
इतिनिश्चितबुद्धीनां न चिंता बाधते क्वचित् ॥ २२० ॥

होणें असेल तें चुकत नाहीं. न होणेचें असेल तें कधींही होणार नाहीं, हें तत्त्व मनांत आणून निश्चित बुद्धीनें राहिल्यास चिंतेपासून पीडा होणार नाहीं. व्यर्थ चिंता करून उपयोगी नाहीं.

यस्य वर्णस्य यो राजा सवर्णः सुखमेधते।
जामदग्न्येन रामेण ब्राह्मणाः भूभृतः कृताः ॥ २२१

सवर्ण राजा असला म्हणजे त्या जातीस सुख देत असतो. परशुरामराजा झाला त्या वेळीं त्यानें शेंकडों ब्राह्मणांस राजपदावर बसविलें. उन्नतीच्या वेळीं आपल्या जातीस, आप्तइष्टांस, ओळखणें यांतच मोठेपणा आहे. परंतु ही गोष्ट पुष्कळांना समजत नाहीं.

यथा चित्ते तथा वाचि यथा वाचि तथा क्रियाः।
चित्ते वाचि क्रियायांच साधूनामेकरूपता ॥ २२२ ॥

अंतःकरणांत असेल तेंच भाषणांत असणें,व त्याप्रमाणें आचरणांत आणणें, या वागणुकीस साधु लक्षण म्हणतात. अंतःकरण, वाणी, आणि क्रिया यांमध्यें साधुपुरुष एकरूपानें वागत असतात.

यद्यदाचरति श्रेष्ठः तत्तदेवेतरो जनः।
स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥ २२३ ॥

श्रेष्ठ पुरुषांचें आचरण पाहून इतर लोक त्याप्रमाणें वागत असतात. थोर पुरुष प्रमाण समजून ज्या गोष्टी करितात, त्यांचेंच अनुकरण इतर लोक करीत असतात.

यथा देशः तथा भाषा यथा राजा तथा प्रजा।
यथा भूमिस्तथा तोयं यथा बीजं तथांकुरः ॥ २२४ ॥

देशास अनुसरून भाषा, राजाचें अनुकरण करणारी प्रजा, भूमीच्या रुचीप्रमाणेंच त्यांतील उदकास रुचि असणें, आणि बीजाप्रमाणेंच फळें येणें हे सर्व सिद्धांत परमेश्वरी योजनेचे आहेत.

यश्च निंबं परशुना यश्चैनं मधुसर्पिषा ।
यश्चैनं गंधमाल्याद्यैः सर्वस्य कटुरेव सः ॥ २२५ ॥

लिंबास कुऱ्हाडीनें तोडिला, किंवा तूप मधाचें आळें केलें आणि प्रसंगीं गंध-फूल घालून त्याची पूजा केली तथापि त्याचा कडूपणा कमी होत नाहीं. कडू असणें हा त्याचा स्वभावदोष असल्यानें वरील कोणत्याही प्रकारानें तो कमी होत नाहीं.

यः स्वभावोहि यस्य स्यात् तत्तस्य दुरतिक्रमः ।
श्वा यदि क्रियते राजा सकिं नाश्नात्युपानहं ॥ २२६ ॥

कुत्र्याला राज्यावर बसविलें तथापि हाडें चघळण्याचा त्याचा स्वभाव जाणें शक्य नाहीं. यावरून मूळच्या स्वभावांत प्रत्यक्ष ब्रह्मदेवाकडूनही फरक होऊं शकत नाहीं हें सिद्ध होतें.

यस्य भार्या सदा दुष्टा परवेश्माभिगामिनी ।
कुचेला त्यक्तलज्जाच सा जरा न जरा जरा ॥२२७॥

मळकट व घाणेरडीं वस्त्रें नेसून कारणाशिवाय दुसऱ्याचे घरीं जाणारी, आणि नेहमीं असंतुष्ट व रागांत असणारी, अशी स्त्री ज्या मनुष्यास लाभेल त्या तरुण पुरुषास निराळे वृद्धपण येणेची आवश्यकता नाहीं.

यावन्न तपति भानुः तादृक् संतपति वालुकानिकरः ।
अन्यस्माल्लब्धपदः प्रायो नीचोऽपि दुःसहो भवति ॥ २२८॥

सूर्यापासून होणाऱ्या तापापेक्षां त्यापासून तापलेल्या वाळूचा ताप प्रखर असतो. प्रत्यक्ष राजा कधींही कडक वागत नाहीं. परंतु राजाश्रित मंत्री वगैरे प्रजेला ज्यास्त कडक वागवितात असा नियम आहे.

यांति न्यायप्रवृत्तस्य तिर्यंचोपि सहायतां ।
अपन्थानं तु गच्छंतं सादरोपि विमुंचति ॥ २२९ ॥

न्यायानें वागणाऱ्या माणसास पशु, पक्षीसुद्धां मदत करीत असतात व अन्यायानें वागणाऱ्या माणसास प्रत्यक्ष त्याचे सोदर बंधु सोडून जातात असा नियम आहे. श्रीराम न्यायानें वागल्यामुळें जटायु, व वानरसेना यांनीं त्यांना मदत केली. परंतु रावण अन्यायानें वागल्यामुळें प्रत्यक्ष बंधु बिभीषण यानें त्यास मदत केली नाहीं.

यातु भार्याशुचिर्दक्षा मिष्टान्नप्रियवादिनी ।
अप्रमत्ता भर्तृभक्ता साध्वीरित्युच्यते बुधैः ॥ २३० ॥

आचरणानें पवित्र, प्रपंचामध्यें व्यवस्थित, साखरेहून गोड भाषण, अत्यंत नम्र वर्तन, पतीचे ठिकाणीं निरातिशय प्रेम असें करणारी स्त्री ही लक्ष्मास्वरूप समजली जाते.

या राका शशिशोभना शिगतघना सा यामिनी यामिनी ।
या सौंदर्यगुणान्विता पतिरता सा कामिनी कामिनी ॥
या गोविंदरसप्रमोदमधुरा सा माधुरी माधुरी ।
या लोकद्वयसाधनी तनुभृतां सा चातुरी चातुरी ॥ २३१ ॥

आकाश निरभ्र असून पूर्ण चंद्रोदय असेल तर त्या रात्रीला महत्त्व ज्यास्ती. तसेंच सौंदर्यपूर्ण असून पतिव्रता असेल तर त्या स्त्रीचें महत्त्व जास्ती. आणि भगवंताचें नामस्मरण करून नित्य गोड शब्द जिच्यामध्यें आहेत, तीच वाणी श्रेष्ठ. तसेंच ऐहिक व पारमार्थिक सुख ज्यापासून मिळेल अशी चतुरता असेल तर तिला महत्त्व जास्ती समजावें.

युद्धं च प्रातरुत्थानं भोजनं सह बंधुभिः ।
स्त्रियमापद्गतां रक्षेच्चतुः शिक्षेत कुक्कुटात् ॥ २३२ ॥

लढाई करणें, सूर्योदयापूर्वी जागें होणें, आपल्या आप्तइष्टांसह भोजनें करणें, आणि बायको संकटांत असल्याचें पहातांच धावून तिला मदत करणें, या चार गोष्टी कोंबड्यामध्यें दृष्टीस पडतात.

येषां न विद्या न तपो न दानं ।
ज्ञानं न शीलं न गुणो न धर्मः ॥
ते मर्त्यलोके भुवि भारभूताः ।
मनुष्यरूपेण मृगाश्चरंति ॥ २३३ ॥

ज्यांना आपलें पोट भरण्यापुरती विद्या, नित्याचीं स्नानसंध्येसारखीं कर्में, आल्या अतिथीस घासभर अन्न घालण्याचें सामर्थ्य, बरें वाईट समजण्याइतकी विचारशक्ति, घरांत, व्यवहारांत व समाजांत, ज्याचे उच्चार व आचार एक आहेत असा स्वभाव,एखाद्या विशिष्ट प्रकारचा गुण, आपल्या धर्माप्रमाणें आचरण, या गोष्टी ज्याजवळ नाहींत तो मनुष्य योनींत जन्मला असला तथापि

पशुरूपानें पृथ्वीवर संचार करीत आहे असें समजावें. अशा लोकांचा पृथ्वीला नेहमीं भार होत असतो.

यो नात्मजे न च गुरौ न च भृत्यवर्गे ।
दीने दयां न कुरुते नच बंधुवर्गे ॥
किं तस्य जीवितफलं हि मनुष्यलोके ।
काकोऽपि जीवति चिराय बलिं च भुंक्ते ॥ २३४ ॥

जो मनुष्य आपल्या मुलावर, गुरूवर, नोकर लोकांवर, दीन दुबळे, आणि अत्यक्ष आप्तइष्ट लोकांवर दया करीत नाहीं त्याच्या जीवितापासून कांहीं फायदा नाहीं. ज्याच्या जीविताचा फायदा नाहीं तें जीवित व्यर्थ होय. कावळा-सुद्धां काकबलीचा भात खाऊन अनंतवर्षे आयुष्य कंठीत असतो त्याप्रमाणेंच वरील मनुष्याचें आयुष्य समजावें.

यौवनं धनसंपत्तिः प्रभुत्वमविवेकिता ।
एकैकमप्यनर्थाय किमु यत्र चतुष्टयं ॥ २३५ ॥

सारासार विचार नसणारें यौवन, श्रमावांचून मिळालेली संपत्ति, अपक्क बुद्धीच्या माणसास कुलक्रमानें प्राप्त झालेले राज्य व अधिकार, आणि अविचार, यांपैकीं कोणतेंही एक असलें तरी अनर्थ उत्पन्न होत असतात. मग चारींचा समुदाय एकत्र झाल्यास अनर्थपरंपरा उत्पन्न झाल्यावांचून राहणार नाहीं.

रत्नाकरः किं कुरुते स्वरत्नैः ।
विंध्याचलः किं करिभिः करोति ॥
श्रीखंडखंडैर्मलयाचलः किं ।
परोपकाराय सतां विभूतयः ॥ २३६ ॥

समुद्रापासून उत्पन्न झालेल्या रत्नांचा उपयोग समुद्रास होत नाहीं. विंध्य पर्वतांतील हत्तींचा उपयोग पर्वतास होत नाहीं. तसेंच मलयगिरीवरील चंदनाचा उपयोग मलय पर्वतास होत नाहीं. या तीनही गोष्टींवरून मोठ्या लोकांचा उपयोग केव्हांही दुसऱ्यास होत असतो असें सिद्ध होतें. दुसऱ्यास उपयोग होणें मोठेपणाचें लक्षण होय.

रत्नैर्महार्हैस्तुतुषुर्न देवा ।
न भेजिरे भीमविषेण भीतिं ॥

सुधांविना न प्रययुर्विरामं ।
न निश्चितार्थाद्विरमंति वीराः ॥ २३७ ॥

समुद्रमंथन करितेसमयीं प्रथम रत्नें मिळालीं म्हणून देवांना आनंद झाला नाहीं. तसेंच मागाहून हालाहल विष निघालें तरी भीति उत्पन्न झाली नाहीं. अमृत निघेपर्यंत समुद्रमंथन करणेचा जो त्यांनीं एकदां निश्चय केला तो शेवटपर्यंत कायम ठेविला. यावरून धीर पुरुष आरंभिलेल्या कार्याचा शेवट लाविल्याशिवाय रहात नाहींत असें सिद्ध होतें.

राजसेवा मनुष्याणामसिधारावलेहनं ।
पंचाननपरिष्वंगो व्यालीवदनचुंबनं ॥ २३८ ॥

व्यवहारशून्य उद्दाम राजाची नोकरी, तीक्ष्ण धार असलेल्या तरवारीस चाटणें, सिंहाला मिठी मारणें, व जहर नागिणीचें चुंबन घेणें या सर्व गोष्टी मनुष्यास अपायकारक होत.

राजपत्नी गुरोः पत्नी मित्रपत्नी तथैवच ।
पत्नीमाता स्वमाता पंचैता मातरः स्मृताः ॥ २३९ ॥

राजाची पत्नी, आपल्या गुरूची पत्नी, आपल्या मित्राची पत्नी, आपल्या पत्नीची माता म्हणजे सासू, आपली स्वतःची माता या पांच माता होत. यांचेशीं मातेप्रमाणें वर्तन करावें. याचप्रमाणें गुरुपत्नीही मातेसमान मानावी.

रात्रिर्गमिष्यति भविष्यति सुप्रभातं ।
भास्वानुदेष्यति हसिष्यति पंकजश्रीः ॥
इत्थं विचिंतयति कोषगते द्विरेफे ।
हा हंत हंत नलिनीं गज उज्जहार ॥ २४० ॥

अति कठीण लांकडांचा नाश भुंगा करीत असतो, परंतु कमळाच्या कलिकेचा नाश करितां येत नाहीं. कारण तिजसंबंधीं त्याला मोह उत्पन्न होत असतो. एक भुंगा सायंकाळीं कमलकलिकेंत बसला असतां एकदम सायंकाळ झाली व कलिका संकुचित झाल्यानें भुंग्यास बाहेर पडतां आलें नाहीं. तेव्हां भुंग्यानें कलिकेमध्यें राहून खालीलप्रमाणें मनोराज्य केलें. तें असें :- रात्र संपेल, प्रभात उत्पन्न होईल, भगवान् सूर्यनारायण उदयास येईल, आणि त्यामुळें कमलकलिका प्रफुल्लित होईल. याप्रमाणें भुंगा विचार करीत आहे

तोंवर हत्तीनें कमलकलिका नाश केली व भुंग्याचें मनोराज्य जागींच राहिलें. व्यवहारांत मनुष्यास हे अनुभव नेहमीं येत असतात. मनुष्याचे विचार व मनोराज्य एक प्रकारचें असतें व परमेश्वरी इच्छा भलतीच असल्यामुळें कमलांतील भुंग्याप्रमाणें मनोराज्य जागीं राहून मनुष्य निराश होतो.

रामे प्रव्रजनं बलेर्नियमनं पांडोः सुतानां वनं ।
वृष्णीनां निधनं नलस्य नृपते राज्यात् परिभ्रंशनं ॥
कारागारनिषेवणं च मरणं संचिंत्य लंकेश्वरे ।
सर्वः कालवशेन नश्यति नरः को वा परित्रायते ॥ २४१ ॥

राम-पांडवांचा वनवास, बलीचा वामनांनीं केलेला पराभव, छपन्न कोटी यादवांचा संहार, नल राजाला राज्याचा त्याग, आणि दशमुख लंकाधिपति रावणाचें मरण या सर्व गोष्टींचा विचार केला म्हणजे कालचक्राच्या तीव्र ओघांतून कोणाचीही सुटका होणें शक्य नाहीं असाच सिद्धांत दिसतो.

राज्ञश्चामात्यजा दोषाः पत्नीदोषास्तु भर्तरि ।
तथा शिष्यार्जितं पापं गुरुः प्राप्नोति निश्चितं ॥ २४२ ॥

दिवाणानें केलेले दोष राजाला सोसावे लागतात, पत्नीचे दोष पतीचे अंगीं लागतात व शिष्याचे अपराधामुळें गुरूला दंड होत असतो अशी वहिवाट आहे.

रिक्तपाणिर्न पश्येत्तु राजानं देवतां गुरुं ।
दैवकं पुत्रकं मित्रं फलेन फलमादिशेत् ॥ २४३ ॥

राजा, देवता, गुरु, ज्योतिषी, आपला पुत्र, आणि मित्र यांना रिकाम्या हातांनीं भेटूं नये. कांहीं तरी नारळ किंवा फळ घेऊन याची भेट घ्यावी. फल दिलें असतां फल मिळतें असा नियम आहे.

रेवातीरे तपः कुर्यात् मरणं जान्हवीतटे ।
दानं दद्यात् कुरुक्षेत्रे तत्सर्वं गौतमीतटे ॥ २४४ ॥

नर्मदातटाकीं तपश्चर्या, गंगेचे तीरीं मरण, आणि कुरुक्षेत्रामध्यें दानधर्म करावा. परंतु या सर्व गोष्टी गोदावरीचे तीरीं केल्यास पुण्य लागतें. सर्वांचें सार गोदातटाकीं आहे.

लंकापतेः संकुचितं यशो यत् ।
यत्कीर्तिपात्रं रघुराजपुत्रः ॥

स सर्व एवाद्य कवेः प्रभावः ।
न कोपनीयाः कवयः क्षितीन्द्रैः ॥ २४५ ॥

आद्य कवि श्रीवाल्मिकांनीं श्रीरामचंद्राचे यशाचा दुंदुभी जगभर पसरून रावणाचें अपयश रामायणांत ग्रथित केलें. हे सर्व खेळ कवीच्या कृपेचे आहेत. सबब राजे लोकांनीं केव्हांही कवींना असंतुष्ट करूं नये.

लालयेत् पंच वर्षाणि दशवर्षाणि ताडयेत् ।
प्राप्तेतु षोडशे वर्षे पुत्रं मित्रवदाचरेत् ॥ २४६ ॥

मुलाचें पांच वर्षापर्यंत कौतुक करून दहा वर्षांपर्यंत त्याला शिक्षणासाठीं शासन करावें व सोळा वर्षांचा झाला कीं, त्याला मित्राप्रमाणें वागवावें, म्हणजे वडिलांचा बोज राहतो.

लाभस्तेषां जयस्तेषां कुतस्तेषां पराभवः ।
येषां हृदिस्थो भगवान् मंगलायतनं हरिः ॥ २४७ ॥

सर्व कल्याणांचें स्थान श्रीकृष्ण परमात्मा ज्यांचे अंतःकरणांत आहे त्यांना कोणत्याही कामांत लाभ आणि जय मिळालाच पाहिजे. त्याचा पराजय होणें शक्य नाहीं. कार्यारंभीं श्रीकृष्ण परमात्म्याचें चिंतन केल्यास यशप्राप्ती खास होईल.

लावकश्च वराहश्च महिषी कुंजरस्तथा ।
कर्ता कारयिता चैव षडेते समभागिनः ॥ २४८ ॥

प्रथम लावक नांवाचे पक्ष्यानें अरण्यांत थोडी जमीन उकरून काढली. त्यांतच रानडुकर खेळूं लागला. यामुळें ती जागा थोडी मोठी झाली त्यांत पाणी सांठूं लागलें. त्यांत महिषी खेळूं लागल्या. यामुळें ती बरीच मोठी झाली. यामुळें त्यांत पाणी सांठून हत्तींना खेळण्यास जागा झाली, व अशा रीतीनें तो एक मोठा तलाव झाला. तो मंत्र्याच्या सांगण्यावरून राजानें बांधून काढला. व यामुळें त्याचा आता सार्वजनिक लोकांना उपयोग होऊं लागला.

१ लावक पक्षी, २ वराह, ३ महिषी, ४ कुंजर, ५ तलाव करणेस अनुमती देणारा मंत्री व ६ तलाव करणारा राजा. हे सर्व सहा असामी तलाव बांधण्याच्या कामीं समभाग पुण्यशाली होत.

लोभमूलानि पापानि व्याधयो रसमूलकाः ।
स्नेहमूलानि दुःखानि त्रीणि त्यक्त्वा सुखी भवेत् ॥ २४९ ॥

द्रव्याच्या इच्छेमुळें पाप करावेंसें वाटतें, जास्ती भोजनानें पीडा होते, विशेष स्नेह संपादन केला म्हणजे दुःख उत्पन्न होतें. सबब मनुष्यानें वरील तीनही गोष्टींविषयीं आसक्ती कमी ठेवावी.

लोभाविष्टो नरो वित्तं वीक्षते नैव चापदः ।
दुग्धं पश्यति मार्जारो यथा न लगुडा इति ॥ २५० ॥

पैसा पाहिजे या एका दृष्टीनें मनुष्य नेहमीं पाहत असतो, परंतु त्याचरोबरच्या आपत्ति त्याच्या लक्षांत येत नाहींत. मांजरास दूध दिसतें पण त्या बरोबर पाठींत लांकूड बसेल ही गोष्ट त्याचे लक्षांत येत नाहीं.

वरं तेजस्विनो मृत्युर्न तु मानस्य खंडनम् ।
मृत्युरेकदिनं हंति अपमानं पदेपदे ॥ २५१ ॥

कुलशीलवान् माणसास अपमानानें जगण्यापेक्षां मृत्यु आला तर बरें असें वाटत असतें. कारण अपमान क्षणोक्षणीं पीडा करितो, व मृत्यूची पीडा एकच दिवस होते.

वृध्दकाले मृता भार्या परहस्तगतं धनं ।
भाजनं च पराधीनं त्रयं पुंसां विडंबनं ॥ २५२ ॥

म्हातारपणीं बायको मरणें, आपलें द्रव्य दुसऱ्याच्या हातीं जाणें, आणि नित्याचे भोजनाच कामीं पराधीनता असणें या तीन गोष्टी पुरुषाला त्रासदायक होतात.

वरं वरयते कन्या माता वित्तं पिता श्रुतं ।
बांधवाः कुलमिच्छंति मिष्टान्नमितरे जनाः ॥ २५३ ॥

मुलीचा विवाह करणेचे प्रसंगीं पति उत्तम मिळावा अशी तिची इच्छा असते. मातेचे मनांत मुलीस पति उत्तम मिळून दागदागिनेही बहुत असावे, असें वाटतें. पति उत्तम, दागदागिने बहुत या दोन गोष्टी असून जामात कुलशीलवान् असावा, अशी मुलींच्या बंधूंची व पित्याची इच्छा असते. आणि इतर सर्व आप्तइष्ट फक्त लग्नांत चार दिवस भोजन उत्तम मिळावें एवढीच इच्छा करीत असतात.

वृक्षमूलेऽपि दयिता यत्र तिष्ठति तद् गृहं ।
प्रासादोपि तयाहीनः अरण्यसदृशः स्मृतः ॥ २५४ ॥

निर्जन अरण्यांतील झाडाखालीं पत्नीसहीत वास केला तरी आपल्या घरांत राहिल्याप्रमाणें सुख वाटतें. परंतु पत्नीवांचून एकाद्या चार चौकाचे वाड्यांत रहावें लागलें तर तो वाडा अरण्यासारखा वाटूं लागतो.

वृद्धार्कः प्रेतधूम्रश्च वृद्धास्त्री थिल्लरोदकं ।
आयुष्यं क्षीयते नित्यं रात्रौ च दधिभाजनं ॥ २५५ ॥

सायंकाळचें ऊन, प्रेताचा धूर, आपल्यापेक्षां वयानें जास्त असलेल्या स्त्रीशीं सुखोपभोग, तळ्यांतील सांठलेलें पाणी पिणें, आणि रात्रीं जेवण चे वेळीं दहीं सेवन केलें तर मनुष्याचें आयुष्य क्षीण होत असतें.

वनेऽपि सिंहा मृगमांसभक्षिणो ।
बुभुक्षिता नैव तृणं चरंति ॥
एवं कुलीना व्यसनाभिभूता ।
न नीचकर्माणि समाचरंति ॥ २५६ ॥

अरण्यामध्यें सिंहाला हरिणाची शिकार मिळाली नाहीं तरी तो गवत खाणार नाहीं. त्याप्रमाणेंच कुलीन व सज्जन माणसावर कोणताही बिकट प्रसंग आला तथापि त्याचे हातून वाईट कर्माचें आचरण कधींही होणार नाहीं.

वरं हि नरके वासः नच दुश्चरिते गृहे ।
नरकात् क्षीयते पापं कुगृहात् परिवर्धते ॥ २५७ ॥

दुराचारी मनुष्याच्या घरीं राहण्यापेक्षां नरकवास बरा, कारण नरकापासून पापाचें क्षालन होतें अणि दुष्टाच्या घरीं राहिल्यानें पापाची वृद्धि होत असते.

वृक्षं क्षीणफलं त्यजंति विहगाः शुष्कं सरः सारसाः ।
निर्द्रव्यं पुरुषं त्यजंति गणिकाः भ्रष्टश्रियं मंत्रिणः ॥
पुष्पं पर्युषितं त्यजंति मधुपाः दग्धं वनांतं मृगाः ।
सर्वः कार्यवशात् जनोऽभिरमते कस्यापि को वल्लभः ॥ २५८ ॥

फळें नाहींशीं झालेल्या वृक्षावर पक्षी बसत नाहींत, उदक कमी झाल्यावर सरोवराचा आश्रय हंस करीत नाहींत, दरिद्री पुरुषांचा वेश्या अपमान करतात, द्रव्यहीन राजाला मंत्री सोडून जातात, सुकलेल्या पुष्पावर मधुकर बसत नाहींत, जळलेल्या वनाचा मृग आश्रय करीत नाहींत. एकंदरीत आपला उपयोग होत असेपर्यंत मित्रत्व ठेवण्याची जगाची रीत आहे.

व्यतिषजति पदार्थानांतरः कोपि हेतुः ।
न खलु बहिरुपाधीन् प्रीतयः संश्रयन्ते ॥
विकसतिहि पतंगस्योदये पुंडरीकं ।
द्रवतिच हिमरश्मावुद्गते चंद्रकांतः ॥ १५९ ॥

प्रेम किंवा द्वेष उत्पन्न होण्याला मनुष्याचे अंतःकरणांतील हेतु कारणीभूत होत असतात. त्याला बाह्य कारणें उपयोगी पडत नाहींत. कारण सूर्योदयाचे वेळीं सूर्यविकासी कमलें प्रफुल्लित होतात व चंद्रोदयाचे वेळीं चंद्रकांत मण्याला द्रव फुटत असतो. वास्तविक सूर्य कोठें व कमलिनी कोठें; तसेंच चंद्र कोठें व चंद्रकांत मणी कोठें, या उभयतांचा बाह्य संबंध कांहीं दृष्टीस पडत नाहीं. आणि म्हणूनच अंतःसंबंध प्रेम किंवा द्वेषाला कारणभूत असतात.

वरं शून्या शाला नच खलु वरो दुष्टवृषभः ।
वरं वेश्या पत्नी न पुनरविनीता कुलवधूः ॥
वरं वासोऽरण्ये न पुनरविवेकाधिपपुरे ।
वरं प्राणत्यागो न पुनरधमानां उपगमः ॥ २६० ॥

गोठ्यामध्यें दुसऱ्यास धावून मारणारा बैल बांधण्यापेक्षां गोठा रिकामा असलेला बरा, बेजबाबदार उत्तरें देऊन पतीचा अपमान करणाऱ्या कुलवधू-पेक्षां पत्नी वेश्या असलेली बरी; उद्दाम आणि जोर जुलूम करणाऱ्या राजाचें राज्यांत वास करण्यापेक्षां कंदमुळें खाऊन अरण्यांत राहणें सोइस्कर असते. तसेंच दुष्ट व नीच लोकांशीं संबंध ठेवण्यापेक्षां आत्महत्या करून इहलोक सोडणें सुखावह होईल.

वरं वनं वरं भिक्षा वरं भारोपजीवनं ।
वरं मृत्युः शरीरस्य नाधिकारेण जीवनं ॥ २६१ ॥

भिक्षा मागून अरण्यवास करावा किंवा एकाद्याच्या घरीं अन्नासाठीं पडून राहावें, प्रसंगीं मृत्यु आला तरी बरें, परंतु अधिकारावांचून जगणें व्यर्थ होय.

वन्हौ विशुद्धामपि जानकीं तां ।
जहौ वनांते किल रामचद्रः ॥

सा किंन शुद्धा सच किं न वेत्ता ।
बलीयसी केवलमीश्वरेच्छा ॥ २६२ ॥

जनकतनया श्रीसीता देवी अग्नींतून पवित्र झाली तथापि श्रीरामचंद्रांनीं तिचा वनांत त्याग केला. श्रीसीता देवी शुद्ध झाली ही गोष्ट रामचंद्रास माहीत नव्हती असा प्रकार नाहीं. परंतु ईश्वरी इच्छा बलवान् असल्यामुळें लोकरंजनासाठीं जानकीचा त्याग करणें त्यावेळीं अवश्य होतें.

वाग्गुच्चारोत्सवं मात्रं तत्क्रियां कर्तुमक्षमाः ।
कलौ वेदांतिनः सर्वे फाल्गुने बालका इव ॥ २६३ ॥

वेदांताच्या गोष्टी तोंडानें बोलणारे लोक फार असतात. परंतु प्रत्यक्ष क्रिया करण्याचा प्रसंग आल्यास एकही तयार असत नाहीं. आणि म्हणूनच कलियुगामधील सर्व वेदांती लोकांना शिमग्यांतील चावट पोरांप्रमाणें समजतात.

वार्ताच कौतुकवती विमलाच विद्या ।
लोकोत्तरः परिमलश्च कुरंगनाभेः ॥
तैलस्य बिंदुरिव वारिणि दुर्निवारं ।
एतत्त्रयं प्रसरति स्वयमेव लोके ॥ २६४ ॥

लोकांच्या मनास कौतुक वाटणारी एकादी बातमी, लोकविलक्षण एकादी विद्या, आणि हरिणाच्या नाभीपासून उत्पन्न होणाऱ्या कस्तुरीचा सुवास या तीन गोष्टी पाण्यामध्यें तेलाचा ज्याप्रमाणें प्रसार होतो त्याप्रमाणें आपोआपच प्रसिद्ध होत असतात.

विवाहोऽर्थश्च मरणं अन्नं जननमेवच ।
कंठे बध्वा दृढं सूत्रं यत्रस्थं तत्र नीयते ॥ २६५ ॥

विवाह, द्रव्य, मृत्यु, अन्नोदकऋणानुबंध, जन्मयोग, या गोष्टी ज्या ठिकाणीं ज्या प्रकारानें होण्याच्या असतात त्याप्रमाणें परमेश्वर घडवून आणीत असतो; आणि अशी घडलेली गोष्ट यालाच सूत्र किंवा योग असें म्हणण्याचा प्रघात आहे.

विवाहकाले नृपराज्यनाशे ।
प्राणात्यये सर्वधनापहारे ॥
विप्रस्य चार्थेऽप्यनृतं वदेयुः ।
पंचानृतान्याहुरपातकानि ॥ २६६ ॥

लग्न जमविण्याच्या प्रसंगीं, राज्याचा नाश होतेसमयीं, एकाद्याचा प्राण वांचविण्यासाठीं, सर्व द्रव्याचा नाश होत असेल तर, आणि एकाद्या गरिब घराणदार माणसावर उपकार करणेसाठीं, अशा पांच वेळीं असत्य बोलण्याचा प्रसंग आल्यास त्यांत पातक होत नाहीं.

विवादो अर्थसंकल्पः परोक्षे दारभाषणं ।
यदीच्छेत् विपुलां प्रीतिं त्रीणि तत्र न कारयेत् ॥ २६७ ॥

मित्राशीं भलत्याच गोष्टींत वादविवाद करणें, त्याच्याशीं देवघेव करणें, आणि त्याचे पश्चात् त्याचे बायकोशीं दुर्बुद्धीनें संभाषण करणें, या तीन गोष्टींमुळें मैत्रींत अंतर पडतें. प्रेम कायम राखावयाचें असल्यास वरील तीन गोष्टी शहाण्यानें करूं नयेत.

विषादप्यमृतं ग्राह्यं अमेध्यादपि कांचनं ।
नीचादप्युत्तमा विद्या स्त्रीरत्नं दुष्कुलादपि ॥ २६८ ॥

विषापासून अमृताची प्राप्ति होत असल्यास, वाईट वस्तूपासून सुवर्ण सांपडत असल्यास, एकाद्या नीच माणसाजवळ उत्तम विद्या असल्यास, आणि आपल्यापेक्षां कमी प्रतीच्या कुळांत उत्तम स्त्रीरत्न असल्यास अशा चार गोष्टींचा स्वीकार करणेस हरकत नाहीं.

विषभारसहस्रेण गर्वं नायाति वासुकिः ।
वृश्चिको बिंदुमात्रेण ऊर्ध्वं वहति कंटकं ॥ २६९ ॥

हजारों घागरी विष ज्यामध्यें आहे असा शेष सर्प त्यानें आपली मान वांकवून त्यावर पृथ्वी धारण केली आहे; परंतु विंचवामध्यें एकच थेंब विष असून त्यानें आपल्या शेपटीचा नांगा वर केलेला आहे. आणि म्हणूनच विंचवाचें नांव निघतांच मनुष्यास पादत्राणाची आठवण होते. गर्व केव्हांही असूं नये.

विश्वासप्रतिपन्नानां वंचने का विचित्रता ।
अंकमारुह्य सुप्तांहि हत्वा किंनाम पौरुषं ॥ २७० ॥

विश्वासानें शरण आलेल्यास फसविणेंत काय पुरुषार्थ आहे. तसेंच मांडीवर डोकें ठेवून झोंप घेणाऱ्याचा वध करणेंत कोणता पुरुषार्थ आहे!

विधाय वैरं सामर्षे नरोरौय उदासते ।
प्रक्षिप्योदर्चिषं कक्षे शेरतेते भिमारुतं ॥ २७१ ॥

बरोबरीच्या शत्रूशीं द्वेष संपादन करून उदासीन राहूं नये. तसें राहिल्यास खाकेंत निखारा घेऊन झोंप घेण्यासारखें घातुक आहे. तो अग्नि केव्हां प्रज्वलित होईल याचा नियम नसतो, सबब नेहमीं दक्ष असावें.

विद्वानेव विजानाति विद्वज्जनपरिश्रमं ।
नहि वंध्या विजानाति गुर्वीं प्रसववेदनां ॥ २७२ ॥

विद्वान् मनुष्यानें केलेल्या श्रमाची किंमत जो विद्वान् असेल त्यालाच समजते, इतरांस समजत नाहीं. ज्याप्रमाणें प्रसूतीच्या वेळीं होणाऱ्या वेदना जी बाळंत झाली असेल तिलाच समजतात. त्या वेदना वांझ बाईस समजत नसतात.

वीणेव श्रोत्रहीनस्य लोलाक्षीव विचक्षुषः ।
व्यसोः कुसुममालेव विद्या स्तब्धस्य निश्चला ॥ २७३ ॥

बधिराला वीण्याचा आवाज, आंधळ्याला चंचलनयनासुस्वरूप स्त्री, प्रेताला सुंदर पुष्पांची माळ, आणि कोणतीही हालचाल न करणाऱ्या मनुष्यास उत्तम विद्या या सर्व गोष्टी निरुपयोगी होत.

विवाहो जन्ममरणं यदा यत्रच येनच ।
त्रयः कालकृताः पाशाः शक्यंते न निवार्तितुं ॥ २७४ ॥

लग्न आणि जननमरण या गोष्टी ज्या वेळीं जेथें व ज्याच्याशीं होणें असतील त्या ठिकाणीं त्यावेळीं त्या अवश्य होतील. हे कालपाश असल्यानें तिन्हींही निवारण करणें शक्य नाहीं.

विश्वामित्रपराशरप्रभृतयो वातांबुपर्णाशनाः ।
तेऽपि स्त्रीमुखपंकजं सुललितं दृष्ट्वैव मोहं गताः ।
शाल्यन्नं सघृतं पयोदधियुतं ये भुंजते मानवाः ।
तेषामिंद्रियनिग्रहो यदि भवेत् विंध्यस्तरेत् सागरे ॥२७५॥

वारा आणि पाणी यांचेवर उदरनिर्वाह करणारे विश्वामित्रपराशरासारखे तपस्वी बायकांचीं सुंदर कमलासारखीं मुखें पाहून मोहित झाले. मग नित्य आंबेमोहोर तांदूळ, तूप, साखर, दूध, दहीं खाणाऱ्या माणसांचा निग्रह होणें अशक्यच. आणि जर असा कदाचित् इंद्रियनिग्रह झालाच तर विंध्याचल समुद्रांत तरणेस हरकत पडणार नाहीं. म्हणजे अत्यंत अशक्य कोटींपैकीं हा भाग आहे असें समजावें.

वेषं न विश्वसेत् प्राज्ञः वेषो दोषाय जायते ॥
रावणो भिक्षुरूपेण जहार जनकात्मजां ॥ २७६ ॥

वेषापासून अनर्थ उत्पन्न होतात, सबब शहाण्या माणसानें केव्हांही वेषावर विश्वास ठेऊं नये. रावणानें यतिवेष धारण करून सीता देवीला पळवून नेली. यावरून वरील विधानांत सत्यता आहे.

वेदवेदांगतत्त्वज्ञः जपहोमपरायणः ।
आशीर्वादपरो नित्यं एष राजपुरोहितः ॥ २७७ ॥

खालील गोष्टी पाहून राजानें आपल्या पुरोहिताची निवड करावीः— पुरोहितास वेद व वेदांचीं अंगें, उपनिषत् वगैरे येत असून त्यांतील तत्त्वार्थ समजला पाहिजे; मंत्रतंत्र, जपहोम यांविषयीं तो पारंगत असला पाहिजे. सदाचार व शुचिर्भूत आचरणयुक्त असल्यानें ज्याचे आशीर्वादास फळ मिळेल अशाच मनुष्यास राजानें पुरोहित करावा.

वेधा द्वेधा भ्रमं चक्रे कांतासु कनकेषुच ।
तासु तेष्वक्यनासक्तः साक्षात् भर्गो नराकृतिः ॥ २७८ ॥

ब्रह्मदेवानें कांता आणि कनक या दोन वस्तूंमध्यें मोह उत्पन्न केला आहे. या दोन वस्तूंवर ज्याचें मन आरुक्त होत नाहीं तो प्रत्यक्ष मनुष्याकृति परमेश्वरच समजावा.

वैद्यराज नमस्तुभ्यं यमराजसहोदर ।
यमस्तु हरति प्राणान् वैद्यः प्राणान्धनानिच ॥२७९॥

वैद्य हा यमाचा सख्खा भाऊ होय. म्हणून त्याला नमन केलें पाहिजे. यम नुसते प्राण हरण करितो परंतु वैद्य प्राण आणि धन यांचें हरण करितो, सबब वैद्याला आधीं नमस्कार केला पाहिजे.

वैद्या वदंति कफपित्तमरुद्विकारान् ।
ज्योतिर्विदो ग्रहगतिं परिवर्तयंति ॥
भूताभिषंग इति भूतविदो वदंति ।
प्राचीनकर्म बलवत् मुनयो वदंति ॥ २८० ॥

एखाद्या आजाऱ्यास पाहून वैद्य वात, पित्त किंवा कफ झाल्याची परीक्षा करितात. ज्योतिषी लोक राहु, शुक्र, गुरु वगैरेची पीडा असल्याचें सांगतात.

मांत्रिक लोक भूतपिशाच्चबाधा असल्याबद्दल गोष्टी सांगतात. आणि ऋषी लोक पूर्वकर्मानुसार पीडा होत असते असें सांगत असतात. ज्याचा जो नेहमींचा व्यवसाय त्यापैकीं त्याची परीक्षा असते.

शतं विहाय भोक्तव्यं सहस्त्रं स्नानमाचरेत् ।
लक्षं विहाय दातव्यं कोटिं त्यक्त्वा हरिं भजेत् ॥ २८१ ॥

शंभर उद्योग सोडून आधीं भोजन करावें. तसेंच हजार कामें सोडून प्रथम स्नान करावें आणि लक्ष उद्योग मागें टाकून दानधर्म करावा व कोटी उद्योग सोडून श्रीभगवंताचें नामस्मरण करावें.

शठं प्रतिशठं ब्रूयादादरंप्रति चादरं ।
त्वया मे लुंचिताः केशाः मया त्वत् शिरमुंडनं ॥ २८२ ॥

नीच मनुष्याशीं नीच वागणूक, आदरयुक्त माणसाशीं आदरानें वागणें हा योग्य व्यवहार होय. तूं माझे केस उपटलेस तर मी तुझें डोकें मुंडन करीन असें उत्तर देणें अव्यवहार्य होणार नाहीं.

शशिना च निशा निशया च शशी ।
शशिना निशयाच विभाति नभः ॥
पयसा कमलं कमलेन पयः ।
पयसा कमलेन विभाति सरः ॥ २८३ ॥

रात्रीमुळें चंद्राला शोभा व चंद्रामुळें रात्रीला शोभा आणि रात्री व चंद्र या उभयतांमुळें आकाशास शोभा येते. तसेंच पाण्यामुळें कमलाला शोभा व कमळामुळें पाण्याला शोभा. आणि कमळ व पाणी यामुळें सरोवराला शोभा येते.

शशिदिवाकरयोर्ग्रहपीडनं ।
गजभुजंगमयोरपि बंधनं ॥
पतिमतांच विलोक्य दरिद्रतां ।
विधिरहो बलवानिति मे मतिः ॥ २८४ ॥

चंद्रसूर्यांला राहुकेतूपासून होणारी पीडा, हत्ती आणि सर्प यांना मनुष्यांनीं केलेलें बंधन आणि विद्वान् लोकांचें दारिद्र्य पाहून नशीब हें बलवत्तर

आहे. त्याचेपुढें चंद्र, सूर्य, गज, सर्प, किंवा विद्वान् यांचें कांहीं चालत नाहीं हें सिद्ध होतें.

शतेषु जायते शूरः सहस्त्रेषुच पंडितः।
वक्ता दशसहस्त्रेषु दाता भवति वा न वा ॥ २८५ ॥

शेंकडा एकादा पुरुष शूर निपजतो, तसेंच हजारांत एक पंडित तयार होतो. वक्ता दहा हजारांमध्यें एकादा वक्ता होतो तर दाता होणें अत्यंत दुर्मिळ असतें. दाते पुरुष बहुतकरून कमी असतात.

शर्वरी दीपकश्चंद्रः प्रभाते दीपको रविः।
त्रैलोक्ये दीपको धर्मः सुपुत्रः कुलदीपकः ॥ २८६ ॥

चंद्रामुळें रात्रीला महत्त्व येतें, सूर्यामुळें उषःकाल शोभायमान दिसतो, धर्म केल्यानें त्रैलोक्यांत कीर्ति होते व सुपुत्र झाल्यामुळें कुलाचा उद्धार होत असतो. तरी चंद्र, रवि, धर्म आणि सुपुत्र यांची योग्यता श्रेष्ठ होय.

श्वशुरगृहनिवासः स्वर्गतुल्यो नराणां।
यदि भवति विवेकी पंच वा षट् दिनानि।
दधिमधुघृतलेपो मासमेकं वसेच्चेत्।
तदुपरिदिनमेकं पादरक्षाप्रयोगः ॥ २८७ ॥

मनुष्याला सासुरवाडीस राहणें स्वर्गसुखासारखें वाटतें. परंतु एक महिनापर्यंत राहिल्यास दूध, दहीं, तूप यांची गर्दी होते, यापेक्षां जास्ती राहिल्यास मात्र अपमानाचा प्रसंग येतो; सबब सासुरवाडीस फार दिवस राहूं नये.

शशी दिवसधूसरो गलितयौवना कामिनी।
सरो विगतवारिजं मुखमनक्षरं स्वाकृतेः॥
प्रभुर्धनपरायणः सतत दुर्गतः सज्जनो।
नृपाङ्गनगतः खलो मनसि सप्तशल्यानि मे ॥ २८८ ॥

सूर्योदयामुळें चंद्राचा प्रकाश कमी होणें, सुंदर स्त्रीला वृद्धपणा असणें, कमलावांचून सरोवर, चांगल्या आकृतीच्या माणसाचें मुख अनक्षर असणें, दात्याला धनलोभ वाटणें, विद्वान् नेहमीं दरिद्री असणें, आणि नीच मनुष्याचा पगडा राजदरबारीं असणें, या सात गोष्टी माझ्या अंतःकरणास शल्याप्रमाणें पीडा करितात.

शक्यो वारयितुं जलेन हुतभुक् छत्रेण सूर्यातपो ।
नागेंद्रो निशितांकुशेन समदो दंडेन गोगर्दभौ ॥
व्याधिर्भेषजसंग्रहैश्च विविधैर्मंत्रप्रयोगैर्विषं ।
सर्वस्यौषधमस्ति शास्त्रविहितं मूर्खस्य नास्त्यौषधम् ॥२८९॥

भडकलेला अग्नि पाण्यानें शांत करतां येईल, सूर्याचा भयंकर ताप छत्रानें निवारण होईल. मस्तीचा हत्ती तीक्ष्ण अंकुशानें निवारण करितां येईल, गाय किंवा गर्दभ दंडानें दूर घालवितां येतील, नाना प्रकारच्या औषधांनीं रोग हटवितां येईल, मंत्रप्रयोगानें विष उतरवितां येईल, वरील सर्व गोष्टींस उपाय, मंत्र किंवा औषध आहे, परंतु मूर्खाला मात्र या जगांत औषध नाहीं.

शास्त्रं सुचिंतितमथो परिचिंतनीयं ।
आराधितोऽपि नृपतिः परिशंकनीयः ॥
अंके धृतापि तरुणी परिरक्षणीया ।
शास्त्रे नृपे च युवतौ च कुतो वशित्वं ॥ २९० ॥

शास्त्राध्ययन परिपूर्ण झालें असलें तथापि नित्य चिंतनिका केली पाहिजे, राजा संतुष्ट असला तथापि केव्हां कुपित होईल याची शंका मनांत असावी. तसेंच नित्य सहवासांत असली तथापि तरुण स्त्रीला फार जपावें लागतें. एकंदरींत शास्त्र, राजा, आणि तरुण स्त्रियांचेविषयीं सदासर्वदा दक्ष असावें.

शास्त्रज्ञः कपटानुसारकुशलो वक्ता नच क्रोधनः ।
तुल्यो मित्रपरस्वकेषु चरितं दृष्ट्वैव दत्तोत्तरः ॥
क्लीबान् पालयिता शठान्व्यथयिता धर्मेऽतिलोभान्वितः ।
द्विर्भावे परतत्वबद्धहृदयः राज्ञश्च कोपापहः ॥ २९१ ॥

खालील गुण मंत्र्यामध्यें अवश्य असावे. राजनीतिशास्त्राची माहिती असणें, कपटानें एखादी गोष्ट घडवून हित होत असल्यास त्याप्रमाणें आचरण करणें, आपल्या भाषणाचा प्रकाश दुसऱ्यावर पाडणें, विनाकारण रागावणें, शत्रु व मित्र यांचे ठिकाणीं समबुद्धि ठेवणें, प्रश्न विचारतांच समर्पक उत्तर देण्याची तयारी असणें, दीनदुबळ्यांचें संरक्षण करणें, शठ व लबाड लोकांना शासन करणें, धार्मिक कृत्याविषयीं आदरबुद्धि असणें, दोन मतें होऊन वाद उत्पन्न होत असल्यास दुसरी बाजू शांतपणें ऐकून एकी घडवून आणणें, आणि

राजाला प्रसंगविशेषीं कोप आल्यास तो शांत करणें, हे सर्व गुण मंत्र्यामध्यें अवश्य असले पाहिजेत.

शीलभारवती कांता पुष्पभारवती लता ।
अर्थभारवती वाणी भजते कामपि श्रियं ॥ २९२ ॥

सद्गुणसंपन्न आणि सुंदर स्त्री, नवपुष्पांनीं युक्त अशी लता, सुभाषितयुक्त वाणी, या तिन्हींमध्यें कांहींतरी लोकविलक्षण शोभा असते.

शीतेतीते वसनमशनं वासरांते निशांते ।
क्रीडारंभं कुवलयदृशां यौवनांते विवाहं ॥
सेतोर्बंधं पयसि चलिते वार्धके तीर्थयात्रां ।
वित्तेतीते वितरणमतिं कर्तुमिच्छंति मूढाः ॥ २९३ ॥

थंडी निघून गेल्यावर पांघरुणाची तजवीज करणें, अवेळीं सायंकाळचे वेळीं भोजन करणें, वृद्धपणीं विवाह करणें, पाणी निघून गेल्यावर पूल बांधणें, वृद्धपणीं तीर्थयात्रा करणेचें मनांत आणणें, आणि जवळचा द्रव्यसंचय संपल्यावर दानधर्माची इच्छा करणें या सर्व गोष्टी मूर्ख लोक मनांत आणित असतात.

शुचि भूमिगतं तोयं शुचिर्नारी पतिव्रता ।
शुचिः क्षेमकरो राजा संतोषी ब्राह्मणः शुचिः ॥२९४ ॥

जमिनींतून निघालेलें उदक, पतिव्रता स्त्री, कल्याण करणारा राजा आणि सदा संतुष्ट ब्राह्मण हे सर्व पवित्र मानावे.

शुनः पुच्छमिव व्यर्थं जीवितं विद्यया विना ।
न गुह्यगोपने दक्षं नच दंशनिवारणे ॥ २९५ ॥

विद्येवांचून मनुष्याचें जीवित कुत्र्याचें शेपटाप्रमाणें निरुपयोगी आहे. कुत्र्याचे शेपटींत आपलें इंद्रिय झांकणें किंवा अंगावर बसलेल्या दंशांचें (दंशः वनमाक्षिका, चावणारे डास) निवारण करण्याचें सामर्थ्य नसतें. तीच स्थिती अविद्वान् माणसाची होत असते.

श्रुत्यध्ययनसंपन्ना धर्मज्ञाः सत्यवादिनः ।
राज्ञा सभासदाः कार्याः रिपौ मित्रे च ये समाः ॥ २९६ ॥

खालील गुणांनीं युक्त असेल तरच राजानें त्यास सभासदाचे जागीं नेमावा. सभासदास श्रुतिस्मृति येत असाव्या, धर्म. अधर्म यांतील भेद समजावा, सत्य भाषण करणारा असून शत्रु व मित्र यांमध्यें त्यानें भेद समजून पक्षपात करूं नये.

शैले शैले न माणिक्यं मौक्तिकं न गजे गजे ।
साधवो नहि सर्वत्र चंदनं न वने वने ॥ २९७ ॥

सर्वच पर्वतांवर माणकाच्या खाणी असत नाहींत. तसेंच मोती प्रत्येक गजाचे मस्तकांत मिळतील असा नियम नाहीं. जगांतील सर्व पुरुष साधु असणें शक्य नाहीं आणि पर्वतावरील एकंदर वृक्ष चंदनाचे असणें अशक्यप्राय आहे.

स्मशानांते पुराणांते भोजनांतेच या मतिः ।
सा मतिः सर्वदा स्याच्चेत् को न मुच्येत बंधनात् ॥ २९८॥

प्रेत दहन करते समयीं, पुराणश्रवणाचे वेळीं आणि आकंठ भोजन झाल्यावर जी विरक्ति येते ती जर सर्वदा राहील तर मनुष्यास मोक्ष मिळण्यास कठीण पडणार नाहीं. परंतु हें तात्कालिक वैराग्य असतें.

स बंधुर्यो हितं युंक्ते स पिता यस्तु पोषकः ।
तन्मित्रं यत्र सद्भावः स देशो यत्र निर्वृतिः ॥ २९९ ॥

ज्याच्या हातून कल्याण होईल तोच बंधु, व जो आपल्या मुलाबाळांचें पोषण करील तोच पिता, आणि मनांत चांगलेपणाची भावना बाळगणारा असेल त्यासच मित्र म्हणावें व ज्या देशांत प्रतिष्ठेनें अन्नवस्त्र मिळून मान रहातो तो प्रदेश आपला असें समजावें.

सद्यः प्रज्ञाहरा तुंडी सद्यः प्रज्ञाकरी वचा ।
सद्यः शक्तिहरा नारी सद्यः शुक्रकरं पयः ॥ ३०० ॥

तोंडलीचें फळ सेवन केल्यानें बुद्धीचा नाश, वेखंड भक्षण केल्यानें बुद्धीचा विकास, स्त्रीसमागमानें शक्तीचा ऱ्हास, व दुग्धपान केल्यानें शक्तीची वृद्धि. या चार गोष्टी तत्काळ घडत असतात.

सदाहृष्टाल्पसंतुष्टा मिथ्याव्ययपराङ्मुखी ।
यस्य एतादृशी भार्या देवेंद्रोऽसौ न मानुषः ॥ ३०१ ॥

अस्ताव्यस्त खर्च न करतां असेल त्या थोडया मिळकतींत प्रपंच करून जी नेहमीं समाधान मानीत असते, अशा प्रकारची बायको मिळणें मनुष्यकोटींत अशक्य होय, कोंड्याचा मांडा करून दाखविणेंत बायकांचें कौशल्य असतें व अशी बायको मिळणें महत्पुण्य समजलें जातें.

सर्वे भद्राणि पश्यंतु सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भवंतु सुखिनो माकश्चित् दुःखभाग् भवेत् ॥ ३०२ ॥

जगांतील सर्व लोक आनंदांत असावे. त्यामध्यें कोणताही रोग वगैरे न होतां त्यांना अखंड सौख्य मिळावें व कोणालाही दुःख होऊं नये अशी परमेश्वराजवळ नेहमीं प्रार्थना करावा.

स्वकर्म धर्मार्जितजीविकानां ।
स्वेस्वेव दारेषु सदा रतानां ॥
जितेंद्रियाणामातिथिप्रियाणां ।
गृहेऽपि मोक्षः पुरुषोत्तमानां ॥ ३०३ ॥

आपल्या धर्माप्रमाणें नित्यनौमित्तिक कर्मे करून जे कालक्षेप करितात व जे आपल्या धर्मपत्नीशीं संसारांत निरंतर रममाण होतात, अतिथीवर पुत्रवत् प्रेम करून ज्यांनीं इंद्रियनिग्रह केला आहे, त्यांना स्वर्गांतील मोक्षापेक्षा घरांतच मोक्षसुख मिळत असतें.

स्वगृहे पूर्ण आचारः परगेहे तदर्धकः ।
तदर्धकः परग्रामे पथि शूद्रवदाचेरत् ॥ ३०४ ॥

सोवळें ओवळें किंवा स्नानसंध्या आपल्या घरीं पूर्णपणें आचरावी. दुसऱ्याचे घरीं गैरसोय वाटल्यास थोडी कमी करावी, तसेंच परगांवीं गेल्यास गैरसोय वाटल्यास त्याहून थोडी कमी करावी, व प्रवासांत शूद्राप्रमाणें प्रसंग पडल्यास आचार ठेवावा.

हा सर्वसाधारण नियम नव्हे. गैरसोय झाल्यास वरील प्रकारची सोडवणूक आहे.

स्वयं महेशः श्वशुरो नगेशः ।
सखा धनेशः तनयो गणेशः ॥
तथापि भिक्षाटनमेव शंभोः ।
बलीयसी केवलमीश्वरेच्छा ॥ ३०५ ॥

स्वतः परमेश्वर, सर्व पर्वतांचा स्वामी हिमालय सासरा, संपूर्णसंपत्तीचा मालक कुबेर मित्र आणि सर्व गणांचा नायक गणपति पुत्र अशी परिस्थिति असतां श्रीशंकर भिक्षेसाठीं हिंडत असतात. यावरून ईश्वरी इच्छा बलवान् असल्याचें सिद्ध होतें.

सर्वत्र संपदस्तस्य संतुष्टं यस्य मानसं ।
उपानद्गूढपादस्य नतु चर्मावृतैव भूः ॥ ३०६ ॥

ज्याच्या अंतःकरणांत समाधान वृत्ति आहे. त्याला सर्व संपत्तींपासून उत्पन्न होणारें सुख मिळत असतें. पायांमध्यें चर्माचें आच्छादन असलें म्हणजे सर्व जमिनीवर चर्माचें आवरण घातल्याप्रमाणेंच सुख होतें.

सर्पाः पिबंति पवनं नच दुर्बलास्ते ।
शुष्कैस्तृणैर्वनगजा बलिनो भवंति ॥
कंदैः फलैर्मुनिवराः क्षपयंति कालं ।
संतोष एव पुरुषस्य परं निधानं ॥ ३०७ ॥

सर्प वायुभक्षण करून पुष्ट असतात व वाळलेलें गवत खाऊन अरण्यांतील हत्ती मदोन्मत्त असतात. तसेंच अरण्यांत राहणारे ऋषिलोक कंदफळें खाऊन संतुष्ट होतात. या सर्वांच्या मुळाशीं कारण संतोष हेंच होय. एक संतोष असला म्हणजे इतर कोणत्याही वस्तूची अपेक्षा रहात नाहीं.

सर्पाणां च खलानां च परद्रव्यापहारिणां ।
अभिप्राया न सिध्यंति तेनेदं वर्तते जगत् ॥ ३०८ ॥

सर्प, दुष्टलोक, आणि दुसऱ्याचें द्रव्यापहरण करणारे चोर वगैरे लोक या तिघांनीं मनांत आणल्याप्रमाणें त्यांचीं कार्यें सफल होत नाहींत. आणि म्हणून पृथ्वीवरील माणसें सुखी आहेत. या वरील त्रिवर्गाचे हेतु सिद्धीस जातील तर रोज अनर्थपरंपरा उत्पन्न होईल.

सत्भावो नास्ति वेश्यानां स्थिरता नास्ति संपदां ।
विवेको नास्ति मूर्खाणां विनाशो नास्ति कर्मणां॥३०९॥

वेश्यांचे ठिकाणीं साधुवृत्ती, लक्ष्मीचे ठिकाणीं स्थिरत्व; मूर्खाला विचार आणि कर्मांचा भोगल्याशिवाय निकाल या गोष्टी अशक्यप्राय होत.

सद्भिस्तु लीलया प्रोक्तं शिलालिखितमक्षरं ।
असद्भिः शपथेनापि जले लिखितमक्षरं ॥ ३१० ॥

चांगल्या लोकांनीं थट्टेनें केलेलें भाषण दगडावर लिहिल्याप्रमाणें सत्य असतें. परंतु वाईट लोकांनीं शपथेवर जरी एकादी गोष्ट सांगितली तरी ती पाण्यावर लिहिल्याप्रमाणें निरुपयोगी होय.

स्थानभ्रष्टा न शोभंते दंताः केशा नखानराः ।
स्थानभ्रष्टास्तु शोभंते सिंहाः सत्पुरुषा गजाः ॥ ३११ ॥

पडलेला दांत, कालरून खालीं पडलेले केस, काढलेलीं नखें, अधिकारावरून खालीं आलेले पुरुष यांना महत्व राहात नाहीं.

परंतु सिंह, गज, व सदाचारसंपन्न कुलशीलवान् पुरुष यांना स्वस्थान सोडलें तरच महत्व येतें.

संपूर्णकुंभो न करोति शब्दं ।
अर्धो घटो घोषमुपैति नूनं ॥
विद्वान् कुलीनो न करोति गर्वं ।
गुणैर्विहीना बहुजल्पयंति ॥ ३१२ ॥

भरलेल्या घागरीचा आवाज होत नसतो, अर्धी घागर भरली असल्यास त्याचा आवाज होतो. तसेंच विद्या आणि कुलशील असलेलीं माणसें गर्विष्ट नसतात परंतु ज्यांच्यामध्यें गुण मुळींच नाहीं अशीं दुर्गुणी माणसें फार बोलत असतात.

सर्वौषधीनाममृतं प्रधानं ।
सर्वेषु सौख्येष्वसनं प्रधानं ॥
सर्वेंद्रियाणां नयनं प्रधानं ।
सर्वेषु गात्रेषु शिरः प्रधानं ॥ ३१३ ॥

सर्व औषधांमध्यें अमृत श्रेष्ठ, संपूर्णसुखांमध्यें भोजन खरें सुख,एकंदर इंद्रियांमध्यें डोळ्यांत श्रेष्ठपणा आहे व सर्व गात्रांमध्यें डोक्याचें महत्त्व जास्ती आहे.

सत्यं जनविरोधाय असत्यं जनरंजनं ।
सुरा विक्रीयते स्थाने दधिक्षीरं गृहे गृहे ॥ ३१४ ॥

खरें बोलल्यास लोकांचा रोष होतो. असत्य बोलण्यानें जन संतुष्ट होतात, दारू पिणेस लोक दारूचे दुकानीं जातात, दहीं आणि दूध मात्र घरोघर विक्रीसाठीं न्यावें लागतें. एकंदरींत वाईट गोष्टीस महत्त्व जास्त.

सकृज्जल्पंति राजानः सकृज्जल्पंति पंडिताः ।
सकृत् कन्या प्रदीयंते त्रीण्येतानि सकृत् सकृत् ॥३१५॥

राजे लोक एकदांच बोलतात व पंडितही एकदांच भाषण करितात. कन्येचा विवाहही एकदांच केला जातो. वरील तीनही गोष्टी पुनः पुनः होत नसतात.

स राघवेंद्रो हृतराजदारः ।
स वानरेंद्रो हृतराजदारः ॥
एवं तयोरध्वनि दैवयोगात् ।
समानशीलव्यसनेषु सख्यं ॥ ३१६ ॥

श्रीरामचंद्राचें राज्य जाऊन श्रीसीतादेवीस रावणानें पळवून नेली. तशीच स्थिति सुग्रीवाची झाली होती, त्याचेंही राज्य व बायको त्याचे भावानें हरण केली होती. आणि म्हणूनच रामसुग्रीव यांचें सख्य झालें. समानशील असल्यावांचून स्नेह जमत नाहीं. दोघांचेंही दुःख सारखेंच होतें सबब मैत्री जमली.

स जीवति यशो यस्य कीर्तिर्यस्य स जीवति ।
अयशोकीर्तिसंयुक्तः जीवन्नपि मृतोपमः ॥ ३१७ ॥

ज्याला आयुष्यांत कीर्ति आणि यश संपादन करितां आलें त्याचें जीवित सफल होय, अपयश आणि दुष्कीर्ति होऊन जगण्यापेक्षां मरणें बरें, व अशा मनुष्यास जिवंत असला तथापि मृतवत् समजतात.

स विप्रपादोदककर्दमानि ।
स वेदशास्त्रध्वनिपूरितानि ॥
स्वाहास्वधाकारनिरंतराणि ।
वैकुंठतुल्यानि गृहाणि तानि ॥ ३१८ ॥

सदाचारसंपन्न ब्राह्मणांची पाद्यपूजा व वेदशास्त्रांची नित्य घोषणा, देवयज्ञ व पितृयज्ञ हे वरील विधि ज्या घरांत पूज्यभावनेनें केले जातात तीं घरें वैकुंठाप्रमाणें आनंद देणारीं आहेत असें समजावें. गृहस्थाश्रमांत वरील गोष्टी आचरणांत अवश्य असाव्या.

स्वर्गच्युतानामिह जीवलोके ।
चत्वारि चिन्हानि भवंति तेषां ॥
दानप्रशंसा मधुरा च वाणी ।
देवार्चनं ब्राह्मणतर्पणंच ॥ ३१९ ॥

सत्पात्र ब्राह्मणास सात्विक दानधर्म करणें, पुष्पाप्रमाणें मृदु व अमृताप्रमाणें गोड भाषण करणें, कुलक्रमागत देव, देवतांचें पूजन करणें, आणि अतिथि-अभ्यागतांना अन्नदान करून संतुष्ट करणें, या चार गोष्टी स्वर्गातून योगभ्रष्ट होऊन भूलोकीं जन्म पावणाऱ्या पुण्यवान् लोकांचे हातूनच होत असतात. हा योग पापीमाणसांना घडत नाहीं.

सर्वे यत्र विनेतारः सर्वे पंडितमानिनः ।
सर्वे महत्त्वमिच्छंति राष्ट्रं तदवसीदति ॥ ३२० ॥

मी शहाणा आहें व माझ्या धोरणानें लोकांनीं चालावें व मला महत्त्व द्यावें. अशा प्रकारची भावना राष्ट्रांतील प्रत्येक मनुष्याचे मनांत उत्पन्न झाली कीं, त्या राष्ट्राचा नाश होण्यास अवधि लागत नाहीं. आचार विचार व उच्चार ज्या पुरुषाचे एक आहेत अशा एकाद्या माणसास पुढाकार देऊन सर्वांनीं त्याचे धोरणानें आचरण केल्यास राष्ट्राचा उत्कर्ष होण्यास अवधि लागत नाहीं.

स्वजातीयविघाताय माहात्म्यं दृश्यते नृणा ।
श्येनो विहंगमानेव हिनस्ति न भुजंगमान् ॥ ३२१ ॥

आपल्या जातीचा नाश करण्यांत मनुष्याला मोठेपणा वाटत असतो. बहिरी ससाणा नांवाचा आकाशांत उडणारा पक्षी आहे तो पक्ष्यांना नेहमीं मारीत असतो, परंतु सर्पांना मारण्याचें त्याच्यामध्यें सामर्थ्य नाहीं आणि म्हणून तो सर्पाला सोडून पक्ष्यांचा नाश करितो.

स्वदेशजातस्य नरस्य नूनं ।
गुणाधिकस्यापि भवेदवज्ञा ।
निजांगना यद्यपि रूपशीला ।
तथापि लोकः परदारसक्तः ॥ ३२२ ॥

मनुष्य कितीही गुणवान असला तथापि त्याचा आपल्या देशांत गौरव होऊं नये असा परिपाठ दिसतो. कारण आपली बायको रूपवती असली तथापि

लोक दुसऱ्याच्या बायकोविषयीं आसक्ति ठेवितात, असें आचरण करणारे लोक मूर्ख होत.

स्वदेशजं कुलाचारं विशुद्धमथवाशुचिं ।
मंत्रज्ञमव्यसनिनं व्यभिचारविवर्जितं ॥ ३२३ ॥

राजानें मंत्र्याची निवड करते वेळीं खालील गोष्टी अवश्य पहाव्या.

तो आपल्या देशांतील असावा, त्यास कुलपरंपरेचे आचारविचार माहीत असावे, तो आचरणानें शुचिर्भूत असावा; लहान मोठ्या कामांत त्यानें योग्य सल्लामसलत राजास सांगावी, त्याला कोणतेही जुगार, दारू वगैरे व्यसन असूं नये, आणि तो परदारासक्त नसावा असे सर्वगुण ज्यामध्यें आहेत अशा माणसास मंत्रिपदावर नेमावा.

परान्नं प्राप्य दुर्बुद्धे मा प्राणेषु दयां कुरु ।
परान्नं दुर्लभं लोके प्राणा जन्मनि जन्मनि ॥ ३२४ ॥

कालचें अजीर्ण झालें आहे आणि आज तर आमंत्रण आलें आहे, तर आतां बाबा काय करूं !

वेड्या परान्न सोडूं नको, परान्न या लोकीं दुर्लभ आहे. अरे, प्राण गेले तर ते दुसऱ्या जन्मीं येतील, परंतु परान्न मात्र दुसऱ्या जन्मीं मिळत नाहीं, हा लोभी पितापुत्रांचा संवाद आहे.

सस्यानि स्वयमत्ति चेत् वसुमती माता सुतं हन्ति चेद् ।
वेलामंबुनिधिर्विलंघयाति चेद् भूमिं दहेत् पावकः ॥
आकाशं जनमस्तके पतति चेत् अन्नं विषं चेत् भवेत् ।
अन्यायं कुरुते यदि क्षितिपातिः कस्तं निरोद्धुं क्षमः ॥३२५॥

उत्पन्न होणारीं सर्व फळें पृथ्वीनें भक्षण केलीं, मातेनें आपले मुलाचा वध केला, समुद्रानें आपली मर्यादा उल्लंघन केली, अग्नीनें भूमि जाळण्यास सुरुवात केली, आकाश भूमीवर पडूं लागलें, अन्न विष होऊं लागलें, आणि राजा अन्याय करूं लागला तर या सर्व गोष्टींत तक्रार कोणाकडे न्यावी. हा परमेश्वरी कोप समजला पाहिजे.

संतः क्वापि न संति संति यदिवा दुःखेन जीवंति ते ।
विद्वांसोपि न संति संति यदि वा मात्सर्ययुक्ताश्च ते ॥

राजानोपि न संति संति यदिवा लोकात् धनग्राहिणः ।
दातारोपि न संति संति यदि वा सेवानुकूलाः कलौ ॥ ३२६ ॥

कलियुगामध्यें खालील प्रकार चालू आहेत. आधीं सत्पुरुष कमी, कदाचित् कांहीं असलेच तर त्यांचें जीवित अत्यंत कष्टतर रीतीनें चाललें आहे. मूळांत विद्वान् माणसें कमी, कदाचित् कांहीं असलीं तर तीं परस्परांचा हेवा करणारीं आहेत. प्रजेला रंजन करणारे राजे नाहींत, कदाचित् कांहीं असलेच तर ते लोकांच्या द्रव्याची इच्छा करणारे आहेत, तसेंच दानधर्म करणारीं माणसें कमी, कदाचित् कांहीं असलींच तर कोणी सेवा केल्यास त्याला दान देणारे असे दाते कलियुगामध्यें आहेत.

स्पृशन्नपि गजो हंति जिघ्रन्नपि भुजंगमः ।
हसन्नपि नृपो हंति मानयन्नपि दुर्जनः ॥ ३२७ ॥

हत्तीला नुसता स्पर्श केला तरी, सर्पाच्या नुसत्या श्वासोच्छ्वासानें, राजाच्या हास्यमुखापासून, आणि मूर्खाच्या मानानें मनुष्याचे जीवास केव्हां धोका येईल याचा नियम नाहीं, हत्तीचा स्पर्श, राजाचें हास्य; आणि दुर्जनापासून मान कोणीं इच्छा करूं नये.

स्वदत्तां परदत्तां वा विप्रवृत्तिंहरेद्यदि ।
षष्टिवर्ष सहस्राणि विष्ठायां जायते कृमिः ॥ ३२८ ॥

आपण दिलेली अगर दुसऱ्यानें दिलेली ब्राह्मणाची वृत्ति (जीवित साधनें) जर कोणी काढून घेईल तर तो साठ हजार वर्षें नरकामध्यें कीटक होऊन राहील.

स्थानस्थितस्य पद्मस्य मित्रे सलिलभास्करौ ।
स्थानच्युतस्य तस्यैव स्वेददाहकरावुभौ ॥ ३२९ ॥

कमल आपल्या डेखामध्यें असून उभें आहे तोंपर्यंत उदक आणि सूर्य हे त्याचे मित्र होत. परंतु तेंच कमल डेखापासून खालीं पडतांच पाण्यापासून त्याला घर्म सुटतो व सूर्यापासून दाह होत असतो. अधिकारारूढ माणसानें ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

सा भार्या या प्रियं ब्रूते स पुत्रो यत्र निर्वृतिः ।
स भृत्यो यस्तु चित्तज्ञः तत् बीजं यत्प्ररोहाति ॥ ३३० ॥

मधुर भाषणांनीं पतिला सुख देणारी असेल तीच बायको, ज्याच्या शीलानें व आचरणानें पित्यास समाधान वाटतें तोच पुत्र, आणि मालकाच्या मनांतील हेतु समजून कार्य करील तोच नोकर, तसेंच पेरलें असतां फल प्राप्त होतें तेंच बीज असें समजलें जातें.

सानंदं सदनं सुताश्च सुधियः कांता न दुर्भाषणी।
सन्मित्रं सुधनं स्वयोषिति रतिराज्ञापराः सेवकाः॥
आतिथ्यं शिवपूजनं प्रतिदिनं मृष्टान्नपानं गृहे।
साधोः संगमुपासतेहि सततं धन्यो गृहस्थाश्रमः॥ ३३१॥

घरामध्यें आनंदी आनंद, विद्वान् व गुणी पुत्र, प्रेमळ भाषण करणारी पत्नी, सुखी संपन्न मित्र, विवाहित पत्नीशीं नित्य सुखोपभोग, आज्ञाधारक नोकर, अतिथींचें स्वागत, श्रीशंकराची पूजा, नित्य सात्विक व सुखकर भोजन, आणि साधुसमागम या गोष्टी गृहस्थाश्रमामध्यें अनुभवण्यास मिळतील तरच तो गृहस्थाश्रम खरा सुखकर होय.

सिद्धमन्नं फलं पक्वं नारीप्रथमसंगमं।
सुभाषितं च तांबूलं सद्यो गृह्णाति बुद्धिमान्॥ ३३२॥

भोजनास तयार झालेलें अन्न, पिकून तयार झालेलें फळ, प्रथमच ऋतुप्राप्त झालेली पत्नी, ज्यामध्यें सदुपदेश आहे असें सुभाषित, आणि षोडशगुणी तांबूल यांचा स्वीकार सुविचारी माणसें तत्काळ करतात.

स्त्रियोहि मूलं निधनस्य पूंसः।
स्त्रियोहि मूलं व्यसनस्य पूंसः॥
स्त्रियोहि मूलं नरकस्य पूंसः।
स्त्रियोहि मूलं कलहस्य पूंसः॥ ३३३॥

मनुष्यांचे खून स्त्रीचेपायीं होतात, मनुष्य बायकोचेपायीं व्यसनांत सांपडतो, मनुष्याला नरकप्राप्ति स्त्रीचेपायीं होते. व स्त्रियांमुळेंच पुरुषांमध्यें कलह उत्पन्न होत असतात. एकंदरींत सर्व अनर्थांस कारण स्त्रियाच असतात. मात्र हा सिद्धांत नव्हे.

सीदंति संतो विलसन्त्यसंतः।
पुत्रा म्रियंते जनकः चिरायुः॥

परेषु मैत्री स्वजनेषु वैरं।
पश्यंतु लोकाः कलिकौतुकानि ॥ ३३४ ॥

कलियुगाचा प्रभाव सुरू झाल्यावर सदाचारी लोकांना कष्ट होऊन दुराचारी लोक आनंदांत रहातील, शिवाय तरुण मुलगे अकालीं मरण पावून वृद्ध माणसें जिवंत राहतील, आणि आप्तस्वकीयांशीं वैर संपादन करून परक्या लोकांशीं मैत्री करण्याची प्रवृत्ति होईल असा कलीचा महिमा आहे.

स्थितो न खादामि हसन्नजल्पे।
गतं न शोचामि कृतं न मन्ये ॥
द्वयोस्त्रितीयो न भवामि राजन्।
केनास्मि मूर्खो वद कारणेन ॥ ३३५ ॥

उभेराहून खाणें, हंसत बोलणें, गेल्याचा शोक करणें, केल्या गोष्टीबद्दल अभिमानानें आपलीच स्तुति करणें, दोघे बोलत असतां त्यामध्यें जाणें, या गोष्टी मीं न केल्या तर मला मूर्ख कोण म्हणेल, म्हणजे यांपैकीं कोणतीही एक गोष्ट जरी मनुष्याचें हातून घडली तर त्यास मूर्ख म्हणत असतात.

स्त्री विनश्यति रूपेण ब्राह्मणो राजसेवया।
गावो दूरप्रचारेण हिरण्यं लोहलिप्सया ॥ ३३६ ॥

उत्तम रूपवती स्त्रीला दुसऱ्याकडून पीडा होणेचा संभव असतो. सत्पात्र ब्राह्मण असला तथापि त्यानें राजसेवा केली कीं त्याचें ब्राह्मणत्व नष्ट होतें. दूर प्रवासाला गेल्यामुळें आपले गांवावरील प्रीति कमी होते. लोहाच्या संसर्गानें सुवर्णास निस्तेजता येते.

सिध्यंति कर्मसु महत्स्वपि यन्नियोज्याः।
संभावनागुणमवेहि तमीश्वराणां ॥
किंवा भविष्यदरुणस्तमसा विभेत्ता।
तं चेत्सहस्त्रकिरणो धुरि नाकरिष्यत् ॥ ३३७ ॥

यजमानाची कृपा असल्यावांचून लहान नोकराकडून मोठीं कामें सिद्धीस जात नाहींत. श्रीसूर्यनारायणानें अरुणास पुढें केल्यामुळें त्याचेकडून अंधकाराचा नाश होतो तसा पुढें केला नसता तर अरुणाकडून तमोनाश झाला नसता.

सिंहो व्याकरणस्य कर्तुरहरत् प्राणान् प्रियान् पाणिनेः ।
मीमांसा कृतमुन्माथ सहसा हस्ती मुनिं जैमिनीं ॥
छंदोज्ञाननिधिं जघान मकरो वेलातटे पिंगलं ।
अज्ञानावृतचेतसां अतिरुषां कोऽर्थस्तिरश्चां गुणैः ॥३३८॥

व्याकरणशास्त्राचा कर्ता पाणिनी याला सिंहानें यमसदनास पाठविलें. मीमांसाशास्त्राचा प्रवर्तक जैमिनी याला हत्तीनें स्वर्गास पोंचविलें, छंदःशास्त्राचा प्रवर्तक पिंगल याला मकरानें मारून टाकलें. या तिन्ही गोष्टींवरून अज्ञान पशूंना विद्वान् अविद्वान् असा भेद समजत नाहीं आणि यामुळेंच या तीन महाविद्वानांचा संहार झाला.

सीदंति चाग्निहोत्राणि गुरुपूजा प्रणश्यति ।
कुमार्यश्च प्रसूयंते प्राप्ते कलियुगे सदा ॥ ३३९ ॥

कलियुगाचा प्रभाव सुरू झाल्यावर अग्निहोत्रांचा लोप होईल, गुरुजनां-विषयीं पूज्य बुद्धि नष्ट होऊन गुरूंची पूजा कोणी करणार नाहींत आणि अल्पवयी मुली अकालीं प्रसूत होतील अशी स्थिति होईल; यालाच कलि-प्रभाव म्हणतात.

सुवर्णपुष्पां पृथिवीं चिन्वंति पुरुषास्त्रयः ।
शूरश्च कृतविद्यश्च यश्च जानाति सेवितुं ॥ ३४० ॥

पृथ्वीवर सोन्याचीं फुलें पसरलेलीं आहेत तीं शूर, विद्वान् किंवा उत्तम प्रकारची सेवा करणारे पुरुष, या तिघांना मिळतात. म्हणजे पैशामध्यें सुख आहे. पैसा मिळण्यास वरील तीन गुणांपैकीं एक तरी गुण मनुष्यामध्यें असावा लागतो.

सुभाषितज्ञेन जनेन साकं ।
संभाषणं सुप्रभुसेवनं च ।
आलिंगनं तुंगपयोधराणां ।
प्रत्यक्ष सौख्यं त्रयमेव लोके ॥ ३४१ ॥

उत्तम विद्वान् लोकांशीं नित्य संभाषण, कुलशीलवान् मालकाची सेवा, आणि साध्वी पतिव्रता स्त्रीशीं संसारसुखाचा उपभोग घेणें, या तीन गोष्टी ज्यांना अनुकूल आहेत त्यांना भूलोकीं प्रत्यक्ष स्वर्गसुख आहे असें समजावें.

सुलभाः पुरुषा राजन् सततं प्रियवादिनः ।
अप्रियस्य च पथ्यस्य वक्ता श्रोताच दुर्लभः ॥ ३४२ ॥

राजाजवळ तोंडपूजा करून गोड भाषण करून राजास संतुष्ट करणारे लोक फार असतात. कडू व हितकर बोलणारीं माणसें मिळत नाहींत व कदाचित् मिळालीं तर राजा त्यांचें ऐकत नाहीं, हितकर भाषण केव्हांही कडूच असतें.

सुखस्य दुःखस्य न कोपि दाता ।
परो ददातीति कुबुद्धिरेषा ।
अहं करोमीति वृथाभिमानः ।
स्वकर्मसूत्रग्रथितो हि लोकः ॥ ३४३ ॥

अमक्याकडून आपल्यास सुख झालें व अमक्यानें आपल्यास दुःख दिलें असें वाटणें क्षुद्र बुद्धीचें लक्षण आहे, मीं अमुक पराक्रम केला किंवा करीन असें म्हणणेंही चुकीचें आहे. मनुष्य आपल्या पूर्वार्जित पापपुण्यानें बांधला असल्यानें सुखदुःखें त्यावर अवलंबून असतात. कोणी सुख देत नाहीं व कोणी दुःखही देत नसतो.

सुखमध्ये स्थितं दुःखं दुःखमध्ये स्थितं सुखं ।
द्वयमन्योन्यसंयुक्तं प्रोच्यते जलपंकवत् ॥ ३४४ ॥

सुख आणि दुःख हीं परस्परांत मिसळलेलीं आहेत. सुख म्हटलें कीं त्यांत दुःख आहेच, व दुःख म्हटलें कीं त्यानंतर सुख असणारच, जल आणि पंक हीं जशीं भिन्न नाहींत तशींच सुख आणि दुःख हींही भिन्न नाहींत.

सौवर्णानि सरोजानि निर्मातुं संति शिल्पिनः ।
तत्र सौरभनिर्माणे चतुरश्चतुराननः ॥ ३४५ ॥

शेंकडों सोनार सोन्याचीं कमलें तयार करूं शकतील, परंतु त्यांत सुगंध उत्पन्न करणेचें काम त्यांचे हातून होणार नाहीं, तें काम एक ब्रह्मदेवच करीत असतो.

हंसोध्वगः श्रममपोहयितुं दिनांते ।
कारंड काक बक कोक कुलं प्रविष्टः ॥

मूकोयमित्युपहसंति लुनाति पक्ष्यान् ।
नीचाश्रयोहि महतां अपमानहेतुः ॥ ३४६ ॥

दिवसभर प्रवासाचे श्रम झाल्यामुळें विश्रांति घेणेसाठीं एक हंस काक, बक, यांचे घरीं राहावयास गेला. त्यांनीं हंस मूक आहे असें म्हणून त्याचा उपहास केला व त्याचीं पंखें उपटून काढलीं, हंसाची खरी योग्यता या नीच पक्ष्यांना न समजल्यामुळें हंसाला अपमानवेदना सहन करण्याचा प्रसंग आला, सबब सज्जनांनीं नीचापासून केव्हांही दूर रहावें हें बरें.

हरिणापि हरेणापि ब्रह्मणापि सुरैरपि ।
ललाटलिखिता रेषा परिमार्ष्टुं न शक्यते ॥ ३४७ ॥

प्रत्यक्ष श्रीविष्णु, शंकर, ब्रह्मदेव, किंवा एकंदर देव यांपैकीं कोणीही नाशिबाची रेषा पुसूं शकत नाहीं. कपाळीं जें लिहिलें असेल तें झालेंच पाहिजे असा सिद्धांत आहे.

क्षणं तुष्टा क्षणं रुष्टा तुष्टा रुष्टा क्षणे क्षणे ।
अव्यवस्थितचित्तानां प्रसादोपि भयंकरः ॥ ३४८ ॥

मूर्ख लोक क्षणांत संतुष्ट होतात, क्षणांत रुष्ट होतात, क्षणोक्षणीं रुष्ट आणि संतुष्ट असा ज्यांचा क्रम त्या माणसांचा प्रसादसुद्धां सुखकर होत नाहीं.

षट्कर्णो भिद्यते मंत्रः चतुः कर्णः स्थिरो भवेत् ।
द्विकर्णस्य तु मंत्रस्य ब्रह्माप्यंतं न गच्छति ॥ ३४९ ॥

कोणतीही गोष्ट सहा कानांत म्हणजे तीन माणसांत गेली कीं, ती बाहेर पडते. दोन माणसांत म्हणजे चार कानांत असल्यास स्थिर राहाते. व एकच माणसांत असली तर ती ब्रम्हदेवाला सुद्धां समजणार नाहीं. षट्कर्णी गोष्ट होऊं नये.

क्षते प्रहारा निपतंत्यभीक्ष्णं ।
धनक्षये दीप्यति जाठराग्निः ॥
आपत्सु वैराणि समुल्लसंति ।
छिद्रेष्वनर्था बहुली भवंति ॥ ३५० ॥

एकदां झालेल्या जखमेवर पुनःपुनः आघात होणें, दारिद्र्यामध्यें भूक भूक होणें, आणि मनुष्य संकटांत सांपडल्यावर आप्तइष्ट लोकांनीं त्याचेशीं वाद

विवाद उत्पन्न करणें, या सर्व गोष्टींवरून किंचित् दोष उत्पन्न होतांच तेथें अनर्थ परंपरा उत्पन्न होत असल्याचें सिद्ध होतें, संकट केव्हांही एकटें येत नाहीं असा सिद्धांत आहे.

व्यालाश्रितापि विफलापि सकंटकापि।
वक्रापि पंकिलभवापि दुरासदापि ॥
गंधेन बंधुरसि केतकि सर्वजंतोः।
एको गुणः खलु निहंति समस्तदोषान् ॥ ३५१ ॥

केवड्याच्या झाडावर सर्प असतात, त्याला फळ येत नाहीं शिवाय कांटे असून झाड वांकडें असतें. आणि चिखलांत त्याचा जन्म असल्यानें केवड्याचें कणीस मिळण्यास सर्वस्वी क्लेश भोगावे लागतात. इतके दुर्गुण केतकीमध्यें असले तरी सुगंध हा एकच सद्गुण असल्यामुळें सर्व लोकांना ती प्रिय असते. यावरून एक चांगला सद्गुण असला म्हणजे इतर सर्व दुर्गुण लोपून जातात.

यद्धात्रा निजभालपट्टलिखितं स्तोकं महद्वा धनं।
तत्प्राप्नोति मरुस्थलेपि नितरां मेरौ ततो नाधिकं ॥
तद्धीरो भव वित्तवत्सु कृपणां वृत्तिं वृथा मा कृथाः।
कूपे पश्य पयोनिधावपि घटो गृह्णाति तुल्यं जल ॥ ३५२ ॥

आपल्या नशिबीं जें द्रव्य लिहिलें असेल तें एकाद्या माळावर किंवा मेरु पर्वतावरही आपल्यास मिळत असतें, त्यासाठीं धनवान् माणसाकडे जाऊन दीन वृत्तीनें याचना करणेचें कारण नाहीं, एकादा घट विहिरीमध्यें बुडविला किंवा समुद्रांत बुडविला तथापि पाणी राहणेची जी त्याची माया असेल तितकेंच पाणी त्यांत राहील, विहिरींत बुडविल्यानें कमी किंवा समुद्रांत बुडविल्यानें जास्ती असा प्रकार होत नाहीं, द्रव्य मिळणेचीही बाब तशीच आहे. ब्रम्हदेवानें नशिबीं जें लिहिलें असेल तेंच खास मिळत असतें, त्यापेक्षां जास्तीची आशा नको.